ती जास्त विश्वासार्ह आहे, असे म्हणावयास हरकत नाही. मूळ बखर मोडी लिपीत असून ती ८३ पानात लिहिलेली आहे. मूळ बखरीच्या आठव्या पानावर २८ जानेवारी १८२१ ही तारीख फारशी भाषेत लिहिलेली आढळली. यावरून वरील तारखेला बखर लिहिण्याचे कार्य पूर्ण झाले, असा निष्कर्ष आपण काढू शकतो.

४. बखरीचा कालखंड आणि एकूण राजकीय पार्श्वभूमी

भवानी पंडिताच्या बखरीत ज्या कालखंडातील घटनांचा निर्देश करण्यात आला आहे, तो कालखंड म्हणजे इ. स. १७७० ते १८०७ हा कालखंड, भोसल्यांच्याच काय परंतु संपूर्ण मराठ्यांच्या आणि पर्यायाने हिंदुस्थानच्या इतिहासात महत्त्वाचा समजला गेला आहे. या कालखंडात मराठ्यांचा तेजोसूर्य हा माथ्यावरून ढळून मावळतीकडे झुकलेला असा आपल्याला दिसून येतो. याच कालखंडात म्हणजे इ. स. १७६१ मध्ये मराठ्यांनी अफगाणिस्तानचा राजा अहमदशहा अब्दाली याचे जबर आव्हान स्वीकारले. परिणामी १४ जानेवारी १७६१ रोजी पानिपतची तिसरी लढाई होऊन त्यात मराठ्यांचा पराभव झाला आणि मराठ्यांच्या सत्तेला जबर तडाखा बसला. मराठ्यांना उत्तरेतून दक्षिणेत आता माघार घ्यावी लागली. यावेळी मोगलांची सत्ता नाममात्र शिल्लक होती. अशा स्थितीत पानिपतानंतर उत्तर हिंदुस्थानात सत्तेची पोकळी निर्माण झाली व त्याचा सर्व फायदा ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला मिळाला. १७५७ च्या प्लासीच्या लढाईने इंग्रजांचा बंगालमध्ये अगोदरच शिरकाव झालेला होता. पानिपतच्या पराभवाचा फायदा घेऊन इंग्रजांनी तो पाया अधिक पक्का केला. इ. स. १७६४ मध्ये बंगालमध्ये जी बक्सारची लढाई झाली, त्यात इंग्रजांनी मोगल बादशहा शहा आलम, अवधचा नबाब शहा शुजा आणि बंगालचा नबाब मीर कासीम यांचा पराभव केला आणि स्वतःचे बंगालमधील स्थान पक्के करून घेतले.

तिसऱ्या पानिपताच्या पराभवाची लाट इतकी जबरदस्त होती की त्याचा धक्का दक्षिण हिंदुस्थानलाही बसला आणि दक्षिणेतील मराठ्यांची सत्ता टिकून राहते किंवा नाही अशी स्थिती दक्षिणेत निर्माण झाली. अशा स्थितीत पराभवाची ही लाट परतवून लावण्याचे महत्त्वाचे कार्य आणि त्याचबरोबर मराठ्यात आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य नागपूरच्या जानोजी भोसल्याने केले. पानिपतानंतर तो बाळाजी बाजीरावाबरोबर मध्य हिंदुस्थानात गेला आणि

पानिपतांच्या पराभवाचा फायदा घेऊन ज्या ज्या शासकांनी मराठ्यांविरुद्ध उठाव केला होता, त्या सर्व शासकांना (यात खेचीवाडा वगैरे राज्ये आली) जानोजीने जबर शासन केले. पानिपतावरून पळून येणाऱ्या सैनिकांची लाट जानोजीनेच थांबविली. पानिपताच्याच पराभवाचा फायदा घेऊन १७६१ च्या जून महिन्यात हैद्राबादचा राजा निजामअली याने महाराष्ट्रावर ६०,००० सैन्यानिशी स्वारी केली. त्यावेळी त्याच्या आक्रमणाला तोंड देण्याचे आणि चांभारगोंद्याच्या लढाईत त्याचा पराभव करण्याचे महत्त्वाचे कार्य जानोजीनेच केले. जानोजीच्या या कार्याला इतिहासकारांनी जितके महत्त्व द्यावयास पाहिजे होते, तेवढे दिले नाही, असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते. पानिपतानंतर जानोजीने केलेली कामगिरी ही महत्त्वाची समजणे आवश्यक आहे, कारण त्यामुळेच दक्षिणेतील मराठ्यांचा आत्मविश्वास टिकून राहिला

पानिपतानंतर माधवरावाने मराठ्यांना पुन: वैभवाचे दिवस आणून देण्याचे आटोकाट प्रयत्न केले. त्यात त्याला काही अंशी यशही आले, परंतु माधवराव–रघुनाथराव यांच्या आपसातील स्पर्धेमुळे माधवरावाला आपली सर्व शक्ती रघुनाथरावाचा बंदोबस्त करण्यातच खर्च करावी लागली. तरीसुद्धा रामचंद्र गणेश आणि विसाजी कृष्णा यांच्या नेतृत्वाखाली माधवरावाला उत्तरेत पुन: मराठ्यांना वर्चस्व प्राप्त करून देता आले. या कार्यात त्याला अतिशय थोड्या अवधीत यश मिळाले असते परंतु दुर्दैवाने माधवराव–रघुनाथराव सत्तास्पर्धेत ज्या ज्या मराठा सरदारांनी रघुनाथरावाला प्रत्यक्ष पाठिंबा दिला किंवा मनात सहानुभूती ठेवली त्यांना शिक्षा देण्यातही माधवरावाने आपली बरीच शक्ती आणि वेळ खर्च केला. ज्यांना त्याने अशा प्रकरणात शिक्षा केली, त्यात जानोजी भोसले प्रमुख होता. इ स. १७६६ आणि इ. स. १७६९ या वर्षी दोनदा स्वाऱ्या करून माधवरावाने जानोजीला शिक्षा करण्याचा प्रयत्न केला. या सर्व प्रकरणात जानोजी कितपत दोषी होता आणि त्याचे सहकार्य घेण्याऐवजी त्याचे राज्य नष्ट करण्याचा माधवरावाने जो प्रयत्न केला तो कितपत न्याय्य होता, याचा विचार या ठिकाणी करणे उचित नाही, परंतु या स्वाऱ्यांचे परिणाम मात्र दूरगामी झाले, हे आपण विसरू शकत नाही. शेवटी जानोजीच्याच शहाणपणाने माधवराव आणि जानोजी या दोघात दिलजमाई घडून आली. स्वकीयावर हात उचलण्याने विशेष फायदा होत नाही, हे कटुसत्य माधवरावाला उमगले असावे.

आणि म्हणूनच त्याने या दिलजमाईला मान्यता दिली असावी. या मैत्रीचे परिणाम पाहाण्याकरिता जानोजी आणि माधवराव हे जास्त काळ जगले नाहीत; हे मराठा राज्याचे दुर्दैव समजावे लागेल.

माधवरावाच्या मृत्यूनंतर मराठा साम्राज्याला कर्तबगार वारस न मिळाल्याने त्या साम्राज्याच्या ऱ्हासाला अधिकच वेगाने प्रारंभ झाला. माधवरावाचा सर्वात लहान भाऊ नारायणराव हा पेशव्यांच्या गादीवर आला. परंतु त्याचा चुलता रघुनाथराव हा अतिशय महत्त्वाकांक्षी असल्याने चुलता–पुतण्यात वैमनस्य निर्माण झाले आणि दिवसेंदिवस ते वाढत जाऊन त्याची परिणती शेवटी नारायणरावाच्या खुनात झाली. रघुनाथरावाच्या हाती सत्ता आली. परंतु एका खुनी माणसाच्या हाती सत्ता जावी, ही गोष्ट मराठा दरबारातल्या ज्येष्ठ मुत्सद्यांना पसंत पडली नाही आणि म्हणून त्यांनी बारभाईंचे कारस्थान रचले आणि त्यामार्फत त्यांनी रघुनाथरावाचे सत्तेवरून उच्चाटन केले.

तिसऱ्या पानिपतापासून इंग्रज संधीची वाटच पाहात होते. उत्तर हिंदुस्थानात पानिपतानंतर सत्तेची जी पोकळी निर्माण झाली होती, त्याचा फायदा घेऊन त्यांना हिंदुस्थानातील जास्तीतजास्त राज्ये आपल्या छत्राखाली आणावयाची होती. रघुनाथरावाच्या निमित्ताने मराठ्यांमध्ये जी दुही निर्माण झाली, त्याचा इंग्रजांनी त्वरित फायदा घेतला आणि रघुनाथरावाचा पक्ष त्यांनी उचलून धरला. रघुनाथरावाला इंग्रज लष्कराची मदत देऊन त्यांनी त्याला त्याचे पेशवेपद मिळवून दिले आणि अप्रत्यक्षपणे मराठा राज्यावर स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित केले.

ह्या सुमारास म्हणजे १७९८–९९ मध्ये हिंदुस्थानातील इंग्रजी राज्यात एका महत्त्वाकांक्षी आणि साम्राज्यवादी गव्हर्नर जनरलची नेमणूक झाली, आणि तो म्हणजे लॉर्ड वेलस्ली. त्याने तैनाती फौजेची पद्धती अंमलात आणून एकामागून एक राज्ये इंग्रजांच्या स्वामित्वाखाली आणली. निजामआदि राज्यांना तैनाती फौजेची पद्धती स्वीकारावयास लावून दक्षिणेतील फ्रेंचांचे वर्चस्व त्याने संपुष्टात आणले. इ. स. १७९९ मध्ये श्रीरंगपट्टमच्या लढाईत टिपू सुलतानाचा पराभव करून म्हैसूरचे राज्य त्याने ब्रिटिश पंखाखाली आणले. इ. स. १८०२ मध्ये मराठ्यांचा शेवटचा पेशवा, बाजीराव दुसरा, हा तैनाती फौजेच्या तहामुळे

अधिकच दुर्बळ बनला आणि दौलतराव शिंद्यांच्या तोफखान्यावर तो अवलंबून राहू लागला. दौलतरावाने या परिस्थितीचा फायदा घेतला आणि आपल्या कुटुंबाचा परंपरागत शत्रू होळकर याच्या कुटुंबियांवर सूड घेण्याचा त्याने प्रयत्न चालविला. ह्यावेळी झालेल्या अन्यायाने संतप्त होऊन यशवंतराव होळकराने बाजीराव दुसरा ह्याजवर स्वारी केली आणि पेशव्याचा पराभव केला. यावेळी इंग्रजांची मदत घेऊन बाजीरावाने पुन्हा पेशवेपद मिळविले. बाजीरावाने इंग्रजांची मदत स्वीकारली म्हणजे खऱ्या स्वातंत्र्याचा लोप झाला, असे शिंदे, होळकर, भोसले या सर्व सरदारांना वाटले व त्यांनी इंग्रजांविरुद्ध युद्ध पुकारले. यालाच आपण 'इंग्रज–मराठा दुसरे युद्ध' असे म्हणतो. दुर्दैवाने या युद्धात मराठ्यांना अपयश आले. आणि सर्व मराठा सरदारांना इंग्रजांची तैनाती फौजेची पद्धती स्वीकारावी लागली. या शेवटच्या अवस्थेत मराठ्यांनी इंग्रजांविरुद्ध नाना उपाययोजना केल्या. त्यात त्यांनी पेंढाऱ्यांनासुद्धा प्रोत्साहन दिले. इंग्रज या सर्व डावपेचांना पुरून उरले व शेवटी त्यांनी सर्व मराठा सरदारांना इंग्रजांचे वर्चस्व मान्य करावयास लावले. मराठ्यांचे खरे स्वातंत्र्य अशा रीतीने संपुष्टात आले.

अशा प्रकारे तिसऱ्या पानिपतापासून ते दुसऱ्या इंग्रज–मराठा युद्धापर्यंतचा कालखंड या बखरीत आलेला आहे. हिंदुस्थानच्या इतिहासात हा संपूर्ण कालखंड, एक निर्णायक कालखंड, म्हणून समजला जातो. यात मराठे, हैदरअली, निजाम मोगल बादशहा आणि इंग्रज यांचे संबंध दिवसेंदिवस कसे बिघडत गेले व शेवटी या संघर्षात इंग्रजांना वर्चस्व कसे प्राप्त झाले, याची हकीगत आपल्याला कळते. यातही शिंदे–भोसले–होळकर–पेशवे ह्यांचे परस्परसंबंध कसे होते, याचेही उद्बोधन आपल्याला ह्यातून होते. भवानी पंडित किंवा भवानी काळो हा भोसल्यांचा एक प्रमुख सरदार असल्याने त्याच्या ह्या बखरीत वरील कालखंडातील सर्व घडामोडींचे प्रतिबिंब पडलेले आपल्याला आढळते. या दृष्टीने भवानी पंडिताची ही बखर खऱ्या अर्थाने प्रातिनिधिक समजावी लागेल.

भवानी पंडिताच्या बखरीचा कालखंड आणि त्याची राजकीय पार्श्वभूमी समजावून घेतली तर ह्या बखरीतील घडामोडींची संगती समजणे सुलभ जाते. याशिवाय बखरीत इतर अनेक नवीन तपशील आलेले आहेत. त्यांची माहिती जर आपण करून घेतली तर बखरीचे महत्त्व समजण्याला आपणास अधिक मदत होते. त्याचा आढावा थोडक्यात पुढीलप्रमाणे घेता येईल.

५. बखरीतील घटनांचा आढावा :

बखरीत सर्वसाधारणपणे जानोजीच्या काळापासून (१७५५) ते दुसऱ्या इंग्रज-मराठा युद्धापर्यंतच्या (१८०३-०४) कालखंडाचा अंतर्भाव झालेला आहे. भोसल्यांचा प्रमुख सरदार भवानी पंडित ह्याच्या ह्या कालखंडातील हालचालींचा आढावा यात घेण्यात आलेला आहे. इतर ग्रंथात न आलेले अनेक तपशील ह्या ग्रंथात आलेले आहेत. असे तपशील आणि घटना कोणत्या याचा आढावा आपल्याला पुढीलप्रमाणे घेता येईल.

६. भवानीपंडिताचे पूर्ववृत्त :

भवानी पंडित काळो हा मूळचा कुठला आणि हा प्रारंभी कोठे नोकरी करीत होता याबाबत आत्तापर्यंत विशेष माहिती मिळत नव्हती. काशीराव राजेश्वर गुप्ते यांच्या नागपूरकर भोसल्यांच्या बखरीत किंवा यादव माधव काळे यांनी लिहिलेल्या नागपूर प्रांताच्या इतिहासात भवानी पंडिताचा पूर्ववृत्तांत देतांना तो वऱ्हाडातील मंगरूळ तालुक्यातील **खडी-धामणी** ह्या गावचा पटवारी होता असे म्हटले आहे. त्याचा भाऊ राजाराम वाळके हा प्रथमत: साबाजी भोसले याजकडे नोकरीला होता आणि त्याच्या मार्फत भवानी काळोचा उदय झाला असे म्हटले आहे. राजाराम साबाजीचा दिवाण बनला. त्यामुळे गणेश काळोजी व भवानी काळोजी हे दोघे बंधु वऱ्हाडात मामले करू लागले. राजारामपंताचे मार्फतीने भवानी पंताची व साबाजीची ओळख होऊन भवानीपंत साबाजीचा दिवाण बनला. जानोजी व त्याचे बंधु यांची भांडणे चालू असतांना साबाजी हा जानोजीच्या विरुद्ध माधवराव पेशव्यास मिळण्याच्या बेतात होता. परंतु भवानीपंडिताने त्याला तसे न करण्याविषयी बोध केला. तसेच जानोजीसही ही बातमी देऊन त्याजकडून साबाजीशी सख्य करून घेतले. त्यामुळे जानोजीचाही भवानीपंतावर विश्वास बसून त्याने भवानीपंतास साबाजीकडून मागून घेतले. भवानीपंत गुणांच्या जोरावर हळूहळू पुढे आला आणि भोसल्यांच्या फौजेचा तो प्रमुख सेनापती बनला.

भोसल्यांकडे येण्यापूर्वी भवानीपंडित काय करीत होता याबाबतीत आत्तापर्यंत विशेष माहिती उपलब्ध नव्हती. विदर्भाचे नामांकित इतिहासकार श्री. देवीदास गोविन्द लांडगे यांनी "संशोधनांजली" या ग्रंथात "काळू घराणी"

यावर जो लेख लिहिला त्यात सुद्धा भवानी काळो भोसल्यांकडे येण्यापूर्वी हैद्राबाद राज्यात होते परंतु नक्की कोणत्या हुद्यावर होते याबद्दल कोणतीच नक्की माहिती मिळत नाही असे लिहितांना आढळतात. ह्या बखरीमुळे भवानी काळोच्या पूर्ववृत्तांताबद्दल आणि हैद्राबादमधील त्यांच्या नोकरीबद्दल नवीन आणि अधिकृत माहिती आपल्याला मिळते त्या हकिकतीवरून भवानीपंत आबा आणि मोरो श्रीधर हे वाशीम येथील मोठे प्रतिष्ठित गृहस्थ होते. त्यांच्याकडे निजामाच्या राज्यातील दिवाणगिरीचे काम होते. त्यांनीच भवानी पंडिताला हैद्राबादेस नेले. पुढे एकदा त्यांना वाशीमला जाणे आवश्यक असल्याने आपल्या अनुपस्थितीत आपल्या मुलाला म्हणजे रामरावाला दिवाणपदावर आणि त्याचा नायब अधिकारी म्हणून भवानीपंडितास त्यांनी नेमले. अशा रीतीने भवानी पंडिताला दिवाणाला मदत करण्याचे काम मिळून राज्यकारभाराचा चांगलाच अनुभव प्राप्त झाला. पुढे दिवाणपदाकरिता अनेक उलाढाली होऊन राजे विठ्ठल बहादुर दिवाणपदावर नेमले गेले. त्यावेळी विठ्ठल बहादुर आणि भवानी पंडिताचे पटेनासे होऊन भवानी पंडित वाशिमला परत आले. त्यानंतर त्यांचा राजाराम वाळकेमार्फत साबाजी भोसल्यांशी संबंध आला. बखरीतील ही माहिती ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाची समजली पाहिजे. वाशिमचे मोरो श्रीधर, भवानीपंत आबा आणि राजाराम वाळके यांच्याबाबत मात्र कोणतीही तपशीलवार माहिती मिळत नाही.

७. जानोजी भोसले यांच्या काळातील भवानीपंडिताची कामगिरी

राजकारणातील चर्चा, कूटनीती आणि वाटाघाटी करण्यातील भवानीपंडिताचे कौशल्य पाहून जानोजीने त्याला साबाजीकडून मागून घेतले आणि आपल्या नोकरीत ठेवले. जानोजीचा संबंध कटक सुभ्यामार्फत इंग्रजांशी वारंवार येत होता. ह्याशिवाय कटक सुभ्यात एखाद्या पराक्रमी माणसाचीच गरज होती. कूटनीती आणि पराक्रम ह्या गुणांचा भवानी काळोमध्ये सुंदर समन्वय झाल्याने जानोजीने भवानी काळोचा उपयोग कटक सुभ्याकडे करून घेतला. कटक सुभ्यात जानोजीच्या काळात भवानी काळोने कोणती कामगिरी करून दाखविली याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

८. कटक सुभ्याची घडी नीट लावली

कटक सुभ्यातील इंग्रजांचे गुंतागुंतीचे राजकारण लक्ष्यात घेऊन आणि शिवभट साठेच्या महत्त्वाकांक्षी स्वभावाला आळा घालण्यारिता जानोजीला

भवानीपंडितासारखा मोहरा कटकला पाठविल्याशिवाय गत्यंतर नव्हते. १७६१ मध्ये पानिपताच्या तिसऱ्या लढाईत मराठ्यांचा नुकताच पाडाव झाला होता. बंगालच्या नवीन मालकाने म्हणजे इंग्रजांनी आपल्या बंगालमधील चौथाई सरदेशमुखीच्या अधिकाराला मान्यता द्यावी असा जरी जानोजीचा प्रयत्न चालू होता आणि त्याकरिता कटकमधील भोसल्यांच्या प्रतिनिधीने म्हणजे शिवभट साठे याने प्रयत्न करावेत असा जानोजीने आदेश दिला होता तरी त्याकरिता बंगालवर स्वारी करावी किंवा इंग्रजांविरुद्ध युद्ध पुकारावे अशी जानोजीची इच्छा नव्हती किंवा तशी त्याची तयारीही नव्हती यातच शिवभट साठे याने कटक सुभ्यातून महसुलातील एकही पैसा नागपूरला पाठविला नव्हता. अशा स्थितीत भवानी पंडिताला कटक सुभ्यात पाठवून तिथला गुंता नीट करण्याचा जानोजीने निश्चय केला. चिमणाबापूला एकटचाला पाठवून कटकची घडी नीट बसणार नाही हे जानोजी जाणून होता. म्हणून शिवभट साठे आपल्याच मनाने कारभार चालवीत असल्याने त्याला काढून टाकावे आणि कटकची घडी नीट बसवावी असा हुकूम देऊन भवानी पंडिताला कटकला पाठविण्यात आले.

भवानी पंडिताने आपल्यावर टाकलेली जबाबदारी अतिशय चांगल्या रीतीने पार पाडली. त्याने शिवभट साठे याला पकडून कटकमधील जमिनदारांचे दंगे नाहीसे केले. कटक प्रांतात सुव्यवस्था निर्माण केली. कटक प्रांत लवकरच भोसल्यांच्या राज्याचा एक संपन्न भाग समजला जाऊ लागला. भवानी पंडिताने ही जी कामगिरी करून दाखविली त्याने जानोजी चांगलाच प्रभावित झाला. अर्थात शिवभट साठे यासारख्या कार्यक्षम अधिकाऱ्याला ह्यावेळी अधिकारावरून दूर करण्यात आले ती उपाययोजना कितपत शहाणपणाची होती याबाबत इतिहासकारांनी मोठी शंका व्यक्त केलेली आढळते. काही इतिहासकारांनी याबाबत जानोजीला दोष दिलेला आढळतो. परंतु पानिपतच्या तिसऱ्या लढाईत (१७६१) मराठ्यांचा इतका दारुण पराभव झालेला असतांना आणि मराठे इतके गलितगात्र झाले असतांना चौथाईच्या प्रश्नावर इंग्रजांशी कटक प्रांतात किंवा बंगाल प्रांतात युद्ध करावे किंवा नाही याबाबत जानोजीला जबर शंका होती. अशा स्थितीत शिवभट साठे याने इंग्रजांशी युद्धापर्यंत प्रसंग आणून सोडावा आणि कटक प्रांतातील उत्पन्नाची एक पैसुद्धा नागपूरला पाठवू नये ह्या गोष्टी जानोजीला पसंत पडल्या नाहीत. आणि म्हणूनच त्याने शिवभटाची कटक प्रांतातून

नाईलाजाने उचलबांगडी करण्याचा निर्णय घेतला असावा. इंग्रजांच्या प्रेरणेने जानोजीने शिवभट साठे याची कटकप्रांतातून उचलबांगडी केली या आरोपात कोणताही तथ्यांश दिसून येत नाही किंवा तसा पुरावाही मिळत नाही. एकूण भवानीपंडिताने कटक प्रांतात इ. स. १७६१ ते १७६४ ह्या कालावधीत जी कामगिरी करून दाखविली ती उत्तम होती असेच म्हणावे लागेल.

काशीराव राजेश्वर गुप्तेकृत नागपूरकर भोसल्यांच्या बखरीत भवानी पंडित कटक प्रांतातून आल्यानंतर भवानी पंडितावर लाख रुपये कामात खाल्ले असा आरोप आला असे नमूद केलेले आढळते. यावर "साबाजी भोसले यांनी सेनासाहेबास विनंती केली की आमचेजवळचे मनुष्य घेऊन जाऊन त्याजला असे करावे हे उचित नव्हे. याजवरून बंधुची भीड जबरदस्त पाहून उगेच राहिले." म्हणजे साबाजीने मध्यस्थी करून भवानी पंडिताला ह्या आरोपातून वाचविले असे वर्णन केलेले आढळते. परंतु ह्या बखरीत मात्र ह्या कोणत्याही आरोपाचा उल्लेख आढळून येत नाही. तसा आरोप घेणेही अशक्य वाटते कारण जानोजी भवानी पंडिताच्या कामगिरीवर निश्चितपणे प्रभावित झालेला होता. ह्या कामगिरीकरिता त्याने भवानी पंडिताचा मोठा सन्मान केला.

९. माधवरावांच्या नागपूरवरील स्वाऱ्या (१७६६–१७६९)

भोसल्यांच्या राज्याचे कल्याण कल्याण व्हावे, त्याकरिता मराठ्यात एकजूट असावी असाच हेतू भवानीपंडिताने आपल्या डोळ्यासमोर सतत ठेवलेला आढळतो. कटक प्रांतातील कामगिरी आटोपून आल्यानंतर माधवराव पेशवा याने नागपूर प्रांतावर दोनदा म्हणजे इ. स. १७६५–६६ मध्ये आणि १७६९ मध्ये स्वाऱ्या करून भोसल्यांच्या राज्याची धुळधाण उडविली. त्यामुळे भवानीपंडित मोठा दुःखी बनला. आपसातल्या लढायांमुळे मराठा राज्य क्षीण होईल आणि मुख्य म्हणजे भोसले घराणे दुर्बळ बनून नागपूर राज्य शेवटाला जाईल अशी भीती भवानीपंडिताला वाटत होती. म्हणून १७६९ च्या स्वारीच्या शेवटी ज्यावेळी तहाच्या वाटाघाटींना प्रारंभ झाला त्यावेळी पेशवा आणि भोसले यांच्यात कायमची मैत्री असावी ह्या उद्देशाने भवानी पंडिताने स्वतः पुढाकार घेऊन कनकापूरचा तह घडवून आणला असे ह्या बखरीतील हकिकतीवरून दिसून येते. दिवाकर पंत चोरघडे याच्या राजकारणामुळे नागपूर राज्याचे

नुकसान झाले, निदान पुन्हा तसे नुकसान होऊ नये हाच त्यामागील हेतू होता. त्यामुळेच भवानीपंडिताने दिवाकरपंत चोरघडयांना ह्या वाटाघाटींपासून दूर ठेवले व युक्तीने कनकापूरचा तह घडवून आणला. ह्या बखरीत म्हटले आहे, "आखर गोपाळराव मिरजकर याचे मारफतीने तह होऊन त्या तहाचे बोलन्यात दिवाकरपंत कोन्हीच न होते." नागपूर राज्यातील प्रत्येक पेचप्रसंगाच्या वेळी भवानी पंडिताची दृष्टी भोसल्यांचे कल्याण कसे होईल याकडेच असे.

१०. जानोजी भोसल्यांची कृतज्ञता :

जानोजीच्या कारकिर्दीत भवानी पंडिताने नागपूर राज्याची जी मनोभावे सेवा केली त्यामुळे जानोजी अतिशय प्रभावित झाला आपल्या मृत्युच्या वेळी आपण भवानी पंडिताचे कायम कल्याण केले पाहिजे ही शुद्ध भावना त्याच्या अंतःकरणात निर्माण झाली. मृत्युच्या वेळी आपल्या भोवतालच्या लोकांना तो म्हणाला, "वरकड तो आवग्र गोस्टी मी करून चुकलो. परंतु दोन गोस्टी बाकी राहिल्या. त्याचपैकी येक चिरंजीव रघोजी भोसले याजला आपले समक्ष सेना-साहेबीचे वस्त्रे देऊन मसलदनसीन करावे. हे होऊ न सकले. दुसरे जे भवानीपंत आबा यांनी नि:सीमपणे माझी सो(ह)बत दिल्ही व दौलतीची खैरख्वाही बहुत केली. त्यास यास चालविने वंशपरंपरा तुमाकडेस आहे. यैसे दोन्ही गोस्टीचे वचन घेऊन मृत्यास पावले."

यावरून जानोजी आणि भवानी पंडित यांचे संबंध स्पष्ट होतात.

११. जानोजीच्या मृत्युनंतर वारसाबाबत भवानी पंडिताची भूमिका

जानोजीच्या मृत्युनंतर मुधोजीचा मुलगा रघुजी दुसरा याने नागपूरच्या गादीवर बसावे अशी व्यवस्था जानोजीने ठरवून दिली होती. परंतु रघुजी दुसरा अज्ञान होता, आणि तो वयात येईपावेतो सत्ता कोणाच्या ताब्यात असावी यावरून मतभेद निर्माण झाले आणि त्यावरून नागपूर दरबारात मुधोजी आणि साबाजी असे दोन पक्ष निर्माण झाले. भवानी पंडित प्रथमतः साबाजीच्याच पदरी नोकरीला होता आणि तिथूनच त्याला जानोजीने आपल्याकडे बोलावून घेतले होते. ह्यामुळे नागपूरच्या दरबारात साबाजी आणि मुधोजी असे दोन पक्ष निर्माण झाल्याने त्याची कशी पंचाईत झाली असेल याची आपण कल्पना करू शकतो, परंतु तरीसुद्धा भोसल्यांच्या राज्याचे सर्वांगीण कल्याण व्हावे असेच भवानीपंडिताला वाटत होते. ह्या बखरीत जानोजीच्या मृत्युनंतर जानोजीची

पत्नी दर्याबाई आणि साबाजी यांनी काय काय कारस्थाने केलीत ह्याचे जरी विस्तृत वर्णन आढळत नसले तरी साबाजी–मुधोजी वादामुळे नागपूर दरबारातील सर्वच ज्येष्ठ मुत्सद्यांची मोठी नाजूक स्थिती झाली होती व त्यांना दोघांनाही दुखविता येत नव्हते असे दिसून येते. भवानी पंडिताच्या ह्या बखरीत भवानी पंडित आणि त्याच्यासारखे जे ज्येष्ठ मुत्सद्दी होते त्यांच्या मानसिक स्थितीचे उत्तम वर्णन केलेले आढळते. " त्या दिवसामधे जितके जुने मुतसदी होते तितक्याचे चितात की उभयेता श्रीमंतांचा खरकशा न वाढावा, दौलतीचा बंदोबस्त व्हावा परंतु नवीन कारभारी रा ॥ भवानी सिवराम व नाना जोसी व नाना करांडे वगैर याणी दूरदेसी न करीता उभयेता श्रीमंतांच्या लढाईचा प्रसंग नमूद केला."

१२. पांचगावची लढाई (२६ जानेवारी १७७५)

मुधोजी आणि साबाजी यांच्या संघर्षाची परिणती प्रथमतः कुंभारीची लढाई (जानेवारी १७७३) आणि शेवटी पांचगावच्या लढाईत (२६ जानेवारी १७७५) झाली. भवानी पंडिताच्या ह्या बखरीत जानोजीच्या मृत्युनंतर कुंभारीची जी लढाई झाली आणि त्यानंतर साबाजी–मुधोजी यांच्यात २८ जानेवारी १७७३ रोजी जो करार झाला त्यांचा अजिबात उल्लेख आढळत नाही. भवानी पंडिताने ह्या दोन भावांच्या आपसातील संघर्षात अजिबात भाग घेतला नाही असाच निष्कर्ष आपल्याला त्यावरून काढावा लागतो. पुण्याला नारायणराव पेशव्याचा खून झाल्यानंतर खुनी महंमद ईसफ हा नागपूरला आला व त्याला मुधोजीने आश्रय दिला. त्याही कारस्थानात भवानीपंत असलेला आढळून येत नाही. पलीकडे साबाजी आणि मुधोजी यांच्यातील संघर्ष वाढतच गेला व शेवटी त्याची परिणती पांचगावच्या लढाईत घडून आली (२६ जानेवारी १७७५). त्या लढाईचा सविस्तर वृत्तांत, त्यातील भवानी पंताची भूमिका, त्याने केलेला पराक्रम, लढाईत त्याला झालेल्या जखमा इत्यादींची सविस्तर हकिकत आपल्याला या बखरीत आढळून येते.

पांचगावच्या लढाईचा वृत्तांत गुप्तेकृत नागपूर बखरीत किंवा यादव माधव काळे यांच्या नागपूर प्रांताच्या इतिहासात आणि त्याचप्रमाणे ह्या बखरीत जरी साधारणपणे एकसारखा आढळून येत असला तरी भवानी पंडिताबद्दलचा जो वृत्तांत त्यात आढळून येतो त्यात मात्र बरीच तफावत

आढळून येते. पांचगावच्या लढाईत साबाजी गोळी लागून ठार झाल्यानंतर स्वामिनिष्ठ भवानीपंडिताने मुधोजीच्या सैन्यावर हल्ला चढविला परंतु गोविन्द दादो आणि रामचंद्र दादो यांनी आता साबाजी मृत झाला तेव्हा कशाकरिता लढता असा प्रश्न केला. त्यांचे बोलणे चालू असतांनाच दोन्ही बाजूला गडबड उडून भवानी पंडितावर हल्ला होऊन त्यात भवानी पंडित जखमी झाला अशी हकिकत आपल्याला ह्या बखरीत आढळते, तर यादव माधव काळे यांनी संपादित केलेल्या "नागपूर प्रांताच्या इतिहासात" आणि गुप्तेकृत "नागपूरकर भोसल्यांच्या बखरीत" मात्र "साबाजी मारला गेला परंतु त्याचेकडची विजयाची नौबत वाजविण्यात आली. त्यामुळे साबाजीची फते झाली असे समजून सरदार मुजऱ्यास आले. पाहतात तो मुधोजीला विजय मिळालेला दिसला. भवानी काळो यांनी दुरून हा प्रकार पाहून रणांगणाहून परत जावयास निघाले तेव्हा आरोळे सुभेदाराच्या एका हस्तकाने त्यास गाठून त्याचेवर वार केला." अशा प्रकारची हकिकत दिलेली आढळते. भवानी पंडिताच्या बखरीत दिलेली हकिकत ही जास्त सुसंगत आणि भवानी पंडिताच्या स्वभावाला अनुसरून वाटते. साबाजीशी निष्ठा ठेवणारा आणि कटक प्रांतात अमाप पराक्रम गाजविणारा भवानी पंडित रणांगणावरून निघून जाईल किंवा पळून जाईल अशी शक्यता दिसत नाही. पांचगावच्या लढाईत भवानी पंडिताला जखमा झाल्याचा उल्लेख बखरीत आढळतो. येव्हढा मातबर सरदार जखमी झाल्याचे पाहून मुधोजीने स्वत: जातीने भवानी पंडिताची शुश्रुषा केली आणि त्याच्या जखमा बऱ्या होईपावेतो त्याला जवळ ठेवून घेतले. औरंगाबादच्या एका कुंभाराने भवानी पंडिताच्या डोळ्यावर उपचार केल्याचा उल्लेख ह्या बखरीत आढळतो. यानंतर मुधोजीने दिवाणपद पुन्हा भवानीपंडिताकडे सोपविले.

१३. निजामाची पवनारची स्वारी

मुधोजीने प्रारंभापासून रघुनाथरावाला पाठिंबा दिला. त्यामुळे बारभाई मंत्रीमंडळ मुधोजीला अनुकूल नव्हते. इतकेच नव्हे तर मुधोजीला शह बसावा म्हणून बारभाई मंत्रीमंडळाने उमरावतीकर शिवाजी भोसल्याला सेनासाहेब सुभ्याची सनद दिली आणि त्याने नागपूरला मुधोजीचे उच्चाटण करून स्वत:ची सत्ता स्थापन करावी असे सतत प्रोत्साहन दिले. अमरावतीकर भोसल्याने साबाजीचे अनुयायी आपल्या भोवती जमविले, नवीन सैन्य उभारले आणि

इतकेच नव्हे तर निजामाची मदत त्याने मागितली. भवानी पंडिताच्या ह्या बखरीत अमरावतीकर भोसल्यांच्या ह्या बंडाचा उल्लेख आढळत नाही. परंतु साबाजीचा इ. स. १७७५ मध्ये मृत्यु झाल्यानंतर निजामाने त्या परिस्थितीचा ताबडतोब फायदा घेऊन जी नागपूरवर स्वारी केली आणि आपल्या फौजेसहित तो जो पवनार पावेतो आला त्याचा उल्लेख आपल्याला ह्या बखरीत आढळतो. अर्थात अमरावतीकर भोसल्याला मदत करण्याकरिताच तो आला होता ही गोष्ट उघड आहे. यादव माधव काळयांच्या "नागपूर प्रांताच्या इतिहासात" आपल्याला निजामाच्या ह्या पवनार स्वारीचा उल्लेख आढळत नाही परंतु गुप्तेकृत नागपूरकर भोसल्यांच्या बखरीत मात्र आपल्याला ह्या स्वारीची हकिकत सापडते. (गुप्ते बखर पान १४६). निजामाच्या ह्या स्वारीत निजामाबरोबर त्याचा दिवाण रूक्नुद्दौला, निजामाचा दुसरा एक सरदार जफरुद्दौला इब्राहिमखान धौसा, जफरुद्दौलाचा सहाय्यक आणि प्रतिनिधी विकरुद्दौला इत्यादी सरदार सामील झाले होते. यावेळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन मुधोजीने बारभाई मंत्रीमंडळाशी मिळवून घेतले आणि याचवेळी निजामाकडे दिवाकरपंत चोरघडयांना पाठवून निजामाशीही समेट घटवून आणला. दिवाकरपंतांना ह्यावेळी रूक्नदौला, जफरुद्दौला आणि विकरुद्दौला यांची मोठी मदत झाली व त्यांच्याच मध्यस्थीने पूर्वी वऱ्हाडची वसुली ५५ : ४५ ठरली होती त्याचा हिशेब होऊन दर महिन्याला किती रकम मिळत जावी याचाही हिशेब ठरला. अशा रीतीने मुधोजीच्या राज्यावर निजामाच्या स्वारीचे जे संकट आले होते ते टळले.

१४. नाना फडणिसाचा इंग्रजांविरुद्ध केलेला अखिल भारतीय कट आणि भोसल्याने केलेला विश्वासघात : त्यातील भवानीपंडिताची भूमिका :

नारायणरावाच्या खुनानंतर रघुनाथराव पेशवा बनला. परंतु त्याच्याविरुद्ध बारभाईंनी गुप्त कारस्थान केल्यामुळे त्याच्या हातून सत्ता निसटली व तो मुंबईच्या इंग्रजांच्या आश्रयाला गेला. मुंबईच्या इंग्रजांनी रघुनाथरावाशी सुरतेचा तह केला.

परंतु तेव्हढ्यातच १७७३ चा नियमनाचा कायदा अंमलात येऊन गव्हर्नर-जनरल पदाची निर्मिती झाली व पहिला गव्हर्नर जनरल म्हणून वॉरन हेस्टिंग्ज याची नेमणूक झाली. त्याला मुंबईच्या इंग्रजांनी मराठ्यांशी चालत आलेले परंपरागत मैत्रीचे धोरण सोडावे असे वाटेना. म्हणून गव्हर्नर जनरल म्हणून त्याला जे वरिष्ठ अधिकार मिळालेले होते त्यांचा वापर करून त्याने सुरतेचा

तह रद्द करून घेतला आणि बारभाईमंत्रीमंडळाशी त्याने स्वतंत्रपणे पुरंदरचा तह केला. परंतु लवकरच तोही तह निष्प्रभ ठरला. आंतरराष्ट्रीय राजकारणात एक प्रचंड उलथापालथ घडली आणि त्यामुळे वॉरन हेस्टिंग्जच्या मराठ्यांच्या मैत्री-विषयक धोरणात आमूलाग्र बदल घडून आला. ती घटना म्हणजे अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध. ह्या स्वातंत्र्ययुद्धात इंग्लंडला अमेरिका ही वसाहत गमवावी लागली. ती बातमीं हिंदुस्थानात वॉरन हेस्टिंग्जला समजताच त्याला मोठे दुःख झाले. आपल्या मायभूमीने अमेरिका गमावले याची आपण कोठेतरी भरपाई केली पाहिजे असे त्याला वाटू लागले. यातून हिंदुस्थानात साम्राज्य स्थापन केले पाहिजे अशी महत्त्वाकांक्षा त्याच्या अंतःकरणात निर्माण झाली व त्यातून त्याने मराठ्यांविषयक परंपरागत मैत्रीच्या धोरणाचा त्याग केला.

मुंबईच्या इंग्रजांनी मराठ्यांच्या भांडणात रघुनाथरावाला लष्करी मदत देण्याचे जे धोरण अंमलात आणले होते त्या धोरणाला त्याने पाठिंबा दिला. ह्या धोरणानुसार मुंबईच्या इंग्रजांनी लष्करी मदत देऊन रघुनाथरावाला पुण्याचे पेशवेपद मिळवून देण्याचा प्रयत्न केला परंतु मुंबईच्या इंग्रजास उत्तर हिंदुस्थान, बुंदेलखंड आणि कलकत्ता ह्याठिकाणच्या फौजा मदतीला पाठविल्याशिवाय त्यांच्या कार्यात त्यांना यश मिळणार नाही हे वॉरन हेस्टिंग्जला पक्के माहीत होते. म्हणून त्याने जनरल गोडार्ड याला काही सैन्य घेऊन कलकत्याहून पाठविले. ह्या सैन्याचा मार्ग नर्मदा नदीच्या काठाकाठाने जात होता व हा सारा प्रदेश मुधोजी भोसले याच्या ताब्यात होता. मुधोजी आणि इंग्रजांचे संबंध मित्रत्वाचे असल्याने मुधोजीने ह्या प्रदेशातून इंग्रज सैन्याच्या ने–आणीला परवानगी दिली. पुढे मुंब-ईच्या इंग्रजांनी ज्यावेळी रघुनाथरावाला बोरघाटातून पुण्याला पोहोचविण्याचा प्रयत्न केला त्यावेळी मराठ्यांनी इंग्रजांची तळेगाव ह्याठिकाणी चोहोबाजूंनी नाकेबंदी केली आणि त्यामुळे इंग्रजांना शरण जावे लागून त्यांना दिनांक १७ जानेवारी १७७९ रोजी वडगावच्या अपमानास्पद तहावर सही करावी लागली. ह्या तहावर मुंबईकर आणि कलकत्तेकर इंग्रजांनी सही करून शरणागती घेतली. तळेगावला अडचणीत सापडलेले इंग्रज सैन्य मुंबईला सुरक्षित परत आले आणि त्याच दिवशी वॉरन हेस्टिंग्ज याने वडगावचा तह आम्हाला मान्य नाही असे कल-कत्याहून जाहीर केले.

इंग्रजांनी उघडउघड हा विश्वासघात केला. त्यामुळे संतप्त होऊन नाना फडणिसाने इंग्रजांविरुद्ध एक अखिल भारतीय कट आंखला. त्यात एका विशिष्ट

तारखेला ब्रिटिश विरोधी सर्व सत्ताधीशांनी इंग्रजांविरुद्ध उठाव करावा आणि इंग्रजांचे उच्चाटण करावे असे निश्चित करण्यात आले. या कटात चार प्रमुख राज्यांनी भाग घेतला होता. ती चार प्रमुख राज्ये किंवा चार प्रमुख भागिदार म्हणजे पेशवा, निजाम, हैदरअली आणि भोसले. बारभाई मंत्रीमंडळाने अति दडपण आणल्याने मुधोजी ह्या कटात नावापुरता सामील झाला. परंतु बेनीरामपंडितामार्फत तो आतून इंग्रजांना सामील झाला होता. कटातील योजनेनुसार भोसल्याने आपल्या फौजा बंगालवर पाठवाव्या असे ठरले होते. मुधोजीने संतुष्ट असावे म्हणून गढा–मंडला प्रांताच्या सनदा सुद्धा नाना फडणिसाने भोसल्यांच्या नावाने करून दिल्या. ह्या योजनेनुसार मुधोजीने आपला पुत्र चिमणाबापू उर्फ खंडोजी भोसले याला ४०००० सैन्यासह नागपुरहून रवाना केले. भवानी पंडित याला मुद्दामहून चिमणाबापूबरोबर पाठविण्यात आले. परंतु मुधोजीने मार्गात जितका विलंब लावता येईल तितका विलंब खंडोजीने लावावा अशा गुप्त सूचना दिलेल्या होत्या. त्यानुसार खंडोजी आणि भवानी पंडित याने रस्त्यात सात आठ महिने फुकट गमाविले. ही सर्व हकिकत ह्या बखरीत आलेली आहे.

ह्याच वेळी हेस्टिंग्जने हैदरशी लढण्याकरिता म्हणून कर्नल बेली याच्या नेतृत्वाखाली काही सैन्य पाठविले होते व ते सैन्य कटकमार्गे मद्रासला जाणार होते. त्याला चिमणाजी उर्फ खंडोजी भोसले याने सर्व मदत दिली. इतकेच नव्हे तर मद्रासपर्यंत इंग्रज सैन्य जातांना त्यांना ज्या ज्या अडचणी येतील त्या सर्व अडचणींचे मी निराकरण करीन असे चिमणाजीने वचन दिले. परंतु भवानी पंडित ह्या सर्व गोष्टींच्या विरुद्ध होता. मुधोजीचे विश्वासघाताचे धोरण त्याला अजिबात पसंत नव्हते. परंतु मुधोजीच्या स्पष्ट हुकुमापुढे त्याचे काही चालत नव्हते. ह्याबाबतीत पेशव्यांचा वकील नारोपंत याने नाना फडणिसाला कटकहून जे पत्र लिहिले ते भवानीपंताच्या चारित्र्यावर प्रकाश पाडणारे आहे. "हल्ली इंद्रसेनसाहेब बडे साहेबाकडून बोलणे करावयास आला आहे. तो बारा लक्ष देतो. पूर्वी तीस लक्ष दिले. त्यास भवानीपंत म्हणतो माझा प्राण गेल्यावर पाहिजे ते करा. परंतु मी ही गोष्ट घडू देणार नाही." (ऐ. रि. सरदेसाई, उत्तर भाग २, पान ३२४; यादव माधव काळे, ना. भो. इ. पान १७२). ह्या सर्व प्रकरणात नाना फडणिसाला भोसल्यांनी धोका देऊ नये आणि कटक प्रांतातून इंग्रजी सैन्याला मद्रासला जाण्याची अनुमती देऊ नये असे भवानीपंडिताचे मत होते असे दिसून

येते. परंतु मुधोजीच्या आज्ञेपुढे भवानी पंडित निष्प्रभ ठरला. पुढे भोसल्यांची म्हणजे चिमणाजी भोसल्याची अनुमती मिळविण्याकरिता हेस्टिंग्जने अँडरसन नावाच्या वकीलाला पाठविले व त्याने शेवटी ओरिसातून इंग्रज सैन्य नेण्याला अनुमती मिळविण्यात यश मिळविले. इतकेच नव्हे तर हैदरअलीशी लढण्याकरिता म्हणून भोसल्यांनीही आपले निवडक २००० सैनिक कर्नल पियर्स याच्याबरोबर पाठवावे यालाही संमती मिळविली. मुधोजी, राजारामपंत, दिवाकरपंत ह्यांच्या इंग्रज–धार्जिण्या धोरणाचाच हा परिणाम होता. भवानीपंडित ह्या धोरणाशी सहमत नव्हता हे ह्या बखरीतील वृत्तांतावरून स्पष्ट होते. परंतु ह्या सर्व प्रकरणात भवानीपंत आणि राजाराम यांना अँडरसन याने दोन तीन लक्षाची लाचलुचपत देण्याचा प्रयत्न केला. परंतु ह्या दोघांनीही अशी लांच घेण्याचे नाकारले हे लक्ष्यात घेण्यासारखे आहे. यावरून सुद्धा भवानीपंताचे चारित्र्य किती उज्ज्वल होते ते दिसून येते. (Forest's Selections, Vol. II pp. 240; यादव माधव काळे, नागपूर प्रांताचा इतिहास पान क्र. १८३, नवीन आवृत्ती.)

१५. इब्राहिम बेग धौशा उर्फ जाबेताजंग जफरुद्दौला याचा मुलगा येहतीशामजंग याची निजामाविरुद्ध बंडाळी आणि ती मोडण्याकरिता भवानी पंडिताचा दुसरा मुलगा यशवंतराव याची रवानगी (१७८३).

जफरुद्दौला हा निजामाचा मोठा मातबर सरदार होता. भोसले, पेशवा, निजाम यांच्या राजकारणात आणि लढायात त्याने वारंवार भाग घेतलेला आपल्याला आढळून येतो. त्याच्याकडे निर्मल वगैरे किल्ले आणि भरपूर संपत्ती होती. सैन्यही चांगल्या दर्जाचे होते. जफरुद्दौलाच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा येहतीशामजंग हा त्याच्या गादीवर आला. परंतु गादीवर आल्यानंतर त्याने निजामाशी उद्दामपणाचे वर्तन करून बंडाळी माजविली. (१७८३ च्या आरंभी). त्यामुळे निजामाला त्याच्याविरुद्ध एक मोहीम उभारावी लागली. त्यालाच आपण "निर्मळची मोहीम" असे म्हणतो. ती मोहीम तीन महिने चालू होती व ह्या मोहिमेत आपल्याला पेशव्यांनी आणि भोसल्यांनी सहकार्य द्यावे आणि मदतीला सैन्य पाठवावे अशी विनंती निजामाने केली होती. निजामाने लिहिले, "जे आमचे घरचे खानाजाद आस्ता गैरचालीवर लक्ष देऊन चवघा लुच्याचे सोहबतीने लागून सरकारसी बेआदबीस प्रारंभ केला" म्हणून आम्हाला मदत करा असा निजामाच्या लिहिण्याचा सारांश होता. निजामाच्या विनंतीवरून

मुधोजीने भवानीपंताचा दुसरा मुलगा यशवंतराव याला फौज घेऊन निजामाच्या मदतीस पाठविले. यशवंतरावाने येहतीशामजंगाशी ज्या दोन तीन लढाया केल्या त्यात बरीच कर्तबगारी दाखविली. शेवटी येहतीशामजंगाची बंडाळी मोडून पडली. ह्या संघर्षात निजामाचा दिवाण रूक्नद्दौला याचा भाऊ शरफुद्दौला हा ठार मारला गेला. मनात कोणताही राग न ठेवता निजामाने येहतीशामजंगाला क्षमा केली. ह्या बंडाळीचा बिमोड करण्यात यशवंतरावाने जी मदत केली त्याकरिता म्हणून निजामाने त्याला हैद्राबादला नेऊन त्याचा तिथे मोठा बहुमान केला.

येहतीशामजंगाची बंडाळी मोडण्याकरिता भवानीपंडिताच्या दुसऱ्या मुलाला म्हणजे यशवंतरावाला जे पाठविण्यात आले त्या हकिकतीचा उल्लेखही यादव माधव काळे यांच्या "नागपूरकर भोसले यांचा इतिहास" (नवीन आवृत्ती) ह्या ग्रंथात आढळत नाही. गुप्तेकृत "नागपूरकर भोसल्यांची बखर" ह्या ग्रंथात मात्र त्याचे त्रोटक उल्लेख आढळतात. (गुप्ते "नागपूरकर भोसल्यांची बखर" पान नं. १६०). ह्या दृष्टीने ह्या बखरीत आलेली ही सर्व माहिती नवीन आणि ऐतिहासिक दृष्टीने महत्वाची समजली पाहिजे.

१६. गाविलगड येथील संतोकसिंगाचे बंड (१७८५)

इ. स. १७८५ मध्ये नाना फडणिसाने टिपू सुलतानावर स्वारी करण्याचे ठरविले. तीच स्वारी पलीकडे "बदामीची स्वारी" म्हणून ओळखल्या गेली. ह्या स्वारीत मुधोजी भोसल्याने सुद्धा सामील व्हावे अशी नाना फडणिसाने विनंती केली. त्या स्वारीबाबत सल्लामसलत करण्याकरिता म्हणून मुधोजी ह्यावेळी पुण्याला गेला. ह्या निमित्ताने मुधोजीने खंडोबाच्या यात्रेकरिता आपली बायकामुलेही आपल्या सोबत नेली. मुधोजीच्या ह्या गैरहजरीचा फायदा घेऊन गाविलगडचा किल्लेदार प्रमोदसिंग याच्या नात्यातील संतोकसिंग नावाच्या एका नातेवाईकाने बंडाळी पुकारून गाविलगडचा किल्ला आपल्या ताब्यात घेतला. संतोकसिंगाची ही बंडाळी भवानीपंडिताने कशी युक्तीने मोडून काढली याची विस्तृत हकिकत पहिल्यांदाच इतक्या तपशीलवार ह्या बखरीद्वारे समोर येत आहे. यादव माधव काळे यांनी लिहिलेल्या "नागपूरकर भोसल्यांचा इतिहास" (नवीन आवृत्ती) यात तर ह्या संतोकसिंगाच्या बंडाचा उल्लेख सुद्धा नाही. गुप्तेकृत "नागपूरकर भोसल्यांच्या बखरीत" मात्र ह्या प्रकरणाचा उल्लेख

पान नं. १६१ वर आलेला आहे. परंतु तोही अतिशय त्रोटक आहे. त्या दृष्टीने गाविलगडला संतोकसिंगाच्या नेतृत्वाखाली झालेले हे बंड ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाचे आहे. यातील माहितीही सर्व दृष्टीने नवीन आहे. मुधोजी भोसले पुण्याला गेले ही संधी साधून गाविलगडचा किल्ला संतोकसिंगाने जबरदस्तीने आपल्या ताब्यात घेतला. हा संतोकसिंग गाविलगडच्या किल्लेदाराचा भाचा असे ह्या बखरीत दिलेले आढळते तर गुप्ते ह्यांच्या बखरीत तो गाविलगडचा किल्लेदार प्रमोदसिंग याचा चुलता झार्मसिंग जमादार याचा मेहुणा होता अशी माहिती दिलेली आढळते (गुप्तेकृत नागपूर बखर पान नं. १६१.) पुण्याला ह्या बंडाची हकिकत कळली त्यावेळी मुधोजी ताबडतोब नागपूरला परत येण्यास निघाला. त्याच्या परत येण्याची वार्ता कळताच भवानी पंडित हे मुधोजीला भेटण्याकरिता बाळापूरपर्यंत आले. तिथेच त्यांची भेट घडून आली. मुधोजीने संतोकसिंगाची समजूत घालण्याकरिता संताजी नाईक, माहादाजी नाईक आणि कुशाबा चिटणीस यांना पाठविले. परंतु संतोकसिंग कोणाचेच ऐकण्याच्या मनः-स्थितीत नव्हता. शेवटी काहीतरी युक्ती करूनच ही बंडाळी मोडून काढली पाहिजे असे भवानीपंडिताने सुचविले व त्याकरिता संतोकसिंगाची भेट घेण्याकरिता गाविलगडावर प्रथमतः मीच जातो आणि माझ्या मागोमाग मुधोजीने काही वेळाने येऊन पोहोचावे व मी खूण करताच इतरांनी तिथल्या तिथे संतोकसिंगाला अटक करावी, अशी मसलत भवानी पंडिताने सुचविली. ह्या योजनेनुसार " भवानीपंत आबा यांनी संतोकसिंग याचा हात धरून सरकारचे पायावर घालावयास आनला. तो इतकियात इशारा जाला आस्ता जे मातबर सरदार गुलाम आलीखान, आमीखान छेपारेवाले वगैरे मोटमोटे सरदार यानीच त्याजला धरून त्याचे मुशके बांधले." संतोकसिंगाच्या सैन्याला निःशस्त्र करण्याचे कार्य पांडुरंगपंत म्हणजे भवानीपंडिताच्या पुतण्याने व त्याच्या सैन्याने केले. अशा रीतीने भवानीपंडिताच्या शकटभेदाने किंवा युक्तीने गाविलगडाची ही बंडाळी मोडून पडली. गुप्ते यांच्या " नागपूरकर भोसल्यांच्या बखरीत " " प्रमोद सिंगाचा मेहुणा संतोकसिंग याची भेट घेऊन तेथे शकटभेद करून किल्ल्याच्या दरवाजाजवळ संतोकसिंगाची भेट सेनाधुरंधराशी झाली. ही कामगिरी कृष्णराव माधव यांनी केली " (गुप्ते नागपूरकर भोसले यांची बखर पान नं. १६२.) हा जो वृत्तांत दिलेला आहे तो बरोबर नाही असे ह्या बखरीतील वृत्तांतावरून दिसून

येते. ही सर्व भेट आणि हा सर्व बनाव भवानीपंडित याने घडवून आणला हे यावरून दिसून येते.

१७. बदामीची मोहीम १७८६

पेशवे, निजाम आणि भोसले ह्या तिघांनी मिळून एप्रिल १७८६ मध्ये टिपू सुलतानाविरुद्ध ही बदामीची मोहीम केली. ह्या मोहीमेत भोसल्यांतर्फे चिमणाबापू उर्फ सेनाबहादुर खंडोजी भोसले हा हजर होता आणि खंडोजी भोसल्याने ह्या मोहिमेत अमाप पराक्रम केला अशा प्रकारचा वृत्तांत आपल्याला गुप्तेकृत नागपूर बखरीत आढळतो. (गुप्तेकृत नागपूर बखर पान नं. १६२, काळे ना. भो. ई. पान नं. २९३). भवानी पंडिताच्या ह्या बखरीत दिलेल्या वृत्तांतावरून भवानी पंडित आणि मुधोजी भोसले हे ह्या बदामीच्या स्वारीत हजर नव्हते असे दिसून येते.

१८. भवानीपंडिताची काशीयात्रा–बिंबाजी, मुधोजी, चिमणाबापू यांचे मृत्यु आणि त्याचे नागपूर राजकारणावर झालेले परिणाम

इ. स. १७८८ मध्ये भवानीपंडिताने काशीयात्रा करण्याची इच्छा व्यक्त केली. मुधोजीला भवानीपंडिताने नागपूर सोडू नये असे वाटत होते परंतु शेवटी भवानीपंडिताची तीव्र इच्छा लक्ष्यात घेऊन मुधोजीने भवानीपंडिताला काशीयात्रा करण्याची अनुमती दिली. वडील मुलगा बळवंतराव याला घेऊन भवानीपंत काशीयात्रेला निघून गेला. परंतु तो जात नाही तोच नागपूरला मुधोजीचा १९ मे १७८८ रोजी मृत्यू झाला. त्यामुळे भवानी पंडिताला काशीहून घाईघाईने नागपूरला परत यावे लागले. मुधोजीच्या मृत्युचे नागपूरच्या राजकारणावर दूरगामी परिणाम घडून आले. अगोदरच्या डिसेंबरात रतनपूरला बिंबाजी भोसलेचा मृत्यु झाला होता. (७ डिसेंबर १७८७). त्यातच मुधोजीचाही मृत्यु घडून आला. त्यामुळे भवानी पंडिताचे कर्तृत्व जाणणारी जुनी पिढी निघून गेली. राजकारणात सल्लामसलत करावी अशी ज्येष्ठ व्यक्ती येव्हढेच महत्त्व आता भवानीपंडिताला राहिले. परंतु भवानीपंडिताच्या घराण्यातील इतर मुले आता राजकारणात समोर आली. भवानीपंडिताचा मुलगा बळवंतराव आणि यशवंतराव आणि पुतण्या पांडुरंग गणेश हे आता समोर आले. ही सर्व मुले लढाऊ होती. पांडुरंग गणेश याला सैन्याची बक्षीगिरी मिळाली व ती त्याच्याच घराण्यात पुढे चालू राहिली.

भोसल्यांच्या राज्यात पेचप्रसंगाच्या वेळी भवानी पंडिताचा सल्ला जरूर घेतला जाई. परंतु रघुजी दुसरा आणि भवानी पंडित यांच्यात विशेष प्रेम राहिले नाही असे दिसून येते. भवानी पंडिताच्या घराण्याने भोसल्यांची तितक्याच निष्ठेने सेवा केल्याने या पलीकडच्या इतिहासात सुद्धा काळो घराण्याला तितकेच महत्त्व आणि प्रतिष्ठा प्राप्त झाली.

१९. १७९० मधील कॉर्नवालिसची टिपू सुलतानाविरुद्ध मोहीम–भवानी पंडिताचा वडील मुलगा बळवतराव याने त्यात गाजविलेली कर्तबगारी

मुधोजीच्या मृत्युनंतर पुढल्याच वर्षी म्हणजे इ. स. १७८९ मध्ये मुधोजीचा दुसरा मुलगा चिमणाबापू उर्फ खंडोजी भोसले याचा दिनांक ११ ऑगस्ट १७८९ रोजी एकाएकी मृत्यु झाला. त्यानंतर कॉर्नवालिस याने आपल्या तटस्थतेच्या धोरणाला अपवाद करून म्हैसूरचा राजा टिपू सुलतान ह्याच्याविरुद्ध एक मोहीम उभारली. त्या मोहिमेत त्याने मराठे आणि निजाम यांचे सहकार्य मागितले. भोसल्यांनी आपल्या ह्या मोहिमेत सामील व्हावे म्हणून त्यांचे मन वळविण्याकरिता कॉर्नवालिसने जॉर्ज फॉस्टर नांवाचा एक वकील नागपूरला पाठविला (१७८८) त्याचाही उल्लेख आपल्याला ह्या बखरीत आढळतो. भोसल्यांनी इंग्रजांची विनंती मान्य करून आपल्या तर्फेने भवानी पंडिताचा वडील मुलगा बळवंतराव याजला ७००० फौजेनिशी रवाना केले. बळवंतरावाबरोबर निजामातर्फे त्याचा मुलगा पोलादजंग, कारभारी मुशीरउलमुल्क इत्यादी सामील झाले होते. बळवंतरावाने ह्या मोहिमेत बरेच नांव कमाविले त्याचा वृत्तांत आपल्याला ह्या बखरीत आढळतो. गुप्तेकृत नागपूर बखरीत किंवा यादव माधव काळे यांच्या "नागपूरकर भोसल्यांच्या इतिहास" ह्या ग्रंथात हा वृत्तांत त्रोटक आढळतो.

२०. १७९३–९४ मधील छत्तीसगडातील जमिनदारांची बंडाळी

बिंबाजीचा मृत्यु झाल्यानंतर (१७८७) बिंबाजीची पत्नी आनंदीबाई हिने छत्तीसगडचा कारभार स्वतः पाहिला परंतु त्यानंतर रघुजीने छत्तीसगडचा कारभार स्वतःकडे घेतला आणि आपल्या तर्फेने आपले सुभेदार छत्तीसगडात पाठविले. प्रथम काही दिवस महिपतराव दिनकर याने या सुभ्याची व्यवस्था पाहिली. परंतु हा महिपतराव दिनकर हा व्यंकोजी भोसले किंवा मन्याबापू याच्याशी आतून काहीतरी गुप्त कारस्थान करतो अशी शंका रघुजी दुसरा याला

आली आणि ह्या दोन भावात विशेष सख्य नसल्याने रघुजीने महिपतराव दिनकरला काढून त्याच्याजागी आपल्या विश्वासातला विठ्ठल दिनकर याला छत्तीसगडात नेमले. ह्या विठ्ठल दिनकराविरुद्ध इ. स. १७९३-९४ ह्या वर्षी छत्तीसगडातल्या जमिनदारांनी उठाव केला. त्यावेळी ती बंडाळी मोडून काढण्याकरिता रघुजी दुसरा याने भवानीपंताचा पुतण्या पांडुरंगपंत दादा याचा वडील मुलगा रघुतपराव याला सैन्य घेऊन पाठविले. रघुपतरावाने छत्तीसगडातील जमिनदारांची बंडाळी मोडून काढली आणि पुन्हा विठ्ठल दिनकर याची नेमणूक केली. १७९४ मध्ये छत्तीसगडात ही जी बंडाळी झाली आणि रघुपतरावाने हा जो पराक्रम केला त्याची हकिकत गुप्ते यांच्या नागपूर बखरीत किंवा यादव माधव काळे यांच्या ग्रंथात आलेली नाही. त्या दृष्टीने ही सर्व हकिकत ह्या बखरीत नवीन आलेली आहे.

२१. खडर्याची लढाई १७९५

निजाम आणि पेशवे यांच्यात १७९५ मध्ये जो संघर्ष घडून आला त्या संघर्षाची हकिकतही ह्या बखरीत आलेली आहे. भोसल्यांनी ह्या लढाईत सामील व्हावे असा नाना फडणिसाने खास खलिता पाठविलेला होता. त्यानुसार विठ्ठलराव सुभेदार याच्या नेतृत्वाखाली भोसल्यांनी आपले सैन्य पाठविले. भवानी पंडिताच्या घराण्यात लष्करी परंपरा असल्याने तेही ह्या लढाईत सामील झाले असे ह्या बखरीतील वृत्तांतावरून दिसून येते. स्वत: भवानीपंत हा जरी ह्या लढाईवर गेला नाही तरी त्याची दोन मुले यशवंतराव, माधवराव आणि पुतण्या पांडुरंगपंत आणि ह्या पुतण्याचा मुलगा रघुपतराव हे सर्व आपल्या फौजा घेऊन खडर्याच्या लढाईत उपस्थित होते. ह्या सर्वांनी खडर्याच्या लढाईत फार मोठा पराक्रम केला असे बखरीतील वृत्तांतावरून आढळून येते.

२२. सवाई माधवरावाचा मृत्यु आणि पेशवे पदाकरिता विविध कारस्थाने :

खडर्याच्या लढाईनंतर दुर्दैवाने मराठ्यांचा भावी पेशवा सवाई माधवराव याने आत्महत्या करून घेतल्याने मराठ्यांचा उत्कर्षाचा काळ जवळजवळ संपुष्टात आला. सवाई माधवरावाच्या मृत्युनंतर नाना फडणिसाने पेशवेपदाकरिता जी कारस्थाने केलीत त्याची सर्व हकिकत ह्या बखरीत आलेली आहे. शेवटी त्या कारस्थानात दुसऱ्या बाजीरावाचा विजय झाला आणि बाजीराव पेशवा बनला. त्यावेळी नाना फडणिसाने शिंदे, रघुजी भोसले आणि इतर मराठा

सरदारांनी आपल्या सैन्यासह पुण्याला यावे आणि पेशवेपदाची घडी नीट बसवावी अशी खास विनंती केली होती. त्यावेळी त्या विनंतीनुसार रघुजी दुसरा याने स्वतः पुण्याला जाऊन तिथे मुक्काम केला असा वृत्तांत ह्या बखरीत आलेला आहे. आपल्याबरोबर जे सरदार त्याने नेले होते त्यात भवानीपंडिताची मुले यशवंतराव, माधवराव, पुतण्या पांडुरंग (गणेशपंताचा मुलगा) आणि त्याचा मुलगा अमृतराव पांडुरंग यांचा समावेश होता. ह्याही राजकारणात दुसऱ्या रघुजीबरोबर भवानी पंडिताचे सारे कुटुंबच भोसल्यांच्या मदतीला होते असे बखरीतील वृत्तांतावरून दिसून येते. ही सर्व माहिती नवीनच आहे

२३. चौरागड, मंडला इत्यादी प्रदेशांवर रघुजीचा ताबा :

नागपूरच्या भोसल्याने नाना फडणिसाला सतत सहकार्य दिल्याने त्यांचा फायदाच झाला. खडर्याच्या लढाईनंतर मंडला प्रांताच्या सनदा भोसल्याला मिळाल्या. विठ्ठलपंत सुभेदारामार्फत त्याने त्या ठिकाणी अंमल बसविला. नाना घाटगे ह्याला तिथे प्रमुख अधिकारी म्हणून नेमण्यात आले. याचवेळी भवानी-पंताचा पुतण्या पांडुरंगपंत याचा मुलगा रघुपतराव याला नर्मदेच्या काठी पाठविण्यात आले. त्याने चौरागड, रेवा आदि ठिकाणी भोसल्यांची सत्ता स्थापन केली. खडर्याच्या लढाईनंतरचा काळ भोसल्यांच्या उत्कर्षाचा काळ समजला पाहिजे. कारण भोसल्यांची सत्ता ह्यावेळी उत्तरेत नर्मदेपासून तो दक्षिणेत गोदावरी व पश्चिमेस वऱ्हाडपासून तो पूर्वेस समुद्रकिनाऱ्यापर्यंत स्थापन झालेली होती.

यशवंतराव होळकर याचे नागपूरास पलायन आणि वसईचा तह :

दुसरा बाजीराव पेशवा झाल्यानंतर तो दिवसेंदिवस दौलतराव शिंद्यावर जास्त जास्त अवलंबून राहू लागला. वास्तविक त्याने आपल्या सर्व मराठा सरदारांना समभावाने वागवावयास हवे होते. परंतु त्याने तसे न करता होळकर घराण्याविषयी मनात आकस धरून त्या घराण्यातील कर्त्या पुरुषांना अतिशय वाईट वागविले. दौलतराव शिंदे याने होळकर घराण्याविषयी द्वेषबुद्धी बाळगल्याने पेशव्यानेही तेच धोरण होळकरांच्या बाबतीत अंमलात आणले. ह्याचा परिणाम अतिशय वाईट झाला. यशवंतराव होळकर याच काळात नागपूरात पळून आला. रघुजीने त्याला कोणताही आश्रय दिला नाही. उलट बंडखोर म्हणून भोसल्याने

त्याला काही दिवस नजरकैदेत ठेवले. ह्या नजरकैदेची जास्त हकिकत ह्या बखरीत मिळेल असे वाटले होते परंतु दुर्दैवाने वाचकांची याबाबतीत निराशा होते. ह्या नजरकैदेतून यशवंतराव निसटला आणि त्यानंतर तो मध्यहिंदुस्थानात निघून गेला. तिथूनच त्याने लढाईची तयारी केली आणि बाजीरावावर स्वारी केली. बाजीराव आणि यशवंतराव यांच्यात जी लढाई झाली त्याची हकिकत ह्याही बखरीत आढळते. ह्या लढाईत बाजीरावाचा पराभव झाला आणि परिणामी बाजीराव इंग्रजांच्या आश्रयाला निघून गेला. त्यानंतर बाजीरावाने इंग्रजांशी वसईचा तह केला. ही सर्व हकिकत ह्या बखरीत आलेली आहे. परंतु ह्या सर्व घडामोडीत भवानी पंडिताच्या काय हालचाली होत्या याचा निर्देश मात्र ह्या बखरीत आलेला नाही.

२५. गुलाबसिंगाच्या सैन्याची बंडाळी : भवानी पंडिताचा पुतण्या पांडुरंगपंत याने केलेला बंदोबस्त :

इ. स. १८०० च्या आपपास गाजीखान ह्या सरदाराने वऱ्हाडात दंगा माजविला. त्याचा बंदोबस्त करण्याकरिता गुलाबसिंग ह्या सरदाराला सैन्य आणि तोफखाना घेऊन वऱ्हाडात पाठविण्यात आले. तिकडे बंदोबस्ताकरिता मुक्काम असतांना त्याच्या सैन्याला दोन महिने पगार मिळाला नाही म्हणून त्या सैन्याने बंडाळी केली व तोफा ताब्यात घेऊन नागपूरकडे आपला मोर्चा वळविला. ह्या बंडाळीचो विस्तृत अशी हकिकत प्रथमतःच ह्या बखरीत आलेली आहे. यादव माधव काळे यांच्या "नागपूरकर भोसल्यांचा इतिहास" ह्या ग्रंथात ह्या बंडाळीचा उल्लेख सुद्धा आलेला नाही. गुप्तेकृत नागपूरकर भोसल्यांच्या बखरीत मात्र ह्या बंडाळीचा त्रोटक उल्लेख पान नं. १९४ वर आलेला आहे. त्या दृष्टीने ह्या वखरीत आलेली ही हकिकत नवीनच समजली पाहिजे. यावेळी नागपूरला विशेष सैन्य नव्हते. विठ्ठल बल्लाळ सुभेदार याच्या नेतृत्वाखाली बहुतेक सैन्य हुशंगाबाद आणि मंडला ह्याठिकाणी गेले होते. त्या दृष्टीने गुलाबसिंगाची बंडाळी ही नागपूर राज्यावर मोठेच संकट होते. अशा वेळी हे संकट निवारण्याचे कार्य भवानीपंताचा पुतण्या पांडुरंगपंत याने केले. बंडखोर सैनिक कोंढाळीच्या मैदानात येऊन पोहोचले आणि त्यांनी तिथून आपल्या मागण्या भोसल्यांना कळविल्या. शेवटी भवानीपंडिताचे पुतणे पांडुरंगपंत यांनी सैन्यासह बाजारगावापर्यंत धडक मारली आणि तिथून त्यांनी बंडखोरांशी संपर्क साधला. परंतु बंडखोर ऐकण्याच्या

मनस्थितीत नव्हते. व्याहाड ह्या ठिकाणी दोघांच्याही फौजा एकमेकांसमोर १०–१२ दिवस युद्ध करण्याच्या तयारीने उभ्या होत्या. पांडुरंगपंतांनी त्यांना युक्तीने नागपूरपर्यंत आणले. त्यानंतर वाटाघाटींना प्रारंभ केला. हिशेबाने १,८२,००० रु. चे देणे होते याही गोष्टीला त्यांनी कबुली दिली. परंतु बंड-वाल्यांच्या मनात नमते घ्यावयाचे नव्हते. पांडुरंगपंतांना त्यांचे मनोगत माहिती होते. बंडवाल्यांना युक्तीने नागपूरपर्यंत आणल्यानंतर पांडुरंगपंताने भेदनीतीचा उपयोग केला आणि युक्तीने बंडवाल्या लोकांना पकडून तुरुंगात टाकले. अशा रीतीने पांडुरंगपंताच्या चातुर्यामुळे गुलाबसिंगाच्या कंपूचे बंड मोडून पडले. ऐतिहासिक दृष्टया ही सर्व माहिती महत्त्वाची समजली पाहिजे.

२६. शिंद्यांना वसईचा तह पसंत पडला नाही : इंग्रजांविरुद्ध सर्वमान्य फळी उभारण्याचा प्रयत्न :

बाजीराव दुसरा इंग्रजांच्या आश्रयाला गेल्यानंतर आणि त्यानंतर त्याने वसईचा तह केल्यानंतर तो तह शिंदे–भोसले–होळकर यांना पसंत पडला नाही व त्यांना मराठा राज्याचे स्वातंत्र्य आपण गमावले असे वाटू लागले. अशा स्थितीत एकूण सर्व परिस्थिती समजावून सांगण्याकरिता म्हणून दौलतराव शिंदे यांनी बाळाजी यशवंत आणि त्यानंतर दिवाण यादवराव भास्कर यांना सर्वत्र पाठविले. त्यांनी वसईच्या तहामुळे मराठ्यांचे स्वातंत्र्य टिकून रहात नाही असे सर्व मराठा सरदारांना समजावून सांगितले. अशा पार्श्वभूमीवर शिंदे–भोसले–होळकर यांच्यात वाटाघाटी होऊन तिघांनी मिळून इंग्रजांविरुद्ध एक फळी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु दुर्दैवाने अशी संयुक्त आघाडी उघडण्यात त्यांना यश लाभले नाही, याची हकिकत यात आलेली आहे. यामुळेच इंग्रज–मराठा युद्ध जरी अपरिहार्य झाले होते तरी मराठा सरदारातील एकोप्याच्या अभावामुळे त्यात त्यांना यश लाभू शकले नाही.

२७. दुसरे–इंग्रज–मराठा युद्ध : अडगावची लढाई : भवानी पंडिताचा पुतण्या पांडुरंगपंत बक्षी याचा मृत्यु :

इंग्रज–मराठा दुसऱ्या युद्धाची सर्व हकिकत ह्या बखरीत आलेली आहे. ह्या दुसऱ्या युद्धात काळू कुटुंबियांतर्फे भवानीपंडिताचा पुतण्या पांडुरंगपंत दादा (गणेश पंताचा मुलगा) आणि पांडुरंगपंताची दोन मुले अमृतराव पांडुरंग आणि व्यंकटराव पांडुरंग ही सामील झाली होती.

ह्यावेळी भोसल्यांचा लष्करी तळ वऱ्हाडात अकोटच्या पश्चिमेस अडगाव ह्या ठिकाणी पडलेला होता. ह्याच ठिकाणी इंग्रज सेनापती वेलस्ली आणि स्टिव्हनसन यांनी भोसल्यांच्या सैन्यावर हल्ला चढविला व त्यातूनच २९ नोव्हेंबर १८०३ रोजी अडगावची लढाई घडून आली. ह्या लढाईत व्यंकोजी उर्फ मन्याबापू भोसले हजर होता. ह्याशिवाय स्वतः दौलतराव शिंदे आपल्या सैन्यानिशी ह्या रणक्षेत्रावर उपस्थित होता. अडगावच्या लढाईत मराठ्यांचा पराभव झाला. आत्तापर्यंत कोणत्याही लढाईत पांडुरंगपंत दादा ह्याचा पराभव झालेला नव्हता किंवा अपयशाचा कलंक त्याला कधीही लागलेला नव्हता. त्यामुळे ह्या अपयशामुळे तो खचून गेला. त्या निराशेच्या जबर धक्क्यानेच त्याला मृत्यु आला. त्याच्या मृत्युची हकिकत बखरीत पुढीलप्रमाणे आलेली आहे, " पांडुरंगपंत दादा यांनी ईश्वरास प्रार्थना केली जे मजला श्रीमंतांनी मुखत्यार करून याचे समागमे दिले व आजपावेतो जे गोस्ट जाली ते चांगलीच जाली. यैसे आपेश कधीच आले नाही. लढाईत मरावयास कमती केले नाही. परंतु आयुष्य बलवत्तर. मृत्यु न आला. आता हे वासना आहे. हे मुख मागती श्रीमंतास न दाखवावे. यैसी देवपुजेचे वेळेस कुलदेवतेची प्रार्थना केली आस्ता लढाईपासोन सातवे दिवसी दोन प्रहर रात्री देवाज्ञा जाली ". अशा रीतीने पांडुरंगपंतांना अपयशाच्या दुःखावेगाने मृत्यु आला. भवानी पंडिताचे कुटुंबीय भोसले घराण्याशी किती एकनिष्ठ होते याचीच ह्या हकिकतीवरून आपल्याला साक्ष मिळते. पराभव झाल्यानंतर आपल्या धन्याला आपले तोंड सुद्धा दाखवू नये असे पांडुरंगपंताला वाटले व त्यातूनच त्याचा मृत्यु घडून आला. काळू घराण्याच्या इतिहासात अशी कर्तव्यनिष्ठा जागोजागी दिसून येते. पांडुरंगपंताच्या मृत्युची ही हकिकत यादव माधव काळे यांच्या " नागपूर प्रांताच्या इतिहासात " किंवा गुप्तेकृत " नागपूर बखरीत " कोठेही दिलेली आढळून येत नाही. त्यादृष्टीने हे सर्व तपशील नवीन आहेत.

२८. इंग्रजांशी मैत्रीचा तह लवकर करावा–भवानी पंडिताचा सल्ला :

अशा रीतीने इंग्रजांनी भोसल्यांचा दारुण पराभव केला. त्यामुळे भोसल्यांची स्थिती चिंताजनक बनली. अशा परिस्थितीत भोसल्यांनी तह करावा असा इंग्रजांचा आग्रह चालूच होता. परंतु मनाचा लवकर निश्चय न झाल्याने भोसल्यांचे लवकर उत्तर येईना. त्यामुळे इंग्रज अतिशय अस्वस्थ झाले. म्हणून

इंग्रज सेनापती वेलस्ली याने आपला मोर्चा एलिचपूरकडे वळविला. तिथून त्याने आपले सैन्य गाविलगडाकडे पाठविले व गाविलगडाला वेढा दिला. गाविलगडाच्या ह्या वेढ्याची हकिकत ह्या बखरीत आलेली आहे. १३ डिसेंबर १८०३ रोजी गाविलगडाची ही लढाई घडून आली. तोफांचा जबरदस्त मारा करून इंग्रजांनी हा किल्ला जिंकून घेतला. त्यामुळे भोसल्यांची स्थिती अधिकच बिकट झाली. म्हणून नागपूरात मातुश्री चिमाबाईसाहेब यांनी राज्यातील ज्येष्ठ मुत्सद्दी भवानी पंडित यांना सल्लामसलतीकरिता बोलाविले. परिस्थितीचा पूर्ण विचार करून भोसल्यांनी इंग्रजांशी त्वरित तह करावा असा भवानी पंडिताने सल्ला दिला. ह्या सल्ल्यानुसार इंग्रज आणि भोसले यांच्यात १७ डिसेंबर १८०३ रोजी देवगावच्या तहावर सह्या करण्यात आल्या. ह्या तहानुसार कटक आणि बालासोर प्रांत आणि वर्धा नदीच्या पश्चिमेकडील भाग भोसल्याने इंग्रजांना आणि त्यांच्या सहाय्यकांना द्यावा. असे ठरविण्यात आले. देवगावचा तह इंग्रज–भोसले संबंधात महत्त्वाचा ठरला. त्यामुळे भोसल्यांना कटक प्रांत कायमचा गमवावा लागला. त्यामुळे भोसल्यांच्या राज्याचे उत्पन्न बरेच कमी झाले. ह्याशिवाय भोसल्यांची प्रतिष्ठाही कमी झाली.

२९. **भवानीपंताचा मृत्यु :**

इ. स. १८०७ मध्ये भवानी काळूचा मृत्यु झाला आणि अशा रीतीने एका कर्तबगार व्यक्तिमत्वाचा शेवट झाला. मृत्युच्या वेळी त्यांचे वय ८४–८५ असावे. फॉर्स्टर नावाचा एक इंग्रज वकील इ. स. १७८८ मध्ये नागपूरास आलेला होता. त्याने आपल्या वृत्तांतात भवानी काळू ७० वर्षांचा होता असे लिहिलेले आढळते. परंतु हाही केवळ अंदाज होता. भवानी काळोच्या एकूण कर्तृत्वाचा आढावा घेतल्यास त्याने सेनापती आणि दिवाण ह्या नात्याने बरीच कर्तबगारी गाजविली हे कबूल करावे लागते. कटकच्या कामगिरीहून परत आल्यानंतर त्यांनी आपले सेनापतीपद (बक्षिगिरी) आपला पुतण्या पांडुरंग गणेश ह्याजकडे सोपविले होते. स्वतःकडे त्याने दिवाणगिरी घेतली. जानोजी, मुधोजी, दुसरा रघुजी ह्यांच्या कारकिर्दीत नागपूरचे शासक भवानी पंडिताकडे एक सल्लागार ह्या नात्याने पहात होते. आणि ह्या नात्याने भवानी पंडिताने सर्वच महत्त्वाच्या राजकारणात भाग घेतला. कटकच्या राजकारणात भवानी पंडिताचा बराच मोठा सहभाग होता. परंतु त्या राजकारणाला बऱ्याच मर्यादा असल्याने त्याला त्यात

यश येणे शक्यच नव्हते. नागपूरचा शासक जानोजी भोसले याने भवानी पंडिताला कटकच्या राजकारणात पूर्ण स्वातंत्र्य दिले असते तर कदाचित वेगळा इतिहास घडला असता, असे एकूण इतिहास पहाता वाटते. पुढे रघुजी दुसरा आणि मुधोजी ह्यांच्यात नागपूरच्या गादीवरून जे भांडण निर्माण झाले त्यात भवानी पंडिताचा ओढा मुधोजीकडे असल्याने रघुजीला भवानी पंडिताबाबत विशेष प्रेम राहिले नाही. परंतु एकूण नागपूरच्या राजकारणात भवानी पंडिताचे स्थान अनन्य-साधारण होते आणि संकटप्रसंगी सर्व मतभेद विसरून नागपूरचे शासक भवानी पंडिताशी सल्लामसलत करीत असत ह्यात तिळमात्र शंका नाही.

३०. मीरखान पेंढाऱ्याच्या बंडाळ्या

भवानी पंडित हाच काळू घराण्यात कर्तबगार होता असे नाही. काळू घराण्यातील इतर अनेक लोकही तसेच कर्तबगार असलेले दिसून येतात. पांडुरंग गणेश याजकडे बक्षिगिरी सोपविली. त्याची मुले अमृतराव पांडुरंग, व्यंकटराव पांडुरंग, यांनीहि बरीच कर्तबगारी गाजविली. बखरीत मीरखान पेंढाऱ्याने जो उपद्रव केला त्याची विस्तृत हकिकत आलेली आहे. ह्या मीरखान पेंढाऱ्याने जबलपूर लुटले. त्याचा बंदोबस्त करण्याकरिता सिदकअलिखानाची नेमणूक झाली. त्याला मदत करण्याकरिता म्हणून अमृतराव पांडुरंग याचीही नेमणूक झाली. मीरखानाचा पाडाव करण्याकरिता अमृतराव पांडुरंग याने बरीच मेहनत घेतली. शेवटी त्याचा पाडाव घडवून आणण्यात अमृतराव पांडरंगाला यश लाभले. दुसऱ्या रघुजीच्या कारकिर्दीत हा जो दंगा झाला त्याची हकिकत मुळातूनच वाचण्यासारखी आहे.

३१. दुसऱ्या रघुजीचा मृत्यु :

ह्या बखरीत दुसऱ्या रघुजीच्या मृत्युपर्यंत हकिकत आलेली आहे. ह्या सर्व बखरीवरून भवानी पंडित आणि त्यांची मुले आणि त्यांचे पुतणे ह्यांच्या जीवनासंबंधी आणि त्यांच्या जीवनातील अनेक घडामोडीसंबंधी माहिती मिळते. भवानी काळोला तीन मुले होती. त्यापैकी सर्वात वडील मुलगा म्हणजे बळवंत-राव. लॉर्ड कॉर्नवॉलिसने टिपूविरुद्ध जी मोहिम उभारली (१७८५) त्यात भोसल्यांतर्फे बळवंतराव याजला सात हजार फौजेनिशी पाठविण्यात आले होते. भवानी काळोचा दुसरा मुलगा म्हणजे यशवंतराव भवानी. त्याला १७८०–८१ मधे बंगालमध्ये चिमणाबापूबरोबर पाठविण्यात आले होते. माधवराव भवानी

यांच्याबद्दल मात्र विशेष माहिती मिळत नाही. भवानी काळोचे पुतणेही तितकेच कर्तबगार होते. पांडुरंग गणेश बक्षी यांना तर भवानी काळो यांनी स्वतःहून बक्षिगिरी दिली होती. खडर्याच्या लढाईत ते स्वतः हजर होते. त्यांचा आडगावच्या लढाईत मृत्यु झाला. त्यांचा दुसरा पुतण्या जयराम गणेश होहि तितकाच पराक्रमी होता. १७८६ मध्ये ते बदामीच्या लढाईत हजर होते. पांडुरंग गणेश यांना चार मुले होती. रघुपतराव, अमृतराव, व्यंकटराव आणि शिवराव. यापैकी अमृतराव पांडुरंग यांचे नाव पेंढाऱ्यांची बंडाळी त्यांनी मोडून काढली त्यासंबंधात या बखरीत येते. त्याचप्रमाणे रघुपतराव पांडुरंग बक्षी यांनी १७९३–९४ मध्ये छत्तीसगडात जमीनदारांनी जो दंगा केला तो मोडून काढला त्या संदर्भात ह्या बखरीत हकिकत आलेली आहे. व्यंकटराव पांडुरंग हे सुद्धा सैन्यात होते आणि स्वतःच्या कर्तबगारीवर त्यांनी सैन्यात मोठ्या जागा मिळविल्या. शिवराव पांडुरंग हे १८४५ च्या सुमारास पारडी येथे लष्करी अंमलदार होते. एकूण भवानी पंडिताची सर्वच कुटुंबीय मंडळी कर्तबगार होती असे दिसून येते.

३२. बखरीतील भाषा

१८ व्या शतकातील सर्वच मराठी भाषेवर आपल्याला फारशी भाषेचा प्रभाव पडलेला दिसतो. शासकीय पत्रव्यवहाराची भाषा सुद्धा फारशीच होती. " भवानी पंडिताची " बखर यात सुद्धा फारशी भाषेचाच प्रभाव जाणवतो. परंतु बखरीतील सर्वच भाषा ओघवती आणि साधी व सुटसुटीत आढळून येते. वर्णने थोडक्यात परंतु चटचटीत आढळून येतात. पांचगावच्या लढाईचे वर्णन पहा : " श्रीमंत साबाजी भोसले याजवल इतकी फौज आस्ता आपणच जातीने हावदा पुढे केला. तो उभयेता बंधुसी गांठ पडली. तेव्हा पहिल्याणे श्रीमंत साबाजी भोसले याणी तीर चालविला तो थोडका रूतला. कारगर जाला नाही. नंतर श्रीमंत मुधोजी भोसले याचे खवासीत खलुजी पाटील नामे भला मणूश होता. त्याचे व याहाचे हातात बंदुका होत्या. येकदाच दोनही आवाज उडाले ते श्रीमंत साबाजी भोसले ह्याहाचे टिपेत गोळी लागून मृत्योस पावले." दिवाकरपंताचे वर्णन करताना बखरकार लिहितो, " दिवाकरपंत मणुश्य दाना. मसलेहतशनास जाणून मुकरर केले." नाना फडणिसाने इंग्रजांविरुद्ध अखिल भारतीय कारस्थान केले त्यात भोसले वरकरणी सामील झाला परंतु आतून इंग्रजास तो सामील

झालेला होता. त्याचे वर्णन करतांना बखरकराने लिहिले, " तेथे मसलतीचा झोक पाहतांना आवघे दक्षण हिंदुस्थानचे रईसाची यैक्यता की इंग्रेजावर मसलत करावी. तेव्हा आपण येकलेच बाहेर पडावे हे मसलहत न जाणून जाहीरदारीमध्ये पानावर पान ठेऊन इकडेस येऊन पूर्वी लिहिले हे मसलहत सिध करून लाट-गौरनर ईस्टीन साहेब इमामुदवला बाहादूर याजला बेनीरामपंत वकील याचे हाते त्याजला अर्ज करविला जे जाहीरीमधे आवघ्या रईसास समजायाकरिता तिकडेस मोहीम केली परंतु बातनीमध्ये जो सिलसिला आमचा आहे तोच कायेम आहे." बखरीत अनेक फारशी म्हणी आणि शब्द आलेले आहेत. त्यांचा त्या त्या ठिकाणी अर्थ दिलेला आहेच. परंतु ह्या फारशी म्हणींनी ह्या बखरीची रंजकता वाढविली आहे. थोडक्यात बखर एकाच वाचनात संपवावी इतकी रंजक झालेली आहे.

३३. निष्कर्ष

१८ व्या शतकातील निरनिराळ्या घडामोडींचे ज्ञान होण्याकरिता ह्या बखरीचा निश्चित उपयोग होईल याची खात्री आहे. तसा उपयोग व्हावा हीच बखर प्रकाशित करण्यामागील उद्देश आहे.

भवानी पंडिताची बखर

भवानी पंडिताची बखर

पूर्ववृत्त

भवानीपंत आबा व मोरो श्रीधर वासीमकर ग्रहस्त मातबर होते. याजला काही येक दिवस बंदगान आलीची[1] दिवानगिरी होती. त्याचेजवळ दिवानी पेशकारीचे[2] कामावर याजला टविले. मा।रनिलेस काही काम उपस्थित जाले. याजकरिता हुजुराहून वाशमास जाण्याची रूखसत[3] मागितली. आपले वडील व चिरंजीव रामराव आपले कामावर व याजला दिवानीत पैशकारी जैसी पहिले होती तैसे मुकरर करून आपले चिरंजीवाजवल टेविले. चिरंजीवामध्ये बहुतसा जबाबसवालाचा शदुरजा[4] होता त्याजवरून याची आमदोरफ्त[5] हुजुरा-मधे येन्याजान्याची हुजूर जबाबसवाल करन्याची बहूत जाली. नंतर जनाव बंदगान आली यानीहि वहूत मेहेरबानगी करीत आसावी व मशीरूलमुल्क[6] आदिकरून हुजूरचे मोटमोटे उमराव यासी भाऊपना व दोस्तीचा सिलसिला[7] ज्यारी राहिला. त्याजमधे मशीरूलमुल्क यासी

---

१. निजाम अलीचे दुसरे नांव. निझामउलमुल्कच्या चार अनौरस मुलांपैकी एक मुलगा. असफजहा निझामउलमुल्क याचा २१ मे १७४८ रोजी मृत्यु झाला. त्याच्या मृत्युनंतर वारसाचा संघर्ष निर्माण झाला. त्यात शेवटी निजामअलीचा विजय झाला. निजामअली १८०३ पर्यंत सत्तेवर होता.

२. नायबी, मुतालकी.

३. जाण्यास अनुमती.

४. भावार्थाने ह्या शब्दाचा अर्थ कला किंवा कौशल्य असा दिसून येतो.

५. ये–जा.

६. मुशिर–उल–मुल्क असेही मराठीत लिहिलेले आढळते.

७. संबंध.

तो वहूत घरोबा जाला. याजउपर काही येक दिवस गुजरल्यानंतर दिवानीचे कामावर राजे विटल वाहादूर[८] मुकरर जाले. तेव्हा त्याहासी व याहासी काही खलिश[९] येऊन तेथील रोजगाराचा सिलसिला[१०] मुन–कता[११] होऊन आपले घरी प्रगणे वासीम येथे आले.

भवानीपंत जानोजीच्या सेवेत

त्याजउपरी श्रीमंत सावाजी भोसले याजकडेस दारव्ह वगैरे सात माहाल चवलक्ष रुपयाचे नवाबाकडून ज्याहागीर होते. सावाजी भोसले दारव्ह्यामध्ये हमेशा राहात होते. श्रीमंत मुधोजी भोसले याजकडेस चंद्रपूर प्रांत व श्रीमंत विंबाजी भोसले याजकडेस छतीसगड व श्रीमंत जाणोजी भोसले सेनासाहेब सुभा स्वस्थान नागपूर वगैर येथे होते. श्रीमंत सावाजी भोसले याजवल दिवानीचे कामावर कोन्ही माणूश लायेक न होते म्हणून मणुशाचे विच्यारनेत होते तो इतकीयात वर्तमान समजले जे भवानीपंत नामे ग्रहस्त प्रस्तुत मुगलाईतून चाकरी सोडून घरी आले आहेत. मणूश वहूत राजा काबील[१२] आहेत. हे वर्तमान येकून बोलावयास शुतर स्वार[१३] पाटविला त्याजवरून याणी येऊन मुलाजमत[१४] हासल केली. याची वर्तणूक व दानाई[१५] शानो-शौकत[१६] पाहून आपले दिवानीची खिलअत[१७] याजला दिल्ही. दोन वश

८. विठ्ठल सुंदर.
९. किल्मिष.
१०. संबंध.
११. तुटणे, संपुष्टात येणे.
१२. लायक.
१३. उंटावरील स्वार.
१४. नोकरी.
१५. हुशारी.
१६. प्रतिष्ठा.
१७. बहुमानाची वस्त्रे.

परियंत श्रीमंत सावाजी भोसले याजवल होते नंतर श्रीमंत सावाजी भोसले याची सवारी नागपुरास आली. समागमे हेहि आले. श्रीमंत जाणोजी भोसले सेनासाहेव सुभा यानी काही येक दिवस याचा जवाव सवाल व वर्तणूक येक सुखनी[१८] येसी पाहिली जे उभयेता बंधुमधे काहीयेक खरकशा[१९] आला आस्ता याणी जाऊन आपल दानाईने[२०] दोघाहि साहेबाचा समजोता करून द्यावा. यैसी मातवरी पाहून श्रीमंत सावाजी भोसले यासी पैगाम[२१] केला जे येव्हढे मणुश मजकडीलहि द्यावे. काही येक दिवस या गोस्टीची तकरार[२२] राहिली नंतर फार फार वाजीदि[२३] पाहून श्रीमंत सावाजी भोसले यांनी श्रीमंत सेनासाहेब सुभा याचे हवाले केले.[२४]

शिवभट साठे याने दंगा माजविला म्हणून भवानी पंडिताची कटकच्या सुभेदारीवर नेमणूक---

काही एक दिवस गुजरल्यावर पातशा इलाहावादेचे मुकामी आसता श्रीमंत जाणोजी भोसले सेनासाहेव सुभा याजला फरमान आले.

---

१८. शब्दाला पक्का, एकवचनी.

१९. किल्मिष.

२०. हुशारीने.

२१. निरोप.

२२. ओरड. काही दिवसपर्यंत ही विनंती मान्य केली नाही असा भाव.

२३. आग्रह.

२४. भवानी काळो हा साबाजीकडे दिवाण म्हणून कसा आला याबाबत गुप्ते यांच्या " नागपूरकर भोसल्यांची वखर " यात दिलेली हकिकत अगदी वेगळी दिसते. भवानी काळूचा भाचा राजाराम वाळके हा सावाजीचा दिवाण होता. त्याने भवानी काळोला आपल्या धन्याकडे आणले. त्याची कर्तबगारी पाहून साबाजीने त्याला आपला दिवाण नेमले. साबाजी हा माधवरावाला सामील होण्याकरिता निघालेला होता त्यावेळी भवानीच्या मध्यस्थीने ते संकट टळले ही हकिकत मात्र सर्वत्र आढळते. पहा---गुप्तेकृत " नागपूरकर भोसल्यांची बखर ' पान ९२ आणि या. मा. काळे " नागपूर प्रांताचा इतिहास " पान नं. १९२.

कोन्ही येक मातबर सरदार दाहा हजार फौजेनसी आमचे मदतीस पाटवणे. त्याजवरून रामप्रसाद[२५] नामे वकील फरमान घेऊन आला होता. त्यासी बोलण्यात आणिले हे फार चांगले आहे. तेव्हा याची रवानगी मुकरर टहरली. नंतर तिकडून लगतच पत्र आले जे ते मसलहत रफेदफे[२६] जाली. तिकडे जाण्याचे प्रयोजन राहिले नाही. तितकियातच सुभे कटक प्रांत वडोसा येथून पत्र आले ते सिवभट साटे व चिमनासाव यानी सरकारचे चाकर आस्ता फंद करून तमाम मुल्क[२७] आपले कबज्यात टेविला. दोन वर्शपरियेंत येक रुपया तिकडील सरकारात न आला. तेव्हा हा सरंजाम व हे फौज तयारच होती. याजला आज्ञा केली जे तुम्ही कटकचा बंदोबस्त करणे. तेथील सुभेदारी तुम्हास दिल्ही.[२८]

कटक सुभ्यातील भवानी पंडिताची भरीव कामगिरी : बंडखोर जमिनदारांचा बंदोबस्त केला—

त्याजवरून आपले वडील पुत्र चिरंजिव वलवंतराव याजला येथे आपले जागी कायेम करून त्याचे अतालीकीवर[२९] राजारामपंत वालके नामे वहेनीचे पुत्र याजला टेविले व पांडुरंगपंत पुतने याजला समागमे घेऊन गेले. खर्चास येथून कमबेस[३०] दिल्हे परंतु आपले कारवाईने

---

२५. याचे पूर्ण नाव सापडत नाही.

२६. रद्द झाली.

२७. मुलुख-

२८. "कटक आणि उडिसा येथील सुभ्याचे काम शिवभट साटे याजकडे असता त्या प्रांतीचा अवग्र वसूल घेतला तो फौजप्रकरणी खर्च केला व इरसाल नागपूरास दाखल न होय." गुप्ते बखर पान नं. ९२, यादव माधव काळे यांनी "नागपूर प्रांताच्या इतिहासात" हेच कारण दिलेले आढळते. पहा—ना० प्रां० इ० (काळे) पान नं. २२९.

२९. त्याला शिकविण्याकरिता म्हणून, त्याचा पालक म्हणून.

३०. कमिअधिक.

मोटमोटे सरदार पठान पठान मानकरी जे होते त्याजला वहूत राजी टेऊन प्रांत वडोसा येथे गेले. तिकडून सिवभट साटे व चिमनासा वगैरे याणी फौजेची तयारी करून मुसतयेद होते परंतु याने आपले मसलतीचे विच्यारानें व दावाचे पोटीत या उभयेतास कैद केले व कटक स्वस्थानाची जागा, वाराभाटीचा किला व लालबाग वगैर आपले स्वाधीन करून घेतल्यानंतर गडजात वगैरे जमिदारा मोठा जबरदस्त होता. तेव्हा पांडुरंगपंत पुतने याजसमागमे फौजा देऊन लढाया यासी जाल्या. परंतु पांडुरंगपंत याणी आपले जवामर्दीने[31] जमिदारास मार करून आपला आमल दखल सर्व प्रांतामधे केला.[32] तीन वर्शपरियेंत तेथे आमल करार वाकई[33] करून येथे श्रीमंत सेनासाहेब सुभा याजला इरसाल[34] जे मुकरर होते ह्याजपेक्षा ज्यास्त पाटविले व हेहि लिहिले जे सिवभट साटे व चिमणासाव कैद आहेत त्याजविशई जैसी आज्ञा येईल तैसे केले जाईल. येथून हुकुम गेला जे त्याजला पाटऊन देणे तेव्हा त्याजला हजुरात पाटविले. हे वर्तमान जाल्यानंतर श्रीमंत फार संतोषास पावोन व सर्फराजीचे[35] वस्त्रे वगैरे पाटविले[36] व आज्ञा केली जे यैसे मणुश हजूर असावे त्याजवरून हजुरात यावे यैसे आज्ञापत्र पाठविले. तेव्हा राजाराम मुकुंद व माहादाजी याजला कामावर टेऊन पांडुरंगपंत पुतणे याजला फौजसुधा प्रथम रवाना केले व आपण

---

३१. वहादुरी.

३२. कटक प्रांतात जमिनदारांनी ही जी बंडाळी केली ती बंडाळी भवानी पंडितानें मोडून काढली व त्याकरिता त्याने आपला पुतण्या पांडुरंगपंत याला पाठविले होते ह्याचा उल्लेख इतर ग्रंथात आढळत नाही.

३३. प्रस्थापित करून.

३४. पाठविण्याची रकम.

३५. उत्तम कामगिरी केली म्हणून सन्मानाची वस्त्रे.

३६. कटक प्रांतात भवानी पंडिताने ही जी कामगिरी करून दाखविली त्याबद्दल श्रीमंत जानोजी भोसले संतुष्ट झाले असा वृत्तांत ह्या बखरीत दिलेला

स्वस्थानीचा बंदोबस्त करून या उभयतास वाकिफकार[३७] करून आपण नागपूरास आले.

माधवरावाने हैदरअलीविरुद्ध जी चौथी स्वारी केली त्यात भवानी पंडिताने केलेली कामगिरी–

येथे वक्षीगिरीचे कामावर भाऊ वक्षी होते. याचा काल जाहला. तेव्हा अवग्र छिपाऱ्याचा वहिवाट इकडे सांगितला. या कामावर पांडुरंगपंत याजला सरकारातून सांगऊन आपण सदरचे कामावर राहिले. नंतर हैदर नाईक याजवर श्रीमंत राजश्री माधवरावसाहेव पंतप्रधान यानी मोहीम केली[३८] तेव्हा श्रीमंत जाणोजी भोसले सेनासाहेव सुभा याजला मदतीविसी फौजसुधा येन्याकरिता पत्रे आली. त्याजवरून श्रीमंत मवसुफाचे[३९] जाणे सबब दर सबब मवकूफ[४०] होऊन श्रीमंत साबाजी भोसले याजला फौजसुधा पाटवावयाचे नेमिले. जवामर्द पुख्ताकार[४१] मसलहतवाला कोन्ही मणुष्य समागमे आसावा व त्यानेहि[४२]

(तळटीप ३६ चालू)

आहे. परंतु गुप्ते यांच्या नागपूर बखरीत मात्र "तेथे काही दिवस कामाची वहिवाट करून नागपुरास आल्यावर लाख रुपये कामात खाल्ले म्हणून आरोप आणिला. हे पाहून साबाजी भोसले यानी सेनासाहेबास विनंती केली की आमचे जवळचे मनुष्य घेऊन जाऊन त्याजला असे करावे हे उचित नव्हे. याजवरून बंधूची भीड जबरदस्त पाहून उगेच राहिले." (गुप्ते बखर पान नं. ९२–९३). ही सर्व हकिकत १७६१ च्या एप्रिल महिन्यात घडली.

३७. माहिती करून, वाकबगार करून.

३८. फेब्रुवारी १७६४ मध्ये माधवरावाने हैदरअलीविरुद्ध मोहीम केली त्या मोहिमेचा हा उल्लेख होय.

३९. वर नमूद केल्याप्रमाणे, वर लिहिल्याप्रमाणे.

४०. रद्द करणे.

४१. पोक्त, अनुभवी.

४२. साबाजीने.

याजला समागमे मागितले. तेव्हा हे व पांडुरंगपंत समागमे गेले. तेथे हैदरनाईक यासी लढाया बहूत जाल्या. निजगल नामे जागा मजबूत तेथे हला करून माधवरावसाहेव पंतप्रधान याणी घेतले. त्यासमई माणूस वहूत जाया जाले. श्रीमंताचे बंधु श्रीमंत नारायेनरावसाहेव याजला देखील गोली लागली. किला फते केला. मग काही दिवस त्या प्रांतात राहून तहरह जाल्यावर आपले आपले स्वस्थानास आले.

१७६९ मधील माधवरावाची नागपूरवरील स्वारी : तह घडवून आणण्यात भवानी पंडिताची मध्यस्थी–

नंतर नबाब बंदगानआली याहासी व श्रीमंत पंतप्रधान यासी खरकशा[४३] होऊन श्रीमंत जानोजी भोसले सेनासाहेव सुभा याणी नबावासी[४४] शामलात[४५] करून पुणे जालले तो आकस श्रीमंत माधवराव-साहेव यानी चितात धरून जाणोजी भोसले याजवर मोहीम केली.[४६] तेव्हा त्याची बराबरीची ताहान आनता[४७] हे पुढे व ते मागे यैसे करीत करीत स्वस्थान नागपूर येथे श्रीमंत माधवराव साहेब आले परंतु जाणोजी भोसले पुढे चालत गेले व हे मागे यैसा बहूत दिवस खरकशा राहिला.[४८] आखर गोपालराव मिरजकर[४९] याचे मारफतीने तह[५०] होऊन त्या तहाचे बोलण्यात दिवाकरपंत[५१] कोन्हीच न होते.

---

४३. किल्मिष.

४४. निजामाशी.

४५. सामील होऊन.

४६. माधवरावाने १७६९ मध्ये जानोजीवर केलेली ही दुसरी स्वारी. त्याचा हा उल्लेख आहे.

४७. आव आणला असता

४८. बरेच दिवसपर्यंत हे युद्ध चालले.

४९. मिरजेचे गोपाळराव पटवर्धन.

५०. कनकापूरचा तह १७६९.

५१. दिवाकरपंत चोरघडे.

याचेच[५२] मारफतीने तहरह टहरले व दोघाचे सळूक[५३] होऊन आपलाले स्वस्थानास गेले.

जानोजीचा मृत्यु : मृत्यूच्या वेळी भवानी पंडिताच्या सेवेबाबत व्यक्त केलेली कृतज्ञता

नंतर श्रीमंत पंतप्रधान याचे संधान नवावासी मागती विगडले म्हणून श्रीमंत सेनासाहेव सुभा याजला बोलावणे आले. त्याजवरून फौजसुधा गेले तेव्हाहि हे[५४] समागमेच होते. तुलजापूर पंढरपूर पावेतो गेले आस्ता श्रीमंत जाणोजी भोसले सेनासाहेव सुभा याजला पोटातील व्यथा उत्पन्न (जाली.) मर्तेसमई श्रीमंत मुधोजी भोसले जवळ हाजर होते. तेव्हा यैसे कस्टाचे समयात बोलन्यात आणिले जे वरकड तो समग्र गोस्टी मी करून चुकलो परंतु दोन गोस्टी बाकी राहिल्या. त्याजपैकी येक चिरंजीव रघोजी भोसले याजला आपले समक्ष सेना-साहेबीचे वस्त्रे देऊन मसनदसीन[५५] करावे. हे होऊ न सकले. दुसरे जे भवानीपंत आबा[५६] यांनी नि:सीमपणे माझी सो(ह)वत दिल्ही व दौलतीची खैरख्वाही[५७] वहूत केली. त्यास याचे चालविने वंशपरंपरा तुम्हाकडेस आहे.[५८] यैसे दोन्ही गोस्टीचे वचन घेऊन मृत्योस पावले.[५९]

---

५२. भवानी पंडित. भवानी पंडित ह्याने भोसल्यांतर्फे मध्यस्थी केली. ह्या तहाच्या वाटाघाटीत दिवाकरपंत चोरघडे यांना कोणतेहि स्थान नव्हते, भवानी पंडिताला मात्र त्यात प्रतिष्ठेचे स्थान होते हा ह्या लिहिण्याचा भावार्थ.

५३. सलोखा.

५४. भवानी पंडित.

५५. मसलतीवर बसवावे.

५६. भवानी पंडित.

५७. कल्याण चिंतिले.

५८. याची आणि ह्याच्या वंशजांची पालनपोषणाची व्यवस्था करणे हे तुमचे कर्तव्य आहे.

५९. जानोजीच्या मृत्युच्या वेळी त्याने ह्या ज्या दोन गोष्टी सांगितल्या त्यांचा उल्लेख गुप्ते यांच्या बखरीत किंवा काळयांच्या नागपूर प्रांताच्या

जानोजीच्या मृत्यूनंतर साबाजी आणि मुधोजी यांच्यात गादीकरिता भांडणे : ती टाळण्याचे भवानी पंडिताचे प्रयत्न–

यानंतर मुधोजी भोसले व भवानीपंत आवा फौजसुधा स्वप्रांतात येण्याचे टहरले. नंतर सेनासाहेव सुभ्याची वस्त्रे श्रीमंत दर्याबाईसाहेब, श्रीमंत जाणोजी यांच्या स्त्रीचे विद्यमाणे श्रीमंत साबाजी भोसले याजला जाले. याजमधे आपसचे खरकसे[६०] बहूत जाले. कारन जे रघोजी भोसले याजला श्रीमंत जाणोजी भोसले याणी वोटीत घेतले आस्ता सेनासाहेबी दुसरेकडे न व्हावी यैसे श्रीमंत मुधोजी भोसले याचे चित्तात (होते.) (परंतु) श्रीमंत दर्याबाई व साबाजी भोसले येकत्र होऊन श्रीमंत रघोजी भोसले व बालाबाईस आपले जवल टेविले. सेनासाहेव सुभा श्रीमंत साबाजी भोसले तेव्हा सर्वत्र मुतसदी[६१] याहासुधा त्याचेजवल राहिले. कारन गादीची मालकी त्या कडेसच आली. नंतर श्रीमंत मुधोजी भोसले याजला हे गोस्ट आसाह्य होऊन उभयेता बंधुमध्ये खरकशा[६२] वाहाडला. त्या दिवसामधे जितके जुने मुतसदी होते तितक्याचे चितात की उभयेता श्रीमंताचा खरकशा न वाढावा. दौलतीचा बंदोबस्त व्हावा परंतु नवीन कारभारी रा॥ भवानी सिवराम व नाना जोसी व नाना करांडे वगैर याणी दूरदेसी[६३] न करीता उभयेता श्रीमंताचा लढाईचा प्रसंग नमूद केला.[६४]

(तळटीप ५९ चालू)

इतिहासात आढळत नाही. "भवानीपंत मुनसी, भवानी काळू वगैरे सर्वास निरोप करून सेनाधुरंधराचे हातात हात घातले व भगवंत स्मरण करून सन ११८१ चे साली वैशाख शुध १५ स कैलासवासी झाले." येव्हढेच वर्णन बखरीत आढळते. (गुप्ते बखर पान नं. ९९, काळे नाग. प्रां. इति. पान नं. १८७) त्यामुळे वरील सर्व हकिकत नवीन आहे.

६०. कटकटी, तंटे. ६१. मुत्सद्दी.

६२. वैमनस्य.

६३. दूरदृष्टी.

६४. लढाईचा प्रसंग आणून ठेवला असा भावार्थ.

पांचगावची लढाई : १७७५–[६५]

तेव्हा दोहीकडे तयाऱ्या जाहल्या. तिकडून चंद्रपूराहून श्रीमंत मुधोजी भोसले फौजेसुधा चालून आले. इकडून हेहि कूच दरकूच येऊन पाचगावास दाखल जाले. इकडूनहि फौजेची तयारी होऊन प्रात:कालचा प्रहर दिवस आला ते वेलेस लढाईचा प्रसंग येऊन (पडला.) त्यावेलेस दिवाकरपंत व आम्ही सर्वत्र जुणे मुतसदी[६६] मिळून श्रीमंत सावाजी भोसले याजला विनंती केली परंतु मनास न येता लढाई सुरू केली.[६७] लढाई मोटी जाहाली. नव हजार मणुश गंजशहिदा[६८] जाले. आखर श्रीमंत मुधोजी भोसले याजवल फौज थोडकी राहिली. परंतु ईश्वर सत्ता विचित्र. श्रीमंत सावाजी भोसले याजवल इतकी फौज आस्ता आपणच जातीने हावदापुढे केला. तो उभयेता बंधुसी गांठ पडली. तेव्हा पहिल्याणे श्रीमंत सावाजी भोसले याणी तीर चालविला तो थोडका रुतला. कारगर[६९] जाला नाही. नंतर श्रीमंत मुधोजी भोसले याचे खवासीत[७०] खळुजी पाटील नामे भला मणश होता. त्याचे व याहाचे हातात बंदुका होत्या. येकदाच दोनही आवाज उडाले. ते श्रीमंत साबाजी भोसले ह्याहाचे टिपेत गोळी लागून मृत्योस पावले.

---

६५. दिनांक २६ जानेवारी १७७५.

६६. मुत्सद्दी.

६७. गुप्ते यांच्या बखरीत सिदोजी गुजर यांना सावाजीने मध्यस्तीकरिता मुधोजीकडे पाठविले. त्यांनी आपसात लढाई कशाकरिता पाहिजे ? असा प्रश्न विचारला असा उल्लेख आढळून येतो. ही बोलणी चालू झाल्याने फौज थबकली. परंतु सावाजीकडील तोफांचा मारा चालूच होता. त्या गोळयांनी दलपत बेनिगीर हा मातबर माणूस ठार मारल्या गेला. त्यामुळे लढाईला तोंड लागले. (गुप्ते नागपूर बखर पान नं. १४३, काळे ना. प्रां. इ. पा. नं. २०६).

६८. ठार मारले गेले. कबर बांधल्या गेली.

६९. लागू झाला नाही.

७०. हत्तीच्या अम्बारीतील मागची जागा (मुख्याचे बाजूस)

पाचगांवच्या लढाईत भवानी पंडिताने केलेला पराक्रम : रणक्षेत्रात स्वतः येऊन मुधोजीने जखमी भवानी पंडिताची केलेली शुश्रुषा–

नंतर याणी[७१] जे फौज होती ती जमा करून आपले धण्याची निमकहलाली[७२] दाखवावी याजकरिता पुढे चाल केली तो इतकियात गोविन्द दादो व रामचेन्द्र दादो श्रीमंत मुधोजी भोसले याजकडून आले जे तुम्ही हे गोस्ट न करणे. आता ज्याकरिता करणे ते गोस्ट ईश्वरे यैसी केली.[७३] तितकियात इकडून व तिकडून येकच हला जाली.[७४] या कर्माचे आगोधर पांडुरंगपंत याणी तलवार लढाईमध्ये मारल्या. याजवर[७५] जखम तो चहडली नाही. परंतु घोडी जखमी जाली· घोडीचा कान उडून गेला. वलवंतराव, वडील पुत्र समागमे होते. याणीहि दोघेतिघे जखमी केले. नंतर याच्यावर हला जाली आस्ता जखमा वहूत लागल्या. सिदोजी भापकर याचे हातचे जखमेने डोला वगैर जाया जाहला. दंडावर व आंगावर जखमा येकेवीस चहडल्या व घोडिहि तेवेळेस वरते आली. तेव्हा खेतात राहिले.[७६] हे वर्तमान श्रीमंत मुधोजी भोसले याजला समजताच आपण जातीने येऊन याजला उचलून नेऊन तेव्हढे रात्रीस वहूत मापजतीने[७७] टेऊन जखमा वगैरेचा सेक केला. त्याजवर पांडुरंगपंत व वलवंतराव वगैरे परागंदा[७८] जाले होते. ते मागती स्वस्थानास आले.

---

७१. भवानी पंडित.

७२. स्वामिनिष्ठा.

७३. आता सावाजी मारल्या गेला. तेव्हा आता लढून उपयोग काय ? असा भावार्थ.

७४. अकस्मात हल्ला झाला.

७५. भवानी पंडितावर.

७६. रणक्षेत्रात पडून राहिले.

७७. बंदोबस्ताने.

७८. ह्यावेळी पांडुरंग गणेश पळून सिवनी–छपाऱ्यापर्यंत गेले होते ते तेथून परत आले. (गुप्ते बखर पान क्र. १४५).

साबाजीचा मृत्यु : दिवाणपद पुन्हा भवानीपंडिताकडे–

नंतर श्रीमंत मुधोजी भोसले यांनी साबाजी भोसले याचा मुडदा नागपूरास आणून दहन दिल्हे. साबाजी भोसले याच्या दोघी स्त्रियांनी सहगमन केले. पंधरा दिवस गुजरल्यानंतर राजश्री दिवाकरपंत[७९] व भवानीपंत मुनसी आदिकरून इकडील सेनासाहेब सुभा प्रकर्णी जितके मुतसदी[८०] व सिपाह लोक होते तितक्याची बहूत खातरदारी करून ज्या ज्या दरकदारावर[८१] जे जे होते ते ते कायेम केले. कोनताहि येक दुसरा विच्यार दाखविला नाही. याहाच्या[८२] जखमा वरकड तर थोडक्याच दिवसात चांगल्या जाल्या परंतु डोल्याची वगैर जखम बहूत कारगर[८३] होती काही केल्या सूरत बहबूदीची[८४] न दिसे. तेव्हा आवरंगाबादेमधे कोनही येक कुंभार विलाजी[८५] चांगला होता त्याचे विलाजाणे जखम चांगली जाली. मग सेनासाहेबाची वस्त्रे छेत्रपती याचे येथून याजला पूर्वीच आली होती. राज्यावर श्रीमंत सेनासाहेब सुभा कायेम जाले. मसनदीचा कारभार दिवाकरपंत व हे मिळून चालू लागला.

साबाजीच्या मृत्युचा फायदा घेऊन निजामाची पवनारपावेतो स्वारी : वऱ्हाडात दर महिन्याची वसूली ठरवावी असा आग्रह–

इतकीयात श्रीमंत साबाजी भोसले व दरयाबाईसाहेब साबाजी भोसले याचे मृत्योचे पूर्वीच नवाब बंदगानआली यासी सिलसिला

७९. दिवाकरपंत चोरघडे.

८०. मुत्सद्दी.

८१. पदावर.

८२. भवानी पंडिताच्या.

८३. खोल, गंभीर, प्राणघातक.

८४. चेहरा चांगला दिसत नव्हता.

८५. इलाज करणारा.

घरच्या खरकशा प्रकर्णीचा होताच. नबाव बंदगानआली यानी सावाजी भोसले याचे मृत्योचे वर्तमान येकून फौज व जात–मुबारकीसुधा[८६] पवनार पावेतो आले. त्याची फौज आणि जमाव भारी हे जाणून येथून कोण्ही सलाह करावी याजकरिता नेम[८७] करू लागले. दिवाकरपंत मणुश्य दाना.[८८] मसलेहतशनास[८९] जाणून मुकरर केले. याणी[९०] जाऊन बहूत दानाई[९१] मसलेहतीचे पोटात जफरूद्दौला आणि विकारूद्दौला व रूकनतदौला याहाचे विद्यमाने जवाब सवाल केला जे वराडात हरदो आमल[९२] होते. नबाबासी आर्ज केला जे पचावन–पचेताळीस[९३] याप्रमाणे उभैपक्षी हिसेरसीद आमलदारी असे. प्रस्तुत श्रीमंत रघोजी भोसले सेनासाहेब सुभा याजवर मेहेरबानगी करून राज्यावर वसविले. त्यास दरबोस्त[९४] आमल इकडेस देऊन हिसेरसीदीची माहावारी[९५] टहराऊन घ्यावी यैसी आर्ज केली आस्ता दिवाकरपंत याचे दानाईवर[९६] व भोसल्याचे स्वस्थान कायेम राहावे याजवर द्रिस्ट[९७] देऊन कबूल केले. येसा तह टहराऊन नबाव बंदगानआली याची व रघोजी भोसले सेनासाहेब सुभा व मुधोजी भोसले सेनाधुरंधर याची भेट करऊन व परस्परे प्रेमयुक्त भाशने होऊन

८६. खुद्द नबाब म्हणजे निजामअली.

८७. विचार करू लागले.

८८. हुशार.

८९. योग्य वेळी योग्य गोष्ट करणारा.

९०. भवानी पंडिताने.

९१. हुशारी.

९२. दो–अमली.

९३. वऱ्हाडातील वाटणी ५५–४५ ह्या प्रमाणात आहे.

९४. सर्व, तमाम.

९५. महिन्याचे प्रमाण.

९६. शहाणपणावर.

९७. दृष्टी.

मानसनमान करून त्याची सवारी आलजपुराकडे गेली व हे आपले स्वस्थानास काय[९८] होऊन आले.

भवानीपंताची चिमणाबापूबरोबर कटकच्या कामगिरीवर पुन्हा रवानगी : बंडाळीचा बंदोबस्त--

सहा वर्शपरियेत स्वस्थ राज्य चालले. दुसरे या सरकारचे पहिले पासून कायेदा यैसा जे जितकी फौज टेविली त्यास आपण होऊन रूखसत[९९] न करावी. तेव्हा फौज तो बहुत जमा जाहली. घरवसल्या इतका रुपया देन्यास न वने तेव्हा नवाब बंदगानअली व श्रीमंत रा॥ पंतप्रधान वगैरे दक्षन हिंदुस्थानातील सरदार याच्या आणुमते[१००] कोनहि येक साहेब दानासमागमे[१०१] देऊन फौज रवाना करावी. पेशजी[१०२] श्रीमंत बाबासाहेब यासी व बंगालेवाले सरदार याहासी तह टहरला होता तितका मुळीक[१०३] काही हस्तगत होऊन बाकी राहिला होता तो आपले कवज्यात आनावा याजकरिता माहाराज छत्रपति[१०४] याचे येथून पंतप्रधान व नाना फडनवीस याहाचे विद्यमाणे श्रीमंत खंडोजी भोसले सेनाबाहादर हा किताव श्रीमंत चिमणाबापू साहेबास आनऊन व मंडले प्रांताचा जबाब सवाल याचे नावाचा घालून याची रवानगी तिकडेस बमये[१०५] फौज टहरली. याचा इतल्ला[१०६] लाट

---

९८. हा शब्द मुळात अतिशय अस्पष्ट आहे. त्यामुळे तो नीट वाचता आला नाही. परंतु आपले कार्य पूर्णपणे यशस्वी करून स्वस्थानास परतले हा भावार्थ.

९९. सुटी देणे.

१००. अनुमतीने.

१०१. जाणत्या माणसाबरोबर.

१०२. मागे, या अगोदर.

१०३. मुलुख.

१०४. सातारचे छत्रपती.

१०५. सहित. मंडला प्रांतात सैन्यासहित चिमणाबापूची रवानगी करण्याची योजना निश्चित झाली.

१०६. माहिती.

गौरनर इस्टीन[१०७] साहेव याजला बेनीरामपंत वकील याचे विद्यमाणे करविला. तेव्हा श्रीमंत बाहादार[१०८] याचे वये लाहान व मसलेहत मोटे पल्याची. दिवाकरपंत वगैरे मुतसदी आवघेच होते परंतु जवामर्द[१०९] मसलेहतशनास[११०] दूर आंदेश,[१११] व सिपाह लोकाचा वहिवाट पहिले-पासून इकडेस म्हणून भवानीपंत आवा याहाची योजना साहेबज्यादा-वरोबर जाहली. नंतर फौजेसुधा प्रांत वडोसा स्वस्थान कटक तेथे जाऊन दाखल जाले. तेव्हा दावामुळे सर्व जमीदार वगैरे आणि कितीक वागी[११२] व मुफसिद[११३] होते त्याहास येशवंतराव भाऊ मध्यमपुत्र व जैरामपंततात्या पुतने, पांडुरंगपंत दादा याचे कनिस्ट बंधु याहासमागमे फौज देऊन त्याहास तंबी पोहोचाऊन बंदोबस्त करार वाकई[११४] केला.

ब्रिटिश विरोधी कट : भोसले त्यात बाह्यात्कारी सामील होतात परंतु बेनीराम वकीलामार्फत इंग्रजांशी अंतस्थ सूत्र–

हे वर्तमान जहागिरदारीचे व यातील बारीक मसलेहत येसीजे श्रीमंत रा ।। पंतप्रधान याचे येथे रघुनाथराव दादा पेशवे व इकडील कारपर्दाज[११५] सखारामबापू व नाना फडणवीस वगैरे याहाच्या परस्परे लढाया होऊन राघोबा दादा सिकस्त[११६] होऊन आंग्रेज बाहादुराचे

---

१०७. हेस्टिंग्ज.
१०८. चिमणाबापू.
१०९. बहादुर.
११०. योग्य वेळी योग्य गोष्टी करणारा.
१११. दूर दृष्टी असणारा. थोडक्यात बहादूर. योग्य वेळी योग्य गोष्टी करणारा आणि दूर दृष्टी असणारा म्हणून भवानी पंडिताची नेमणूक झाली.
११२. बंडखोर किंवा स्वामीद्रोही.
११३. बंडखोर.
११४. पक्का करणे.
११५. मुत्सद्दी.
११६. पराभूत होऊन.

पुन्यात जाऊन वसले. हे वर्तमान जाल्यानंतर रईसवमये[११७] सिंदे व होळकर वगैरे येकत्र होऊन आंग्रेज बहादरावर मोहीम करावी हा सिधांत टहराऊन चहू दिशेस चवघा रईसांनी तान वसवावा[११८] त्याजवरून नवाब बंदगानआली यांनी चिनापटन मछली बंदर सिकाकोन राजबंदरी[११९] इकडेस जावे व सिंदे होलकर यानी गुजराथ हिंदुस्थान वगैरे हालता[१२०] सांभाळावा व हरिपंत फडके व मिरजकर[१२१] यांनी मुंबई वगैरे या जिल्ह्यात धसावे यैसी मसलत जाल्याचे पत्र श्रीमंत सेनासाहेब सुभा याजला आले. त्याजवरून दिवाकरपंत दादा जातीने पुण्यास गेले. तेथे मसलतीचा झोक पाहतांना आवघे दक्षन हिंदुस्थानचे रईसाची यैक्यता की इंग्रेजावर मसलत करावी.[१२२] तेव्हा आपण येकलेच बाहेर पडावे हे मसलहत न जाणून[१२३] जाहीरदारीमध्ये[१२४] पानावर पान टेऊन[१२५] इकडेस येऊन पूर्वी लिहिले हे मसलहत सिध करून लाटगौरनर ईस्टीन साहेब[१२६] इमामुदवला बाहादूर याजला बेनीरामपंत वकील याचे हाते त्याजला आर्ज करविला जे जाहीरीमधे आवघ्या रईसास

---

११७. सरदारांसहित.

११८. रघुनाथरावांनी इंग्रजांची मदत घेतल्यामुळे शिंदे-होळकरांनी इंग्रजांचे आव्हान स्विकारले व त्यांनी चारही दिशांनी इंग्रजांविरुद्ध मोहीम उभारण्याचा निश्चय केला.

११९. निजामाने चेन्नापट्टम, मछलीपट्टन, सिकाकोल आणि राजमहेंद्री ह्या प्रदेशात जावे.

१२०. आघाडी किंवा प्रदेश.

१२१. मिरजेचे पटवर्धन.

१२२. पुण्यात जी मराठे सरदारांची खलबते चालू होती त्यात दक्षिणेतील सर्वच राज्यांनी इंग्रजांवर हल्ला करावा ह्यावर एकमत दिसून आले.

१२३. ह्या योजनेच्या आपणच एकटेच बाहेर राहिल्यास ते वाईट दिसेल असे वाटून.

१२४. दाखविण्यापुरते.

१२५. वेळ काढणे, कालहरण करणे.

१२६. हेस्टिंग्ज.

समजायाकरिता तिकडेस मोहीम केली.[१२७] परंतु वातनीमधे[१२८] जो सिलसिला आमचा आहे तोच कायेम आहे. त्यात दुसरा विच्यार होनार नाही. याजमधे आपण आमचे नुकसान केले तर चिंता नाही. व आम्ही आपले नुकसान केले तर चिंता नाही. यैसे नि:शिमतेचे[१२९] बोलणे बेनीरामपंत याचे जाहाले. च्यार महिने कटकात छावनी राहिली. तो इकडेस पंतप्रधान याचे फौजेसी व इंगरेज बाहादूर यासी लढाई बोरघाटावर[१३०] जाहाली. माहादाजी सिंदे याचे मारफतीने तहनामा टहरून राजश्री रघुनाथराव दादा याजला हस्तगत केले. या तहात काही किले जत वगैरे पंतप्रधान याचे सरकारात दिल्हे. येसे जाले आस्ता सखाराम बापू व नाना फडनीस कारपरदान[१३१] याचे लेख वरचेवर येत गेले जे तुम्हाकडून बंगाल्याप्रांती फौज गेली परंतु कोनतेहि साध्य न जाले.[१३२] यैसे लेख वरचेवर येत गेले व येथून जाहीरीमधे सर्व रईसास कळावयाकरिता तिकडेस लेखनात येत गेले. परंतु कोनतेहि आंग्रेजसाहेबाचे सरकारासी दुसरी गोस्ट घडली नाही. दोस्तीवरच नजर राहिली.

इंग्रजांनी भवानी पंडिताला ३२ लाख रुपये खर्चादाखल दिले– दिवाकरपंताचा मृत्यू–

मग भवानीपंत आबा यानी बेनीरामपंत याचे इकडून सवाल करविला जे साहेबजादे[१३३] फौज या मुलकात आले व जमियतहि[१३४]

---

१२७. इतर मराठे सरदारांची समजूत पटण्याकरिता आम्ही इंग्रजांविरुद्धच्या मोहिमेत सामील झालो परंतु प्रत्यक्षात मात्र आम्ही इंग्रजांचेच मित्र आहोत.

१२८. पत्रव्यवहारात.

१२९. मनापासून.

१३०. बोरघाटात इंग्रजांचा पराभव झाला.

१३१. कारभारी, मुत्सद्दी.

१३२. बंगालमध्ये जाऊन भोसल्यांनी इंग्रजांवर हल्ला चढवावा ही कामगिरी सोपविली होती परंतु ती कामगिरी तुम्ही पार पाडली नाही.

१३३. इंग्रज. १३४. सैन्य.

भारी याजमुले खर्चाचीहि मोठी किल्लत[१३५] आहे त्यास या सरकारासी व कंपनी आंग्रेज बाहादुरासी नि:शीम दोस्ती आहे तेव्हा काही खर्चाची मदत व्हावी. त्याजवरून तेहि दूरदेश समये पाहून वत्तीस लाख रुपये दिल्हे. ते भवानीपंत आवा याणी घेऊन फौजेच्या खर्चाचा बंदोवस्त करून साहेबजाद्यासुद्धा नागपुरास दाखल जाले. स्वारी जे दिवसी पवनी येथे आली तेच दिवसी रा।। दिवाकरपंत याचा काल जाहला. नंतर सर्व मसलहत फौज प्रकर्णी वगैरेमधे वागणूक याची[१३६] व भवानीपंत मुनसी व कुशावा चिटणीस यैसे होते. फौजेचा कारभार तो जैसे पहिले पासून पांडुरंगपंतदादा करीत होते तैसाच चालला.

जफरूद्दौलाचा मुलगा येहतीशामजंग याची निजामाविरुद्ध बंडाळी— भवानीपंताचा दुसरा मुलगा यशवंतराव याच्या मदतीने बंडाळीचा बंदोबस्त[१३७]—

सन ११९१ चे साली[१३८] नवाब जफरुद्दौला याचा काल जाहला आस्ता त्याचे पुत्र येहतीशामजंग यांनी नवाब बंदगानआली यासी

---

१३५. पैशाचा अभाव आहे. कमी.

१३६. दिवाकरपंत चोरघडे याचा मृत्यु झाल्याने सर्व राजकारणात, लष्करी बाबींमध्ये याच्या म्हणजे भवानी पंडिताच्या सल्ला–मसलतीनुसार सर्व निर्णय घेतले जाऊ लागले.

१३७. इब्राहिम बेग धौशा उर्फ जाबेताजंग जफरूद्दौला हा निजामाचा पराक्रमी सरदार. भोसले–निजाम आणि पेशवा यांच्या भांडणात त्याने प्रामुख्याने भाग घेतलेला होता. त्याच्या ताब्यात निर्मलचा किल्ला होता. त्याची वाढती प्रतिष्ठा सहन न होऊन निजामाने त्याला नष्ट करण्याचे ठरविले असावे. जाबेताजंग जफरुद्दौलाच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा येहतीशामजंग हा त्याच्या गादीवर आला. इ. स. १७८३ च्या प्रारंभी निजामाने निर्मलवर स्वारी करून येहतीशामजंगचा पराभव केला. निजामाने ही जी निर्मलवर तीन महिन्यांची मोहीम उभारली त्याचा ह्या प्रकरणात उल्लेख आढळतो. ह्या स्वारीत भवानी पंडिताचा दुसरा मुलगा यशवंतराव याला निजामाला मदत करण्याकरिता पाठविण्यात आले.

१३८. सन १७८३.

वागी[१३९] होऊन निर्मल वगैरे किले जात व त्याचे जागिरीत जितका मुलक होता तितका मुलक आपले कबज्यात आणून रुपया जवळ मुबलक होता[१४०] सबब फौज जफरूद्दौलाचे वेळेचेहि बहूत होती व यानीही वहुत फौजेचा जमाव करून, किले जाप्ती सरंजाम जफरूदवलागी[१४१] मोठा केला होता त्याचे गरूरीवर[१४२] जाऊन खाविंदासी गैरचालीची चाल धरली.[१४३] तेव्हा हे वर्तमान नवाब बंदगानअली याजला समजले आस्ता आपण आपले जातीने निघून फौजेची तयारी करविली. श्रीमंत पंतप्रधान याजला व श्रीमंत सेनासाहेव सुभा याजला पत्र लिहिले जे आमचे घरचे खानाजाद[१४४] आस्ता गैरचालीवर लक्ष देऊन चवघा लुच्याचे सोहबतीने[१४५] लागून सरकारासी बेआदबीस प्रारंभ केला. त्यास उभेयता रईसाची[१४६] फौज मदतीस यावी यैसी पत्रे पोहोचताच इकडून रा।। येशवंतराव भाऊ याजवरोवर फौज देऊन मदतीस पाटविले. पंतप्रधान याजकडूनहि मदतीस फौज आली. सर्व फौजा येकत्र होऊन निरमलेवर[१४७] गेले तेथे जफरूदवलाने किलेजातीवर सरजाम पोख्त केला[१४८] होता येक दोन लढाया जाहल्या. शेवटी येका लढाईत शरफुदवला, रूकनतदवला याचा भाऊ याचा पुत्र त्याजला

---

१३९. शत्रुत्व.

१४०. नवाब जफरूद्दौला याचा मुलगा येहतीशामजंग याने बंडाळी करून निजामाच्या ताब्यातील निर्मल वगैरे प्रदेश बळकाविला आणि बरेच द्रव्य जमविले हा भावार्थ.

१४१. जफरुद्दौलाने.

१४२. मगरुरी, उर्मटपणा.

१४३. बंडाळीची वाटचाल धरली.

१४४. खानदानीचे, नातेवाइक.

१४५. सोबतीने.

१४६. सरदार.

१४७. निर्मळ.

१४८. किल्ल्यावर भरपूर बंदोबस्त ठेवला.

गोला तोफेचा लागून ठार जाला. येसी ज्यास्ती त्याजकडील फार झाली[१४९] परंतु खाविंदावर शस्त्र धरून कोणाचे बरे जाले नाही. आस्तु. आखरश[१५०] काहीच न सुधरता[१५१] हात बांधून पागोटचाचे पेच गळचात घालून शरण आले. तेव्हा बंदगानआली याची जात वहुत वहुत बुजरग[१५२] त्यांनी तितकीही तकसीर[१५३] केली आस्ता माफ करून त्याजला आपले जवळ ठेविले. बाकी दरबोस्त[१५४] किलेजात व मुळीक[१५५] बमये[१५६] निरमल सुधा सरकार खालशाचा आमल टेविला. व आवग्र मुलकाचा बंदोवस्त सरकारचे कामदार पाठऊन केला. नंतर राजश्री येशवंतराव भाऊ याजला हुकुम जाला जे तुम्ही खासा स्वारी समागमे हैदराबादेस चालावे. तेथून तुमची रूकसत[१५७] करण्यात येईल. त्याजवरून हेहि स्वारीसमागमे फौजेसुधा हैदराबादेस आले. नवाब बंदगानआली याची वहूत परवरशीची[१५८] नजर याजवर होती. काहीएक दिवस आपलेजवळ टेऊन हरयेक मजलसीमधे याजला बोलावून याचा सन्मान वहुत करावा. मग याजला बहुमानादिक देऊन रूखसत केले. तेथून मजल दर मजल येऊन स्वस्थान नागपूर येथे दाखल जाले. सन ११९३[१५९] मध्ये स्वारी स्वस्थानीच होती.

---

१४९. तेव्हा त्याची वरीच फजिती झाली हा भाव.

१५०. शेवटी.

१५१. काहीच मार्ग न राहिल्याने.

१५२. क्षमाशील, वडीलपणाची भूमिका.

१५३. गुन्हा.

१५४. सर्व, तमाम.

१५५. मुलुख.

१५६. सह.

१५७. रवानगी.

१५८. निभावणी करण्याची. देखभाल करण्याची.

१५९. इ. स. १७८५ मधे.

गाविलगड येथे संतोकसिंगाचे बंड : संतोकसिंगाचा उद्दामपणा

अकराशे चौऱ्याणव साली [१६०] नवाब बंदगानआली व पंतप्रधान व इकडून श्रीमंत सेनासाहेब सुभा व दाजीसाहेब[१६१] याहासुधा येथे येऊन समागमे वेंकोजी भोसले नानासाहेब याजला व मुतसद्यापैकी पांडुरंगपंत दादा व येशवंतराव भाऊ[१६२] व कुशाबा व भवानीपंत मुनसी वगैरे सर्वत्र गेले. पुण्यास गेले. तितकियात किले गोवल येथील किलेदार याचा भाचा संतोकसिंग नामे याने फंद करून किला बलकावून बसला.[१६३] हे वर्तमान पुण्यास समजताच श्रीमंत वेंकोजी भोसले याजला तेथे ठेवून येशवंतराव भाऊ याजला त्याचेजवळ ठेवून श्रीमंत साहेब सडे स्वारानसी पांडुरंगपंत दादा वगैरे समागमे येऊन सडी स्वारी जरिदे[१६४] भले लोकानसी या प्रांतात आले तो हे वर्तमान नागपुरात समजल्यानंतर श्रीमंत सेनासाहेब व दाजीसाहेब व भवानीपंत आबा[१६५] सुधा येऊन प्राा वालापूर येथे उभयेतासी भेटी जाल्या. किले गोवल येथे किल्लेदाराच्या भाचे यानी फंद केला. त्याजला समजुता करऱ्याविसी संताजी नाईक, माहादाजी नाईकाचे बाप व कुशाबा चिटणविस याजला पाटविले. परंतु तो निमकहराम. यानी बहुतप्रकारे खातरजमा[१६६] केली आस्ता त्याचे ध्यानास[१६७] न आले. सिरफ[१६८] निमकहरामीवरच कंवर बांधली तेव्हा आपले ठिकाणी मसलहतीची योजना करून कूच दरकूच

---

१६०. इ. स. १७८६ मध्ये.

१६१. हे कोण याचा खुलासा होत नाही.

१६२. पांडुरंगपंत दादा बक्षीं आणि यशवंतराव बक्षी.

१६३. ह्या वंडाळीचा उल्लेख "नागपूर प्रांताच्या इतिहासात" नाही. (या. मा. का.)

१६४. एकटा.

१६५. भवानी पंडित.

१६६. खात्री, समाधान.

१६७. पसंतीस.

१६८. केवळ.

खासा स्वारी किल्याचे माचीस येऊन दाखल जाली. त्यानाहि तिकडून आपला सरंजाम, पैदल व तोफासुधा तोडे सुलगाऊन तयारच होते.

भवानीपंडिताने संतोकसिंगाला युक्तीने कसे शरण आणले त्याची हकिकत–

तेव्हा भवानीपंत आवा याणी विनंती केली जे पहिले मीच जातो. नंतर खासा स्वारीचे येणे घडावे. यैसी आज्ञा घेऊन सेपनास खासा बरोबर घेऊन पुढे आले. किलेदारानी सांगून पाठविले जे इतके जमावानसी तुम्हास घेनार नाही. दाहापाच इसमानसी मोठ्या बाजीदीने[१६९] परवानगी दिल्ही. तैसेच चढे स्वारी किल्यात दाखल होऊन तिकडेस इशारा पाठविला जे खासा स्वारीहि लगतच मागोमाग येऊन पोहोचावी. आवघे सरदार पायेउतारे[१७०] खासा स्वारी बरोबर किला चढून दरवाजामधे दाखल जाले. तेव्हा भवानीपंत आवा यानी संतोखसिंग याचा हात धरून सरकारचे पायावर घालायास आनला. तो इतकीयात पांडुरंगपंत याजला इशारा जाला आस्ता जे मातबर सरदार गुलाम आलीखान, आमीखान छेपारेवाले वगैरे मोटमोटे सरदार यानीच त्याजला धरून त्याचे मुशके बांधले व इकडून पांडुरंगपंत याजला आज्ञा जाली जे हे तोडे सुलगाऊन[१७१] लोक बसले आहे तयाचा बंदोबस्त करणे. तेव्हा यानी सर्वत्र लोकाचे हत्यारे हिसकून घेऊन मुशके बांधले. ज्याची तकसीर[१७२] ज्याप्रमाणे तैसी सजा त्याजला पोहोचाऊन आवघ्यास काहाडून दिल्हे व बंदोबस्त आपला केला. नंतर संतोकसिंगास बहूत विपतीने[१७३] मारला.

---

१६९. कष्टाने, मिनतवारीने.

१७०. सर्व सरदार पायीच गेले.

१७१. सुरुंग लावून.

१७२. अपराध, गुन्हा.

१७३. हाल हाल करून.

टिपूविरुद्ध मोहीम – बदामीचा किल्ला जिंकला–

तो इतकियात नाना फडनविस व श्रीमंत पंतप्रधान याचे पत्र आले जे किल्याचा बंदोवस्त केला असल्यास फौजसुद्धा लवकर येणे. मसलतीस दिवस थोडके राहिलेत. तेव्हा येथील बंदोवस्त करून नंतर खासा स्वारी मागती पुन्यास गेली. राजश्री भवानीपंत आवा व श्रीमंत सेनासाहेब सुभा स्वस्थानी राहिले. नंतर पंतप्रधान व नाना फडनविस व बंदगानआली सर्वत्र फौजासुधा जातीने वाहेर निघोन यादगीर कृष्णतीर[१७४] येथे सर्वत्राच्या भेटी जाल्यानंतर मसलहत टहरली जे टिपूवर मोहीम करावी.[१७५] तेथून कूच दरकूच वदामी व गजेन्द्रगड येथे आले तेव्हा बदामी जागा मजबूत. सर्वत्राची मसलहत की किल्यावर हला करावा. हे मसलहत करून हला केली. नंतर माणूस बहुत जाया होऊन किला हस्तगत केला. मग मसलहत टहरली जे नवाबानी आपले स्वस्थानास जावे व आपलाले फौजा देऊन टिपूचे मुलकात मोहीम करावी. नबाबाकडील शरफुदवला व श्रीमंत पंतप्रधानाकडील हरिपंत तात्या व श्रीमंत सेनाबहादर याचे समागमे जैरामपंत तात्या पांडुरंगपंत याचे कनिष्ट बंधु नेमस्त[१७६] करून सर्वत्राच्या बिदाग्या जाहल्या व खासा स्वारी आपले स्वस्थानास आली. नव महिनेपर्यंत फौजा त्या प्रांती राहून आपआपले स्थलास गेल्या.

---

१७४. कृष्णानदीच्या तीरावर यादगीर ह्या ठिकाणीं.

१७५. इ. स. १७८५ मध्ये नाना फडणविसाने टिपूवर स्वारी करण्याची योजना आखली त्याला "बदामीची लढाई" असे म्हणतात. ह्या स्वारीचा ह्या ठिकाणी उल्लेख आढळतो. नाना फडणविसाने ह्या स्वारीत सामील होण्याकरिता मुधोजी भोसले याला बोलाविणे पाठविले. परंतु मुधोजी ह्यावेळी खंडोबाच्या यात्रेला गेला होता. एप्रिल १७८५ मधील ह्या बदामीच्या स्वारीत त्याने खंडोजी उर्फ चिमणाबापूस बदामीच्या स्वारीवर पाठविले. ह्या मोहिमेत चिमणाबापूने बरेच शौर्य दाखविले. (पहा, काळे ना. प्रां. ह. पा. नं. २१३).

१७६. नेमणूक करून.

भवानीपंताची काशीयात्रा परंतु मुधोजीच्या मृत्युमुळे काशीहून लवकर परत :

नंतर भवानीपंत आवा[१७७] यांनी सरकारात विनंती करून कासीस जाण्याची आज्ञा मागितली. श्रीमंतांनी नकार दिला. परंतु श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांनी विनंती करून परवानगी देविली. तेव्हा वडील पुत्र बलवंतराव व कनिष्ट माधवराव नाना समागमे घेऊन कासीस गेले. येथे पांडुरंगपंत, येशवंतराव भाऊ वगैरे मंडळी येथे राहिली. हे तिकडेस गेल्यानंतर श्रीमंत मुधोजी भोसले सेनाधुरंधर याचा काल जाला.[१७८] श्रीमंत मातुश्री बाईसाहेब व श्रीमंत सेनासाहेब सुभा यानी जलदी कासदाच्या जोडया चालनार[१७९] राजश्री भवानीपंत आवा याजला कासीहून जलद येन्याविसी पत्रे गेली त्याजवरून तेथील यात्रेचा गुंता उरकून सर्व खटला मागे टाकून डाकेवर बारावे दिवसी येथे पोहोचले. इकडून हस्तकबालाकरिता[१८०] सिपाई बमये[१८१] खासा स्वारीसुद्धा[१८२] कन्हान नदीपावेतो जाऊन घेऊन आले.

कॉर्नवॉलिसची टिपूविरुद्ध मोहीम : भवानी पंडिताचा वडील मुलगा बलवंतराव याची फौजेसुधा रवानगी–

काही दिवस गुजरल्यानंतर श्रीमंत रघुजी भोसले सेनासाहेब सुभा सन ११९८ चे साली काही येक जबाब सवाल उमगून घेण्याकरिता[१८३] पुण्यास गेले. समागमे पांडुरंगपंत दादा व येशवंतराव भाऊ व रघुपतराव

---

१७७. भवानी पंडित.

१७८. दिनांक १९ मे १७८८ रोजी मुधोजी नागपूरास मृत्यु पावला तर बिंबाजी ७ डिसेंबर १७८७ रोजी रतनपूर ह्याठिकाणी मृत्यु पावला.

१७९. जलद चालणाऱ्या हेरांच्या जोड्या पाठवून.

१८०. स्वागताकरिता.

१८१. सहित.

१८२. खुद्द श्रीमंतांची स्वारी म्हणजे दुसरे रघुजी भोसले.

१८३. समजाऊन घेण्याकरिता.

नामे पांडुरंगपंताचे ज्येष्टपुत्र समागमे गेले. राजश्री भवानीपंत आवा श्रीमंत सेना बाहदर व नाना साहेब याजवल स्वस्थानी राहिले. नंतर पाचा महिन्याउपर श्रीमंत सेनासाहेब सुभा तेथील कारभार उरकून स्वस्थानास दाखल जाले. काहीएक दिवस गुजरल्यानंतर श्रीमंत खंडोजी भोसले सेना बाहदर यांचा एकाएकी काळ जाहला.[१८४] श्रीमंत मातुश्री बाईसाहेबास बहूत शोक जाहला तो इतकीयात नबाव बंदगानआली व श्रीमंत पंतप्रधान याचे परस्परे मसलहत होऊन हैदराबादेहून पानगलचे मुकामी काही दिवस नवावानी फौजसुधा मुकाम केले[१८५] तिकडून श्रीमंत पंतप्रधान याचे तरफेने रा॥ हरिपंत तात्या फौजेसुधा वाहेर निघाले कारण कारनवालीसाहेब यानी टिपूवर मोहिमीचा उद्योग करून कलकत्याहून कूच दरकूच करून कर्नाटककडे सैन्याला रवाना केले.[१८६] तेव्हा इकडेस श्रीमंत सेनासाहेब सुभा याजलाहि पत्र श्रीमंत पंतप्रधान व नवाव बंदगानआली याजकडून आली जे इंग्रेज बाहादूराकडून मिस्तर फास्तरसाहेब[१८७] आले जे तुम्हाकडून मदतीस फौज यावी त्याजवरून भवानीपंत आवाचे ज्येस्ट पुत्र वलवंतराव याजवरोबर सात हजार

---

१८४. श्रीमंत खंडोजी भोसले किंवा चिमणाबापू हा एकाएकी दिनांक १६ ऑगस्ट १७८९ रोजी निवर्तला. अप्रकाशित औरंगाबादकर बखरीत मात्र त्याच्या मृत्युची तारीख १५ आक्टोबर १७९० दिलेली आढळते. दुसऱ्या रघुजीने मूठ मारून त्याला मारले अशा अफवा ह्यावेळी पसरल्या. कारण दोघांचे संबंध विशेष चांगले नव्हते.

१८५. ही घटना १७९० मधील आहे.

१८६. कॉर्नवालीसने टिपू सुलतानाविरुद्ध ही जी मोहीम उभारली ती इ. स. १७९० ते १७९२ ह्या कालखंडात घडून आली. इंग्रजांनी ह्या वेळी मराठे निजाम यांनाही ह्या युद्धात सामील करून घेतले. युद्धात शेवटी टिपू सुलतानाचा पराभव होऊन त्याला श्रीरंगपट्टमच्या तहावर सही करावी लागली (६-२-१७९२).

१८७. कॉर्नवालिसने टिपूशी होणाऱ्या युद्धात निजामाने सामील व्हावे म्हणून आपला वकील वाटाघाटीकरिता पाठविला होता. तसाच एक वकील जॉर्ज फॉर्स्टर त्याने नागपूरकर भोसल्यांकडेही रवाना केला होता. त्याच्या

फौज देऊन रवाना केले तो तिकडील फौजा नवाब बंदगानआली याचे पुत्र पोलादजंग व कारभारी मशीरुल्मुल्क श्रीमंत राजश्री पंतप्रधानाकडील हरिपंत तात्या फडके वगैर सरदार हेहि याजमधे शामील होऊन यास व लाट मनसुफासी[१८८] भेटी होऊन टिपूवर मोहीम केली.[१८९] लढाया दोन च्यार जाल्या. सेवटी टिपू याचे प्रतापापुढे ताबा न आणून[१९०] सलुकाचा पैगाम[१९१] केला. करोडाचा मुलक व तीन करोड रुपये नगदी रईसास[१९२] देऊन तहनामा टहरून आपलाले स्वस्थानास आले. नंतर बलवंतराव[१९३] याजला हरिपंत फडके यानी पुण्यास नेऊन काहीक दिवस तेथे टेऊन मानसन्मान देऊन नागपूरास विदा केले. जेव्हा करनाटकाची मसलहत तिकडेस उभी राहिली त्याच दिवसात श्रीमंत मातुश्री वाईसाहेब व नानासाहेब श्री कासी यात्रेस गेले. समागमे येशवंतराव भाऊही होते. येक वरीश यात्रा करून मागती स्वस्थानास आले.

छत्तीसगडातील जमिनदारांचा दंगा : दंगा मिटविण्यात भवानीपंडिताच्या घराण्याची कामगिरी–

सन १२०३ चे साली[१९४] छत्तीसगड प्रांती जमिदारा येकत्र होऊन प्रांतामध्ये गैरचाल आरंभिली. त्याजवरून येथून पांडुरंगपंत दादा

(तळटीप १८७ पुढे चालू)

वकीलीचा ह्या ठिकाणी उल्लेख आढळतो. फॉर्स्टरची पहिली वकीली १५–१–१७८८ पासून १०–२–१७८९ पर्यंत होती तर दुसरी वकीली ७–३–१७९० पासून ५–१–१७९१ पर्यंतच्या कालावधीपुरती मर्यादित होती.

१८८. उपरनिर्दिष्ट.

१८९. त्रिवर्गतह १–६–१७९० रोजी घडून आला.

१९०. पराभव करता न आल्यामुळे.

१९१. प्रस्ताव मांडला.

१९२. सरदारास.

१९३. भवानी पंडिताचा मुलगा.

१९४. इ. स. १७९४–९५.

याचे वडीलपुत्र रघुपतराव नामे, समागमे फौज मानकरी, लोक व पठाण यैसे देऊन त्या प्रांती विदा केले. मशारनिलेनी जाऊन तेथे बंदोबस्त, जमिदारा वगैरे बिगडला होता त्याजला तंबी पोहोचाऊन बंदोबस्त करार वाकई[१९५] (केला.) काहीक दिवस तेथे राहून तेथील बंदोबस्त चांगला जाला यैसे समजोन विठल दिनकर नामे पूर्वी तेथील कामदार त्याजला स्थापिले.

खडर्याची लढाई–

तो इकडेस खडर्याची मसलहत नमूद जाली[१९६] म्हणून सरकारचे बोलावणे गेले जे तुम्ही फौजसुधा जलद येऊन दाखल होणे त्याजवरून फौजेसुधा नागपुरास दाखल जाले. सन १२०४ चे[१९७] साली नवाव बंदगानआली व श्रीमंत राजश्री पंतप्रधान यासी मागती बिगाड होऊन उभयेताहि फौजसुधा वाहेर निघाले. श्रीमंत रा।।। पंतप्रधान याहाचे पत्र श्रीमंत सेनासाहेव सुभा याजला आले जे तुम्ही आमचे मदतीस येऊन पोहो(च)णे तेव्हा फौज तिकडेस जाण्याचा इरादा मुकरर टहरला. श्रीमंत सेनाधुरंधर व भवानीपंत[१९८] याजला स्वस्थानी टेऊन पांडुरंगपंत दादा व येशवंतराव भाऊ व माधवराव व रघुपतराव याजला समागमे घेऊन स्वारी कूच दर कूच जाऊन श्रीमंत पंतप्रधान याची भेट जाली. नंतर हे व ते येकत्र होऊन नवावाचे मुकावल्यावर गेले. प्रगणे खरडे येथे उभैतासी लढाई जाली.[१९९] त्यासमई दवलतराव सिंदे याजकडील तोफखाना व इकडील वाण याणे मोटे काम केले. इकडील फते

---

१९५. पक्का करणे.

१९६. इ. स. १७९५ च्या प्रारंभी.

१९७. इ. स. १७९५–१७९६ साली. खडर्याची लढाई ११ मार्च १७९५ रोजी झाली.

१९८. भवानी पंडित.

१९९. खडर्याची लढाई ११ मार्च १७९५ रोजी झाली.

जाली. नवाव सिकस्त[200] खाऊन खरड्याचे किल्यात दाखल जाह्ले. नंतर श्रीमंत पंतप्रधान याजकडून जवाव सवाल पडला जे पासस्टी लक्षाचा मुलक[201] व ज्यानी येव्हढी फिसाद[202] उत्पन्न केली त्याजला आमचे हवाले करणे. हा सवाल जाताच मशीरुलमुल्क[203] याजला नबावाणी विचारिले जे पुढे कैसे करावे. त्याणी उत्तर केले जे आपली दौलत कायेम आहे तर माझेसारखे चाकर वहूत मिळतील हाहि भरोसा मजला आहे. जे खाविंद सिरावर[204] आसल्यास मजला सोडवितील आता मजला देण्याविसी काही आंदेशा[205] न करिता त्याहाचे हवाले करून द्यावे व दवलत कायेम ठेवावी. यैसा निश्चय टहरल्यानंतर श्रीमंत पंतप्रधान याचे स्वाधीन मशीरुल्मुल्क याजला केले. आवग्र फौजा स्वस्थान पुणे येथे दाखल जाल्या. नवाव हैदरावादेस गेले. श्रीमंत सेनासाहेब सुधा काही येक दिवस पुन्यात राहून परस्परे मानसन्मानादिक होऊन रेवा दक्षनतीर येथील सनदा देऊन रूखसत दिल्ही. तो नागपूर मुकाम येथे आले.

सवाई माधवरावाचा मृत्यु आणि पेशवे पदाकरिता पुणे दरबारातील विविध कारस्थाने : भवानी पंडिताच्या कुटुंबाच्या हालचाली–

मागाहून लगतच खवर आली जे श्रीमंत रा।। सवाई माधोराव-साहेब माडीवरून पडून काहीक वेलपरियेत जिवंत राहून मृत्योस पावले.[206] मोठा आनर्थ जाहला. सर्वत्र रईस[207] आपले आपले जागी

२००. पराभव.

२०१. पासष्ट लक्षाचा मुलुख.

२०२. बेदिली, भांडण.

२०३. मुशिरउलमुल्क.

२०४. सिरा म्हणजे उत्तम. धनी उत्तम असल्यास मला सोडवितील हा भावार्थ.

२०५. विचार न करता.

२०६. सवाई माधवरावाचा मृत्यु २७ आक्टोबर १७९६ रोजी झाला.

२०७. सरदार.

खिन्न जाहाले. मग श्रीमंत सेनासाहेब सुभा काहीक दिवस वराड प्रांती राहून नंतर श्रीमंत नानासाहेब याजला आपासाहेव पुत्रजन्म जाले. हे उछावाचे[२०८] वर्तमान येकून रा।। भवानीपंत आबा[२०९] याजला फौजेत येऊन आपण व श्रीमंत बाबासाहेब पांडुरंगपंत दादा याजला समागमे घेऊन नागपुरास गेले. काहीक दिवस गुजरल्यानंतर रा।। पांडुरंगपंतदादा याहाचे पुत्र रघुपतराव याजला फौजसुधा रेवा दक्षन तीर येथे आमल दखल करावयाकरिता रवाना केले. याणे थोडकेच दिवसात वमये[२१०] चवरागड आमल करून स्वस्थानास आले. नंतर इकडे सिंद्याचे[२११] व श्रीमंत रावसाहेब[२१२] याचे संधान लागून कोपरगावाहून पुण्यास आणिले. रा।। नाना फडनवीस याची मसलहत घेऊन राज्यावर वसवावे हे सिधीस न जाता सिद्याचे चितात नानाचे तरफेने वैमनस्य होऊन नाना महाडास गेले. इकडे मध्यंतरी च्यार दिवस परशरामपंत भाऊ[२१३] याणी सिंद्याच्या आणुमते[२१४] चिमाजी आपास[२१५] मसनदनशीन केले परंतु ते मसलहत सिधीस न गेली कारन जे सिंद्याचे सल्हेत ते गोस्ट आणकूल न पडली. मागती यैसा सिधांत टहरला जे श्रीमंत बाजीरावसाहेव याणी मसनदनशीन व्हावे तेव्हा इकडील कारभारी श्रीधर लक्ष्मण मुनसी व कृष्णराव माधव चिटनवीस तेथे होते तेव्हा सिंद्याचे विद्यमाणे मशीरुल्मुल्क[२१६] याजला सोडावे व राजश्री नाना फडनवीस याज

२०८. उत्सवाचे, आनंदाचे. अप्पासाहेबांचा जन्म इ. स. १७९६.

२०९. भवानी पंडित.

२१०. सहित.

२११. दौलतराव शिंदे.

२१२. बाजीराव दुसरा.

२१३. परशराम भाऊ पटवर्धन.

२१४. अनुमतीने.

२१५. चिमाजी अप्पा दुसरा.

२१६. मुशिरउलमुल्क असे सुद्धा मराठीत लिहितात.

आणून पूर्ववत कारभारी करावे येसे संमत टहरून मशीरुल्मुल्क याजला कैदेतून सोडिले व नाना फडनवीस याजलाहि आणून कारभारावर कायेम केले. तेव्हा उभयेता कारभारी याहिचे पत्रे व सिंदे व मशीरुल्-मुल्क व नाना फडनवीस याची पत्रे श्रीमंत सेनासाहेब सुभा याजला आली जे आपले येणे फौजसुधा जलदीने व्हावे. त्याजवरून श्रीमंत साहेब व नानासाहेब सेनाधुरंधर व पांडुरंगपंतदादा व वलवंतरावजी व येशवंतरावभाऊ व माधवराव व रघुपतराव व पांडुरंग व अमृतराव पांडुरंग व लक्ष्मणराव जैराम यैसे समागमे गेले. मग तेथे जाऊन श्रीमंत बाजीराव साहेब याजला मसनदनशीन केले.[२१७] त्या समई मशीरुल्मुल्क याणी पासस्टी लक्षाचा मुळीक खडर्याचे साली दिला तो मागती श्रीमंत पंतप्रधान याजपासून घेऊन रूकसत घेतली[२१८] व श्रीमत सेनासाहेब सुभा याजला प्रांत मंडळे वगैरे सनदा देऊन परस्परे मानसन्मान दिला.[२१९] हे देऊन आपले स्वस्थानास आले.

मंडला ह्या ठिकाणी भोसल्यांनी आपली सत्ता प्रस्थापित केली–

नंतर मंडला येथील मुळीक काबीज करावयाकरिता विठलपंत सुभेदार व आम्हाकडील सखाराम आवधूत याजला समागमे देऊन विदा केले. याणी जाऊन तो प्रांत काबीज करून आपला वसविला व हुशंगाबादेसहि पेशजी[२२०] आमल आम्हाकडील सखाराम आवधूत व सुभेदार मिळून बसविला. आमल बसविल्या प्रकर्णी लढायाहि जाल्या परंतु शत्रूस पादाक्रांत करून आमल दखल करार वाकई[२२१] जाला. मग

२१७. ४ डिसेंबर १७९६ रोजी बाजीराव पेशवा पदावर आरूढ झाला.

२१८. निरोप घेतला.

२१९. खडर्याच्या लढाईनंतर भोसल्यांना मंडला आदि प्रदेशाचा तावा मिळाला त्याचीच हकिकत ह्या ठिकाणी आलेली आहे. परंतु ही हकिकत गुप्ते यांच्या बखरीत नाही.

२२०. पूर्वी.

२२१. पक्का.

त्या प्रांतात नाना घाटगे सरदार याजला ठेवून फौजा स्वस्थानास दाखल जाल्या. तो इकडे नाना फडनवीस यासी व सिंदे यासी वैमनस्य होऊन सिद्यांनी नाना फडनवीस याजला कैद केले.

यशवंतराव होळकराची बाजीरावावर स्वारी :

बाजीराव आणि इंग्रज यांच्यात वसईचा तह–

तेव्हा मोरोबा दादा याजला कारभारी केले. तेव्हा सिंदे[२२२] याचा उत्कर्ष भारी. तुकोजी होळकर याहाचे पुत्र मल्हारराव नामे पुण्यात आस्ता सिद्यासी व त्याहासी[२२३] खरकशा कासीराव होळकर याचे वारसदारीमुळे येऊन सिद्यांनी त्याजवर हला करून जिवे मारले. त्यानीहि जुजन्यास[२२४] कसूर केला नाही. याहाची[२२५] फौज भारी तेव्हा ताव कैसी निघते. सारांश दिवसोदिवस सिद्याचा उत्कर्ष होत राहिला. त्या गर्दीतून येशवंतराव नामे होळकर याचे कृष्ण पक्षी पुत्र संभरा स्वारानिसी निघून नागपूरास आले. काही येक दिवस राहून फंदामधे आसलेले[२२६] म्हणूग नजरबंद टेविले. तेथूनहि निघोन गेले. ईश्वर सत्ता विचित्र. काही दिवसात फौजेचा जमाव होऊन शह सिद्यावर दिल्हा.[२२७] येक दोन लढाया याच्या व त्याच्या होऊन पुण्याचे रूखावर आला व श्रीमंत पंतप्रधानास पत्र लिहिले जे मी आपला चाकर आहो. सिद्यासी व आमासी[२२८] दावा आहे. त्यास आपण सिद्याची पर्वा न करिता आमचा व त्याचा तमाशा पहावा. ज्यास ईश्वर देईल तो आपली चाकरी

२२२. दौलतराव शिंदे.

२२३. वैमनस्य.

२२४. लढण्यास, प्रतिकार करण्यास.

२२५. दौलतराव शिंद्याची.

२२६. बंड केलेले होते म्हणून. यशवंतराव होळकराला नागपूरला कैद केल्याची हकिकत गुप्ते यांच्या बखरीत, पान १८९ वर आलेली आहे.

२२७. यशवंतराव होळकराने फौज जमवून शिंद्याना शह दिला.

२२८. आमच्याशी.

करील. खाविंदाची बेआदबी करणे हे चाकरास ठीक नाही. येसे पत्र येताच श्रीमंताचा जवाब गेला जे तुम्ही सिद्यावर हरगीज कस्त[२२९] न करणे. सिद्यावर कस्त केल्यास त्याचे फलहि तुम्हास दिसेल. येसी उत्तरे येताच कूच करून पुन्याचे जवल दाखल जाला. व आनिकहि श्रीमंतास लिहून पाठविले जे मी आपले इमानास आदा जालो परंतु तिकडून सरकारातून पाच गोले सुटल्याशिवाय मी बेआदबी करनार नाही.[२३०] इतके लिहिले आस्ता इकडून गोला सुरू जाहला. दोन प्रहर परियेत लढाई जाली. आखर सिद्याची फौज श्रीमंत बाजीरावसाहेब उभयेता बंधु सिकस्त[२३१] होऊन मुंबईचा रोख धरला. आंग्रेज बाहादूर यासी लिहिले जे आमची आवस्था यैसी जाली त्यास आम्हास आपले सिलामात[२३२] घेऊन आमचे शत्रुचा पराभव करणे. त्याजवरून आंगरेज बाहादुरानी याजला आपले येथे नेऊन खातरजमा केली व तहनामा याचा व त्याहाचा जाला. होळकर याणी पुन्यामधे श्रीमंत आमृतराव साहेब याचे चिरंजीव विनायेकरावसाहेब याजला मसनदनशीन करून बावा फडके हे कारभारी केले. तहनाम्याच्या नकला जागोजागी रईसाचे[२३२ अ] येथे आल्या तेव्हा उभयेता मुनसी व चिटनवीस येथील कारभारी तेथेच होते त्यांनीहि नकला पाठविल्या.

गुलाबसिंगाच्या सैन्याने केलेली बंडाळी आणि पांडुरंगपंताने त्याचा केलेला बंदोबस्त–

तो इकडेस सन १२१०[२३३] चे साली वराडप्रांती नाइकडे व गाजीखान वगैरे याच्या बंदोबस्ताकरिता गुलाबसिंगापैकी कंपू[२३४] व

२२९. हेतु, ध्येय. शिद्यांना उपद्रव देण्याचे ध्येय न ठेवावे हा भावार्थ.

२३०. बाजीरावाने आपल्यावर प्रथमतः हल्ला केल्याशिवाय आपण लढाईला सुरवात करणार नाही हा भावार्थ.

२३१. पराभूत.

२३२. मूळ शब्द सिलह असावा. सिलह म्हणजे स्नेह.

२३२–अ. निरनिराळ्या सरदारांच्या दरबारात.

तोफखाना तेथेंच होता तेव्हा दोन महिने त्याजला खर्चाची आडचन पडली आस्ता तेथील अकसर लोकाणी फंद करून तेथील कामदार याणी वहुता प्रकारे समजाविले आस्ता सिर्फ[२३५] निमकहरामीवर द्रिस्ट देऊन वमये[२३६] पनास तोफा व मग जिनसाचे सरंजामसुधा तेथून इरादा केला जे नागपूरास जाऊन खाशाची भेट घेऊन स्वस्थानाची[२३७] खराबी करावी. इकडे पाहिले आस्ताना आवघी फौज रा ॥ विटल बलाल सुभेदार व इकडील सखाराम आवधूत याजबरोबर हुसंगाबाद व प्रांत मंडळ येथ गेली होती. स्वस्थानी फौज जुजबी होती. व त्यानी निमकहरामी मानितो कूच दर कूच वरधा उतरून कोंढाळीचे मैदानात वमये तोफखान्या-सुधा येऊन दाखल जाले. तेथून मनास वाटले मुद्याची याद पाठविली. तेव्हा फौज तो थोडकी व त्याचा सरंजाम भारी. इरादा हाच जे येकदा सरकार हवेली पाहावी. मोटी संकस्टाची गोष्ट प्राप्त जाली आस्ता सर्वत्त कारभाऱ्यास बोलऊन पुसले जे पुढे कैस करावे तेव्हा रा।। पांडुरंगपंत दादा[२३८] बोलले जे आम्ही इतके दिवस सरकारचे आन्न भक्षिले त्यास मजला आज्ञा व्हावी. नंतर-जितकी जुजबी फौज होती ते घेऊन त्याचे मुकावल्यावर वाजारगावा-वर जाऊन त्याहासी जवाव सवालाचे संधान लाविले परंतु ते सिर्फ[२३९] निमकहरामीवर दुसरा विच्यारच नाही. तेव्हा मोटे कार-

---

२३३. इ. स. १८०१–०२ मध्ये.

२३४. सैन्य. गुलाबसिंगाच्या बंडाळचा :– गुप्तेकृत बखर पान नं. १९४. राम–सोटाचा उल्लेख भवानी पंडिताच्या बखरीत नाही. गुप्तेच्या बखरीत ह्या प्रकरणाचा फारच थोडा उल्लेख आलेला आहे.

२३५. फक्त.

२३६. सहित.

२३७. नागपूर शहराची.

२३८. पांडुरंगपंत दादा वक्षी.

२३९. फक्त.

वाईने त्याचा मूकाम तेथे करऊन आपण प्रा। व्याहाड येथे मुकाम केला. बारा दिवस परियेंत नित्य उठोन तिकडेस त्याची तयारी व इकडे याची तयारी येसे आस्ता तेरावे दिवसी याचे व त्याचे मुकावल्याचा प्रसंग पडला. तेव्हा इकडून वाण वगैरे चालले. त्याणीहि तोफास बत्ती द्यावी परंतु ईश्वर सत्ता विचित्र. त्यांनी वत्ती दिल्ही आस्ता तीन वेळा रंजका[२४०] प्याला. तेव्हा त्यांनी सवाल जवाब सालावर घातले. जे राजश्री पांडुरंगपंत दादा याणी आमची खातरजमा केली आस्ता आम्ही जितके आपसर लोक आहो तितके जबाबसालाकरिता येतो. तेव्हा याणी सलाह वख्त पाहून आपले खाविंदाची दौलत व जागा कायेम राहावी यैसे समजून त्याची खातरी केली. त्याजवरून आवघे आपसर लोक याचे डेरियास येऊन बोलले जे आमचे तलबेचा[२४१] फडशा करून द्यावा त्याजवरून आपले कारकुणा हाती त्याचा हिसेब करविला तेव्हा तो हिसेब त्याचे मनास न येता मनस्वी रुपया मागू लागले. यानी त्याची खातरी केली होती. याजकरिता श्रीमंत साहेबास विनंती लिहून पाटविली जे आपले हिशेवाने येक लाख ब्यासी हजार रुपयें निघाले त्याजप्रमाणे सरकारातून यैवजाची मदत व्हावी त्याजवरून श्रीमंत सेनासाहेबानी येवजाची मदत केली. व त्यासी बोलण्यात आणिले जे जे बाजवी तलब निघेल ते तुम्ही घ्यावी. तेव्हा त्याणी आपले चित्तात कोनास न कळता इरादा आनला जे हा रुपया हस्तगत करून घ्यावा परंतु चित्त शुद्ध नव्हते. वदीच ठेवून होते. येवजाचा वटवडा जाल्यानंतर यानी त्याजला सवाल केला जे तुमचे तलबेचा फडच्या करून दिल्हा. आता तोफखाना व बंदुखा आमच्या आम्हास देऊन तुम्ही नरमदा पार जाणे. तेव्हा त्याणी या गोस्टीस मागती इनकार करून दगा करावा हे चितात आणिले तेव्हा ही संकस्टाची गोस्ट जाली. जे

२४०. दारू जळून बार न उडणे.
२४१. मागणीचा.

सरकारचा रूपया बरवाद होऊन काहीच साध्य न जाले. तेव्हा यानी जे कारवाया केल्या, मसलतीहि वहूत केल्या याचा तपसील लिहिला आस्ता वहुत तुल होईल. गरज याचेच काम होते जे याजला आपले काबूत आणिले. त्याचा जवावसवाल मागती दंग्याचा पडला आस्ता याणी बहूतसी खातरदारी करून त्याचेच मनस्वी मुदे कबूल करून तोफा व बंदुका हस्तगत केल्या व इकडे श्रीमंत साहेवास लिहून पाठविले जे समये पाहून आम्ही मुदे कबूल करून महाराजाचे पायापासी येतो यैसे लिहिल्यानंतर जितके आपसर लोक होते तितक्या सुधा लगत नागपूरास घेऊन आले. पूर्वी कैसेहि काबूत यावयाकरिताच मुदे कबूल करणे प्राप्त सरकारात ते मुदे नामंजूर होऊन याचेच मसहलतीने आज्ञा केली जे हे मुदे आम्हास कबूल करावयाचे नाहीत. पहिले हिसेब करून त्याची तलब त्याजला दिल्ही आहे ते घेऊन आपलाले देशास जावे. न यैकतील तरी शासन करावे. तेव्हा हे गोस्ट त्याणी न यैकीली व मागती दगा करावा हा विच्यार पाहून सर्वत्र आपसर लोकाचे हत्यारे हिसकून मुशके बांधले[२४२] व जो जो ज्यात कसरी लायेक होता तैसी तैसी सजा त्याजला पोहचाविली. येसे आरिस्ट दवलवतीवर आले आस्ता कारवाईचे पोटी निवारण केले.

शिद्यांना वसईचा तह पसंत पडला नाही : भोसले होळकर–शिंदे फळी इंग्रजांविरूद्ध तयार करण्याचा शिद्यांचा प्रयत्न –

याजउपर तो तहनामा सिंदे याजकडे गेला आस्ता त्यांनी पाहून वालाजी येशवंत[२४३] याजला इकडेस रवाना केले. काही येक दिवस

---

२४२. मुसक्या बांधल्या.

२४३. बाळाजी यशवंत याला रघुजी भोसला (दुसरा) याजकडे दौलतराव शिंदे यांनी पाठविल्याचा उल्लेख आपल्याला या. मा. काळे यांच्या ना. प्रा. इ. त. पान नं. ३२१ वर सापडतो. वसईच्या तहाचे स्वरूप पाहून मराठा राज्याचा शेवट जवळ आला असे दौलतराव शिंदे याज वाटले व त्यांनी ह्या वकीलाला पाठविले.

गुजरल्यावर सिंदे याणी ब्राह्मणपुराहून राजश्री यादवराव भास्कर[२४४] मुख्य कारभारी इकडे पाठविले. त्यांनी येथे समजाविले की ह्या तहनाम्याने कोनाचीहि स्थिती राहील यैसे दिसत नाही. त्यास आंग्रेज वाहादुरावर मोहीम करावी या उद्देशे करून याजला फौजेसुद्धा वाहेर निघावे यैसे टहराऊन डेरे वाहीर केले. कूच दरकूच मुकाम मलकापूर येथे दाखल जाले. तिकडून सिंदे मवसुफहि[२४५] येऊन उभयेताच्या भेटी जाहल्यानंतर वलजलीसाहेव[२४६] व कर्णेल कळुस[२४७] याजकडून वकील कलसनसाहेव[२४८] मलकापूरचे मुकामी आले. त्याणी वहुता प्रकारे उभयेता रईसास समजाविले जे आम्हासी व आपणासी काही दुष्मनी नाही. पंतप्रधान यांचा दुसमण तो आमचा दुसमण. प्रस्तुत आमचा दुसमण होलकर आहे. तुमची आमची दुसमणी नाही. आपण आपलाले सरहदेत राहावे आम्ही होलकरास पाहून घेऊ. परंतु ते गोस्ट उभयेतास मान्य न होता त्याची विदायेगी करून दिल्ही. इकडेस होलकराकडेस येशवंतराव रामचंद्र[२४९] याहाची विदागी केली व लिहिले जे तुम्ही व आम्ही येकत्र होऊन जे करणे ते करावे. तेव्हा त्याणी आपले मतलवाची याद लिहून पाठविली जे माझी मतलबाची याद सिंदे याजकडून उगऊन द्यावे व तुमची माझी भेट होईल त्याजवरून जे त्याहाचे मतलवाची याद होती त्यातून मोन मतलव. खंडेराव होलकर, त्याची मातुश्री याजला सोडून माझे इकडेस पाठऊन द्यावी व हिंदुस्थानची वाटणी

---

२४४. यादवराव भास्कर हा शिंद्यांचा दिवाण.

२४५. वर वर्णन केल्याप्रमाणे.

२४६. वेलस्ली.

२४७. कर्नल क्लोज.

२४८. कॉलिन्स.

२४९. रघुजी भोसल्याने यशवंतराव रामचंद्र यांस वाटाघाटी करण्याकरिता यशवंतराव होळकराकडे पाठविले.

आज रूये वांजवी मिळावी.[२५०] -त्याजवरून त्याजला मातुश्रीसहित सिंद्याचे येथून सोडून त्याचे बोलण्याप्रमाणे पाठऊन दिल्हे.[२५१] इकडे कलनसन साहेव [२५२]यानी जाऊन तेथे सांगितले जें उभयेता रईसाचे चित सलुकावर नाही. लढाई करावी हा मानस दिसतो-त्याजवरून फौजा आंग्रेजी लगतच येऊन मुकावल्यास नमूद जाहल्या.

दुसरे इंग्रज-मराठा युद्ध : आडगावची लढाई : भवानी पंडिताचा पुतण्या पांडुरंगपंत बक्षी याचा मृत्यु -

तेव्हा इकडून सिंद्याकडील रामचंद्र भास्कर व इकडून आम्हा-कडील सखाराम आवधूत यैसे रवाना केले. येक लढाई याहासी व त्याहासी जाली आस्ता वरावर राहिली. नंतर वलजलीसाहेव[२५३] व इछवर साहेव[२५४] दोघेही येकत्र होऊन जाफरावादचे मैदानात लढाई[२५५] जाली. तेव्हा इकडील फौजेची सिकस्त होऊन आंग्रेज वाहादुराची फते जाली. त्याजउपरी हे पुढे व आंग्रेज वाहादुराच्या फौजा मागे यैसे वीस वावीस दिवस परियेंत फिरत राहिले. त्यानंतर श्रीमंत सेनासाहेव कासारवारीच्या घाटाने तिकडेस घाटावर गेले व सिंदे वऱ्हाणपुरासच रूखावर गेले. व श्रीमंत सेनाधुरंधर व परसोजी भोसले व गुज्यावादादा व समागमे पांडुरंगपंतदादा व आमृतराव पांडुरंग व व्यंकटराव पांडुरंग यैसे समागमे घेऊन वालापुरास आले व तिकडेस सेनासाहेवाची कासार-

२५०. शिंदे आणि होळकर यांच्यात उत्तर हिंदुस्थानातील वाटणीचा लढा होता. ही वाटणी योग्य रितीने करून दिल्यास मी तुम्हाला सामील होतो असे यशवंतराव म्हणत होता.

२५१. यशवंतरावाचा पुतण्या खंडेराव होळकर हा बऱ्हाणपूरास दौलतराव शिंद्याच्या कैदेत होता. त्याची दौलतरावाने मुक्तता केली.

२५२. कॉलीन्स.

२५३. वेलस्लीसाहेव

२५४. हा स्टिव्हनसन होता हे वर्णनावरून उघड दिसते.

२५५. सप्टेंबर १८०३ मधे ही लढाई झाली.

वाडीचा घाट चढून वरते गेली आस्ता येक तुकडी आंगरेजाची त्याचे मागे व येक तुकडी सेना धुरंधर व दौलतराव सिंदे याचे मागे. त्यांस श्रीमंत साहेब[२५६] तो आपले गनीमच सामोरे मुकाबला न करिता फिरत राहिले. इकडे श्रीमत नानासाहेब व दौलतराव सिंदे यैसे प्रो॥ आडगाव येथे या दोही फौजेची व आंग्रेज वळजलीसाहेबासी मुकाबला जाहला.[२५७] दोन प्रहरापासून संध्याकाळपावेतो लढाई जाली. आखर ह्या दोही फौजेची शिकस्त होऊन आंग्रेज बाहदुराची फते जाली. तोफा वगैरे सरंजाम बहूत त्यानी हस्तगत केला. दोन कोस त्यानी पिछा करून मागती आपले मुकामास गेले. दोनही फौजा सिकस्त होऊन धामणगावास आले. हे वर्तमान सेनासाहेव सुभा याजला कलताच त्यानीहि इकडील कस्त केला.[२५८] मग लढाई सिकस्त जाली आस्ता पांडुरंगपंत दादा[२५९] यानी ईश्वरास प्रार्थना केली जे मजला श्रीमंतानी मुखत्यार करून याचे समागमे दिले व आजपावेतो जे गोस्ट जाली ते चांगलीच जाली. यैसे आपेश[२६०] कधीच आले नाही. लढाईत मरावयास कमती केले नाही. परंतु आयुष्य वलवत्तर. मृत्यु न जाला. आता हे वासना आहे. हे मुख मागती श्रीमंतास न दाखवावे.[२६१] यैसी देवपुजेचे वेळेस कुलदेवतेची प्रार्थना केली आस्ता लढाईपासोन सातवे दिवसी दोन प्रहर रात्री देवाज्ञा जाली.

इंग्रजांशी मैत्रीचा तह लवकर करावा : भवानी पंडिताचा सल्ला –

नंतर श्रीमंत साहेबाची स्वारी तिकडून येऊन दोनहि फौजा येकत्र जाहल्या. हे वर्तमान श्रीमंत मातुश्री बाईसाहेबास[२६२] समजताच

२५६. रघुजी भोसले दुसरा.

२५७. आडगावची लढाई २९ नोव्हेंबर १८०३ रोजी लढल्या गेली.

२५८. हल्ला, चढाई २५९. पांडुरंगपंत बक्षी. २६०. अपयश.

२६१. आपले काळे तोंड श्रीमंतास पुन्हा कधीहि दाखवू नये.

२६२. चिमाबाईसाहेबास.

राजश्री भवानीपंत आवा[२६३] याजला बोलावून आज्ञा केली जे गोस्ट बहुत विलग[२६४] जाली. पुढे कैसे करावे. तेव्हा याणी यैसी सलाह दिली जे उभयेता श्रीमंतास आपले पत्र जावे जे आता सलाह करणे उचित आहे. दुसरी गोस्ट हरगीज न करणे. आता आंगरेज यासी बिघाड केला आस्ता स्वस्थान राहणे कठीण. यैसी पत्रे पाठविली.

सल्ल्यानुसार भोसले इंग्रज तह–

इकडून सलुखाचे जवाब सवालास दिरंग लाविला आस्ता त्यांनी गोवलचा किला हला करून घेतला.[२६५] मग फारच लाच्यारी जाली.[२६६] तेव्हा राजश्री येशवंतराव रामचेंद्र याजला श्रीधर मुनसी याचे आणुमते सलाहचा तहनामा व्हावा याजकरिता वलजलीसाहेबाकडे[२६७] पाटविले.

देवगावचा तह –

तेव्हा त्यांनी तह टहराऊन दिल्हा जे वर्धेचे पलीकडील मुलीक[२६८] नवाब बंदगानआली याचे सरकारात द्यावा. कटक सरकार कुंपनी आंग्रेज बाहादर याजला द्यावा. गोवले खालील च्यार माहाल गोवले नरनाळा हे किले द्यावे.[२६९] यैसा तहनामा टहरून वलजलीसाहेब फौजेसुधा कूच करून गेले. व हे मासोदाचे[२७०] मुकामास आले. श्रीमंत

---

२६३. भवानी पंडित.

२६४. अघटित.

२६५. गाविलगडची लढाई १३ डिसेंबर १८०३ रोजी झाली.

२६६. निरूपाय होणे.

२६७. वेलस्ली.

२६८. मुलुख.

२६९. ह्याला देवगावचा तह असे नाव मिळाले. ह्या तहावर १७ डिसेंबर १८०३ रोजी सह्या करण्यात आल्या.

२७०. हे गाव कोणते याचा पत्ता लागत नाही. परंतु हे गाव अमरावतीजवळ असावे.

मातुश्री बाईसाहेब व भवानीपंत आबा व येथील सर्वत्र मंडळी याच्या भेटी जाल्या. काही येक दिवस मासोदावरच राहून जदीद[२७१] फौज टेवली होती तिची रफेदफे[२७२] करून काही फौज आम्हाकडील सखाराम आवधूत याजवरोवर देऊन हुसंगावाद प्रांत मंडळ या रूखांवर विदा केले. व स्वारी स्वस्थानास येऊन दाखल जाली.

भवानीपंताचा मृत्यु –

राजश्री पांडुरंगपंत दादा यास पुत्र चवघे. त्याजमधे वडील रघुपतराव. त्याचे समक्ष वरीशभर मृत्योस पावले. त्याचे चिरंजीव हनमंतराव होते. मध्यमपुत्र व्यंकटराव. वहूत जवामर्द दाना होता. तोहि रा।। पांडुरंगपंत दादा याचे मृत्यानंतर चव महिन्यानी मृत्युवश झाला. त्याचा काल जाल्यानंतर श्रीमंतानी आमृतराव पांडुरंग याजला मुखत्यार वक्षगिरीचे कामावर केले. स्वारी स्वस्थानास आली. यावर च्यार पाच वर्श नवीन मसलहत कोनही नमूद न जाली. पेंढाऱ्यांचा मात्र उपद्रव होता. नवाव सिदकआलीखान हे मात्र फौज घेऊन भोपालाचे मसलतीवर होते. स्वारी आग्रेज बाहादुराची मसलहत जाल्यानंतर चवथे वर्षी राजश्री भवानीपंत आबा[२७३] याचा काळ जाला.

मिरखान पेंढाऱ्याने जबलपूर लुटले : त्याचा बंदोबस्त करण्याकरिता सिदकअलीखानाची नेमणूक –

सन १२१९ चे साली[२७४] होळकराकडील मीरखान हिंदुस्थानचे जिल्हचात आस्ता फौजेचा जमाव भारी व उत्पन्न भोजनी कारभार त्या देशात जितका उपद्रव राजेरजवाडे व जैपूर येथील खंडनी घेऊन

---

२७१. नवीन

२७२. विसर्जन करणे, रद्द करणे.

२७३. भवानी पंडिताचा मृत्यू १८०७ मध्ये झाला असे ह्या वृत्तांतावरून दिसून येते.

२७४. इ. स. १८०८–०९ ह्या वर्षी.

इकडील सरकारचे मुलकावर रुख केला. पुढे पत्रे व वकील पाटऊन आपण कूच दरकूच जवलपूर प्रांती येऊन प्रांताचा वहूत खरावा केला.[२७५] स्वस्थान जवलपूर येथे नारायेनराव वाजी व नाईक निंवाजी घाटगे[२७६] हे काही फौजेसुधा तेथे होते. खान मजकुरानी काही आंदेशा[२७७] न करिता जवलपुरावर चाल केली. इकडून उभयेता घाटगे यानी आपली फौजेची तयारी करून त्याचे मुकावल्यावर आले. याची व त्या फौजेसी लढाई जाली. याची फौज जुजवी व त्याचा जमाव भारी. तेव्हा उभयेता बंधुंनी जुंजायास कमती न केली. आखर नाईक निंवाजी खेतावर आले[२७८] व नारायेनराव वाजी हेहि जखमी जाले. त्याची ज्यास्ती जाली हे पाहून नारायेनराव वाजी यानी नाईक निवाजी याजला घेऊन किले मंडळ या रूखावर गेले.[२७९] खान मजकुराणी स्वस्थान जवलपूर येथे ठाणे वसविले तो इकडे वकील येऊन नागपूरास दाखल जाले. श्रीमंत सेनासाहेब यासी बोलण्यात आणिले जे आम्ही जैसे होळकराचे तैसेच आपलेहि आहो. परंतु आम्हास खर्चाची आडचण याकरिता सरकारातून खर्चाची मदत व्हावी नाहीतर जैसे वनेल तसे करू. त्याप्रमाणे त्याचे उरूजाचे[२८०] बोलने पडले आस्ता त्याजला तंबीहि व्हावी यैसे समजून नबाव सिदकआलीखान भोपालचे मसलहतीवर होते त्याजला पत्रे गेली जे तुम्ही फौजेसुधा जवलपूराचे रूखावर येऊन त्याचे मुकावल्यावर जावे.

---

२७५. हा उपद्रव इ.स. १८०९ मध्ये घडून आला.

२७६. काळ्यांच्या ना. प्रा. इतिहासात "जिजावा घाटगे" असे नांव दिलेले आहे.

२७७. विचार न करिता.

२७८. नाईक निंवाजी घाटगे रणक्षेत्रावर जखमी झाले असा अर्थ.

२७९. मंडल्याच्या किल्ल्याच्या रोखाने निघून गेले.

२८०. हा शब्द "उजूर" असावा. उजूर म्हणजे अपेक्षा. त्याचे "अपेक्षेचे बोलणे" चालू होते.

सिदकअलीखानाचा श्रीनगरला वेढा –

यैसे पत्र जाताच नवाव मजकुराणी कूच करून प्रगणे श्रीनगर रेवा दक्षणतीर येथे आले आस्ता खानमजकूर याजला वातमी समजली तेव्हा फौजसुद्धा नरमदा उतरून श्रीनगर येथे तीन दिवस परियेंत आपले फौजेचा वेढा घातला.[२८१] नवाव मजकूर याणी त्याचा जमा-(व) भारी पाहून जवावसालावर टाकून इकडे श्रीमंतास आर्जी लिहिला जे हुजुरातून मदतीस आल्यासिवाये येथे आमचा रंग लागता दिसत नाही. यैसे पत्र येथे येताच श्रीमंत सेना साहेव जातीनेच फौजसुधा वाहेर निघून प्रो॥ रामटेक येथे आले.

मीरखानाचा नागपूरकडे मोर्चा–

याजपूर्वी वावा घारपुरे[२८२] याजला मीरखानाकडे समजोता करावयाकरिता पाटविले होते. त्यास त्याणी कोनही येक गोस्ट न येकता नागपूरचा रूख धरावा हे चित्तात आणिले. मसलहत कठीन पडली. तेव्हा श्रीमंत सेनासाहेव याणी सर्वत्र कारभारी श्रीधर मुनसी आदिकरून यासी विच्यारना केली जे खान मजकूर नरमदा उतरून आलीकडेस आले तेव्हा आता कोणती मर्यादा राहिली नाही. या प्रसंगी मी जातीनेच जावे किंवा आमृतराव पांडुरंग[२८३] याचे जाणे आस्ता ठीक आहे. दुसरी सलाह दिसत नाही. त्यास प्रसंगी रावमाराहि हाजर होते. तेव्हा त्यानी उत्तर केले जे आज तीन पिढ्या सरकारचे

---

२८१. मीरखानाने सिद्दिक अलीखानाच्या सैन्याला नर्मदेच्या दक्षिणेला श्रीनगर ह्या ठिकाणी वेढा घातला.

२८२ काळ्यांच्या नागपूर प्रांताच्या इतिहासात असा वकील पाठविल्याचा उल्लेख नाहीं. काळे ना. प्रां. इ. पान नं. ३७६.

२८३. पांडुरंगपंत दादा बक्षी याच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा अमृतराव पांडुरंग याची बक्षी पदावर नेमणूक झाली होती.

आन्न भक्षिले तेव्हा त्या अन्नाचे सार्थक करावयाची वेळ हेच आहे. उदईक मजला आज्ञा व्हावी. दिरंग लावावयाचा प्रसंग नाही.

मीरखानाचा पाडाव करण्याकरिता अमृतराव पांडुरंग याचे कूच –

त्याजवरून दुसरे दिवसीच मुहूर्त पाहून सरकारचे पायावर डोई ठेवून आज्ञा घेतली. येका दो दिवसात फौज व पैदल पलटणे, तोफा व वानाच्या कैच्या वगैरेचा जमाव करून मजल दरमजल धुम्याचे मुक्कामी पोहोचले. तो इकडेस नवाव सिदकआलीखान यानी दिवस घ्यावेस ह्या कारनास्तव वारा लाख रूपये त्यासी कबूल करून श्रीनगराहून त्याचा कूच करून व आपले तरफेचा कौल[२८४] त्याजला देऊन नरमदापार घालविले. तो इतकियात हेहि कूच दरकूच फौजेसुधा जाऊन नवाब मवमुफासी श्रीनगरावर भेट घेतली.

मीरखानाचा पाडाव करण्याचा निश्चय–

हे व ते फौज येकत्र होऊन पुढे चाल केली तो हे वातमी खान माारास समजली आस्ता रावमाार याजला पत्र लिहिले जे नवावासी आमासी जो तह जाला आहे त्यामागे आपणहि आले आहेत. तेव्हा त्याची सरभरा[२८५] करावी व शमसेरखान याजलाहि याच मजकुराचे पत्र लिहिले. त्याजवरून दुसरे दिवसी शमसेरखान रावमजकुराचे डेरियास आले व हेच बोलणे बोलू लागले. तेव्हा याणी उत्तर केले जे याप्रकर्णी नवाव मजकुराणी हजुरात लिहिले आहे तेथून जवाव आल्या-सारखे सरभरा करीतील यैसे त्यास उत्तर केले. व मीर खान याचे पत्राचा जवाव जैसे यासी बोलण्यात आणिले तैसाच दिल्हा. पानावर पान टेऊन[२८६] शमसेरखान याची विदायेगी याणी व नवाव मजकुराणी

---

२८४. वचन.

२८५. मदत करणे, पुरवठा करणे.

२८६. वेळ काढणे, कालहरण करणे.

केली तो इतकीयात सरकारची पत्रे याजला व नवाव मजकुरास पै दर पै[२८७] गेली की आता कोणते गोस्टीचा आंदेशा[२८८] न करिता मीरखान याचे पारपत्यच घडावे. दुसरा विचार हरगीज करावयाचा नाही.

अमृतराव पांडुरंग याने मीरखानाचा केलेला पाठलाग–

याणी नबाबास विचारीले जे सरकारची पत्रे खास दस्तूर यैसे येतात तेव्हा आता ढील[२८९] करणे हे गोस्टीला दिसत नाही. आता कैसेही करून त्यासी मुकावला घ्यावा यातच सरकारची मर्जी व आपली सुखरूई[२९०] आहे. यैसे बोलून दोनही फौजा येकत्र करून श्रीनगराहून कूच केला. इकडेस मिस्तर जंकिन साहेव वाहादूर[२९१] यानी सरकारात विनंती केली जे सरकार कुंपनी आंग्रेज वाहादूर या सरकारासी मुदतपासोन सिलसिला दोस्तीचा मजबूत आहे, जे आपले दोस्त ते आमचे दोस्त व जे आपले दुसमन ते आमचे दुसमण तेव्हा मीरखान आमचे दुसमण जाले त्यास याचे पारिपत्याकरिता आम्हीहि आपले कडील पलटणे आणविती व आपणावर काही खर्चाचीहि आडचण घालीत नाही.[२९२] आपली फौज व आमची फौज येकत्र होऊन मुकावला व्हावा, सरकारातून त्याजला आज्ञा जाली जे फार चांगले आहे पलटणे आणवावी यैसे बोलून तिकडे रावमजकुरास व नबाव सिदिक आलीखान याजला या मजकुराचे पत्र लिहोन तयार केली. इकडेस त्याणी श्रीनगराहून कूच करून नंतर नरमदा उतरून जबलपुरास जाऊन खानमजकुराकडील काही लोक तेथे

२८७. एका मागून एक.

२८८. विचार.

२८९. आळस करणे.

२९०. बहुमान, आब.

२९१. जेनकिन्स.

२९२. मीरखानाच्या पारिपत्याकरिता अशा रितीने इंग्रजांनीहि मदत देऊ केली.

होते त्याजला उटऊन देऊन आपले ठाणे तेथे कायेम करून कटंगीचे मुकामास गेले. तेथून वातमी आणविली तो खानमजकूर फौजेसुधा कूच करून जबेऱ्याचे मुकामास गेले तेव्हा रावमारनिलेनी सर्वत्र दोही फौजेचे सरदार बोलाऊन निश्चये केला जे उदईक जेथे मीरखान आस्तील तेथे जाऊन मुकावला करावा. त्याजवरून फौजेची छाट करून वमये तोफखाना व पलटनासुधा व वानाच्या कैच्या सुध्दा कूच करविला व आपणहि मागाहून चालले तो इतकियात गुवऱ्याचे तलावर पुढे जे लोक होते त्याणी वधवाई[२९३] वातनीवर मुकामाचा डौल घातला कारण जे त्याजला वातमी समजली की मीरखान फौजेसुधा जबेऱ्याहूनहि कूच करून पुढे गेला. रावमजकुराची स्वारी मागाहून आली. तो आवघ्याणी हे वातमी सांगितली जे मीरखान कूच करून पुढे गेला. येथून जे वारा दाहा कोस पुढे तोहि पाच सात कोस मुकामास गेला असेल. तेव्हा पंधरा कोसाचा विचवा वाटहि पाहाडाची तेव्हा तोफा वगैरे याचे पोहोचने कैसे होईल व येथेच प्रहर दिवस जाला व पुढे जाणे व मुकावला करणे कैसे घडते. तेव्हा वातमी तहकीक[२९४] करिता वधवाई[२९५] दिसोन आली. रावमारनिलेनी कोनाचे न यैकता मुकामाचा डौल होता तो महकूफ[२९६] करून सर्वत्रासी बोलण्यात आणिले जे ज्यास आमचे समागमे यावयाचे आसेल त्यानी यावे, न यावयाचे आसेल तरी न यावे मला तो आज जेथे मीरखान आसेल तेथे जाऊन लढाईचा मुकावला करावयाचा आहे. यैसे म्हणून घोड्यावर वसून तोफा व पैदल पुढे करून चालले. हे जातीनेच

---

२९३. वदहवई म्हणजे खोटी. मीर खान जवेऱ्याहूनहि पुढे कूच करून गेला अशी वातमी समजल्याने तिथेच मुक्काम करण्याचा निश्चय केला. वास्तविक ही बातमी खोटी होती.

२९४. तपास करिता.

२९५. खोटी.

२९६. रद्द.

मात्र सरकारात टेऊन वरकड जे लूट आली ते लोकास माफ करून दिल्ही. दुसरे दिवसी रण शोधावयास गेले तेव्हा मोटे मोठे सरदार याजकडील जे जखमी होते त्याजला आपले डेरियास आणून मलमपटी वगैरे करून त्याहाची वरदास्त केली. मीरखान माार तेथून पळून रातोरात चवदा कोस गेला.[२९८] ते समई रावमाारनिले याहाचे घोडे याजवल लढाईचे वेलेस श्रीमंत साहेव व बाईसाहेव व नानासाहेव व बाबासाहेब याहाचे वरीदार[२९९] जलद चालनार बातमी करिता उभे होते त्याणी फतेची शाहादाने[३००] यैकताच व जे गुजरले ते आपले द्रिस्टीने पाहून तिसरे दिवसी नागपूरास येऊन दाखल जाले. लगतच शुतरस्वारहि येऊनहि दाखल जाला. व श्रीमंतास फतेची बातमी सांगितली. त्याजवरून श्रीमंत सेनासाहेब्र बहुत संतोषास पाऊन प्रथम मातुश्रीबाईसाहेबाकडेस जाऊन विनंती केली जे राव मशारनिलेनी जाऊन मीरखानाचे पारपत्य केले. आपले फते जाली. त्याजकडील तोफा वगैरे असबाव[३०१] हस्तगत होऊन चवदा कोस पळून गेला. यैसे वर्तमान मातुश्रीने यैकून बहुत संतोष मानिला व आज्ञा केली जे प्रथम श्रीरामस्वामीस साखर तबका भरून द्यावी. नंतर आवग्र लोकास या फतेची खुसीची साखर वाटवावी. त्याजवरून सकल लोकास साखरा वाटल्या.

वजीर मादखान भुपालवाले याची मदत घेऊन मीरखानाची पुन्हा चढाई : पुन्हा पराभव आणि पलायन—

मीरखान यानी जाऊन वजीर मा।दखान[३०२] भूपालकर यासी मदत घेऊन मागती झुझायास आले. येंकदा सिकस्त खालीच होती

२९८. मीरखानाशी ही जी लढाई झाली त्याचा उल्लेख काळ्यांच्या नागपूर प्रांताच्या इतिहासात नाही.

२९९. जासूद.

३००. जयवाद्ये, मंगलवाद्ये.

३०१. लुटीचा माल.

३०२. वजीर अहमदखान, भोपाळचा नबाब.

दुसऱ्यानीहि सिकस्त खाऊन[३०३] सिरोज भेलशाकडेस गेले. इकडेस आंग्रेज-वाहादूर याजकडील पलटना कर्णेल सळीस[३०४] बाहदूर याजसमागमे प्रा पांडुरना[३०५] येथे येऊन दाखल जाले. कूच दरकूच नवाव सिदकआलीखान व वहादर मा।र मिळून भूपालचे लत्यात[३०६] सिरोज भेलशापावेतो गेले परंतु खानमार तेथूनहि तावश[३०७] न आणिता जैनगरचे मुलकात गेला व इंग्रजहि आपले स्वस्थानास गेले.

नानासाहेब व आपासाहेब यांची काशीयात्रा आणि नानासाहेबांचा मृत्यु–

नंतर इकडेस श्रीमंत मातुश्री वाईसाहेव रामक्षेत्रीचे मुकामी काहियेक दिवस आजारी राहून देवआज्ञा जाली.[३०८] स्वारी स्वस्थान नागपूर येथे दाखल जाली. पंतप्रधान व नबाव बंदगानआली वगैरे याजला पत्रे लिहिले जे मीरखान याणी आमचे प्रांतात गैरचाल केली आस्ता पेशजी तेथे फौजा होत्याच व मागाऊन राजश्री आमृतराव पांडुरंग[३०९] याजला फौजेसुधा रवाना करण्यात आले. त्यानी त्याचे पारपत्त्य करून त्याजला परागंदा केले यैसे लिहिण्यात आले. नंतर पेंढारी याची गरदी हरसाल या मुलकात होतच होती. सन १२२० चे साली श्रीमंत नानासाहेव[३१०] व श्रीमंत आपासाहेब[३११]

३०३. पराभव झालाच होता.

३०४. हा कोण? इंग्रजांतर्फे कर्नल क्लोज आणि क. हेअर भोपाळच्या मदतीला आले असा उल्लेख काळ्यांच्या ना. प्रा. इ. (पान ३७७) सापडतो.

३०५. पांढुरणा.

३०६. भोपाळजवळच्या प्रदेशात.

३०७. ताब्यात आणणे.

३०८. चिमाबाईसाहेब.

३०९. अमृतराव पांडुरंग बक्षी.

३१०. व्यंकोजी.

३११ मुधोजी उर्फ अप्पासाहेब भोसले.

कुटुंबसुद्धा कासीयात्रेस जावयाकरिता श्रीमंतसाहेबास विनंती केली त्याजवरून याहाचे समागमे माधवराव भवानी व बलवंतराव भवानी शंकर याचे वडील पुत्र सखारामपंत याजला देऊन नानासाहेब याची बिदायेगी केली. कूच दरकूच प्रयागास पोहचून तेथील यात्रेचा गुंता उरकून श्रीवारानसी क्षेत्रास आले. तेथे काहीक दिवस राहून गयेस गयावर्जनाकरिता गेले तेथे माधवराव भवानीशंकर याहाचा काल जाला व श्रीमंत नानासाहेव[३१२] याचीहि प्रकृती फार विगडली. मोटे प्रयासेकरून गयावर्जनाचा गुंता उरकोन भागीरथीचे तीराने पटन्यावरून कासीस आले. तेथेहि आवशध उपच्यार वहुत केला. परंतु काहीच साध्य न होता दिवसोदिवस शरीर प्रकृती कृश होऊन देवआज्ञा जाली.[३१३] दानधर्म वहुत केला. नानासाहेवाची जात मोठी पुण्यवान की यैसे माहाक्षेत्रामधे देहे विसर्जन जाला. इकडेस हे वर्तमान श्रीमंत सेनासाहेव याजला समजले आस्ता वहूत शोक केला. येथून श्रीमंत आपासाहेव व मैनाबाईसाहेव याजला शांतवन करून आनिन्याकरिता नारायेन येशवंत चिटनवीस याहाची बिदागी केली. काहीक दिवस गुजरल्यानंतर रा॥ गुज्याबादादा याजलाहि पाटविले.[३१४] यानी जाऊन तेथे मैनाबाईसाहेब व आपासाहेब याचे शांतवन करून इकडेस घेऊन आले. श्रीमंत साहेबाची स्वारी देवगडापावेतो जाऊन उभयेतास घेऊन नागपुरास दाखल जाले.

सिद्दू पेंढाऱ्याचा उपद्रव आणि गणपतराव सुभेदाराचा पराक्रम–

सन १२२१ साली[३१५] श्रीमंताची स्वारी वारेगावाचे मुकामी आसता सिद्दू वगैरे पेंढारी यांनी आपले ठिकाणी मसलहत केली जे या

---

३१२. व्यंकोजी भोसले. ३१३. ऑगस्ट १८११.

३१४. यादव माधव काळे यांनी गुजाबा दादा गुजर यांना फक्त पाठविले असे लिहिले आहे. (या. मा. का. ना. प्रां. इ. पा. क. ३०९.)

३१५. इ. स. १८१३ साली. गुप्ते बखर पा. नं. २२३ पहावे.

दौडेस स्वस्थान नागपूर येथे जाऊन शहरची खराबी करावी. या बेतावर करवल वगैरे सरंजाम छाट करून दाहा हाजार पेंढारी रवाना केले. हे वातमी समजताच श्रीमंत सेनासाहेवानी तीन तुकडचा करून येक तुकडी गणपपंतराव सुभेदार[३१६] याजला मौजे कोराडीच्या रूखावर टेविले व येक तुकडी वारेगावापासून कोसावर टेविली व राजश्री आमृतराव पांडुरंग[३१७] याजला शहरचे रूखावर पाटविले तो इतकियात पेंढारी याणी शहरचा रूख धरला. इकडून रावमारनिले आपले तुकडी-सुधा जाऊन त्याहाचे मोहऱ्यावर उभे राहिले येकायेकी त्याहाचे येणे जाले. सबब तोफा वगैरे हजर न होत्या व त्यानी निकड बहूत केली. सेवटी राव मजकूर याजला गोळी लागली. गोळीची जखमहि लागली आस्ता तैसेच च्यार घटका परियेंत उभे राहून महताबखान पऱ्ही वगैर याजकडील करवल पुढे देऊन जे मोहऱ्यावर आले होते त्याजपैकी दहा-वीस गोल्यांनी पाडले आस्ता इकडील शहरचा रूख सोडून गणपतराव सुभेदार याजवर गेले. तिकडून खासा स्वारीहि आली. च्यार घटका परियेंत यानी खटपट करून निघून गेले. स्वारी मौजें आंजरीमांजरीस येऊन दाखल जाली. नंतर काही दिवस तेथे राहून स्वस्थान नागपूर येथे येऊन दाखल जाले. नंतर कोनहि येक मजकूर यैसा जाला नाही जे लिहिण्यात यावा.

दुसऱ्या रघुजीचा मृत्यु : अप्पासाहेब भोसले गादीवर--

सन १२२५ चे[३१८] साली श्रीमंत सेनासाहेब सुभा याहाचा काल जाला.[३१९] व श्रीमंत परसोजी भोसले बाबासाहेब गादीवर बसले. हे

---

३१६. दुसऱ्या रघुजीचा एक पराक्रमी सेनापती.

३१७. अमृतराव पांडुरंग बक्षी.

३१८. इ. स. १८१७ साली. २२-३-१८१६ गुप्तेबखर पा. २३१.

३१९. दुसऱ्या रघुजीचा मृत्यु झाला.

नेत्रेकरून हीन[३२०] याजकरिता आंग्रेज बाहादुरानी दौलतीचा कारभार व दौलतीची मालकी श्रीमंत आपासाहेब याजकडेस सोपविली आस्ता काही येक दिवस गुजरल्यानंतर श्रीमंत बाबासाहेब परसोजी भोसले याहाचा काल जाला.[३२१] श्रीमंत आपासाहेब[३२२] यानी कदीम[३२३] कारभारी याचे न यैकता नवीन कारभारी कौत आदेश ज्यानी कधीच दौलतीचे कारभार पाहिले नाहीत त्याचे हाताने दौलतीचे कामे घेऊ लागले. आंग्रेज बाहादूर यानी पूर्व सिलसिल्यावर द्रिस्ट देऊन याहाचे दौलतीचे बहबुदीस[३२४] काही कसूर केला नाही. परंदु याची मिजाज क्षणभंगूर व कारभारी या प्रकारचे. तेव्हा दिवसोदिवस कदीम[३२५] कारभारी यानी मना केले आस्ता आंग्रेज बाहादूर यासी विरोध वाढऊन आपण परागंदा जाले. यानी इतकाही विरोध व दुशमणी केली आस्ता श्रीमंत रघोजी भोसले सेनासाहेब सुभा याचे दोस्तीचे सिलसिल्यावर द्रिस्ट देऊन त्याहाचे कन्येचे पुत्रास[३२६] मसनदनशीन करून कदीम कारभारी वगैरे त्याजला कायेम टेऊन जातीने आभिमान धरून नाव कायेम टेविले. बहादर मवसुफाचे दोस्तीची शर्त जाली.

मिस्तर जंकिन साहेब[३२७] आलीशान बाहादूर यानी राजश्री आमृतराव पांडुरंग याजला हुकूम केला जे तुम्ही आपला सिलसिला[३२८]

---

३२०. डोळ्यांनी तो अंध झालेला होता.

३२१. परसोजीचा दिनांक १ फेब्रुवारी १८१७ रोजी मृत्यु झाला.

३२२. मुधोजी भोसले ह्याचा मुलगा व्यंकोजी ह्याचा हा मुलगा. म्हणजे दुसऱ्या रघुजीचा पुतण्या. परसोजी दुसऱ्या रघुजीचा एकुलता एक मुलगा.

३२३. जुने.

३२४. कल्याण.

३२५. जुने.

३२६. तिसरा रघुजी.

३२७. जेनकिन्स.

३२८. वृत्तांत, वहिवाट, संबंध.

इबतेदा[३२९] आपले बुनयादीपासून[३३०] आपणापावेतो या राज्याचे पैवस्तगी[३३१] पासून लिहून देणे त्याजवरून रावमारनिलेनी हा सिलसिला जातीने लिहिला आसे.


---

३२९. प्रारंभापासून.

३३०. पायापासून.

३३१. संबंध आला तेव्हापासून.

बक्षी घराण्याची वंशावळ



टीप :– जानोजी पहिला याच्या कारकिर्दीत भवानी काळोस बक्षीगिरीच्या कामावर नेमण्यात आले. त्याने ते आपला पुतण्या पांडुरंग गणेश यास दिले. ह्याच घराण्यात शेवटपर्यंत ते पद चालू होते.

व्यक्तींची सूची

स्थळ सूची
